साहित्य
ISSN-2455-4928


# चपराक

SAHITYA CHAPRAK


संस्थापक, संपादक :
घनश्याम पाटील



www.chaprak.com
वर्ष-१९ । अंक-४ । एप्रिल २०२६ (मासिक) । मूल्य रु. ७०/- । पाने-५२ । वार्षिक वर्गणी रु. १०००/-
**Pune** | **Vol. :** 19 | **Issue : 4** | April 2026 (Monthly) | **Price :** Rs. 70




एका युगपुरुषाच्या शौर्याचे अद्वितीय पर्व, मृत्युसही न जुमानणाऱ्या मावळ्यांच्या असीम त्यागाची जाज्वल्य गाथा, ओघवत्या शब्दशैलीत मांडलेला इतिहासाचा रोमहर्षक पट, प्रत्येक मराठी मनासाठी एक स्फूर्तिदायी अक्षरग्रंथ.



आजच नोंदणी करा! फोन पे / गूगल पे क्र. ७०५७२९२०९२ कृपया नोंदणीनंतर त्याचा तपशील आणि आपला पूर्ण पत्ता याच क्रमांकावर व्हाट्सऍप करावा.

एक परिपूर्ण मासिक ISSN. No. 2455-4928

साहित्य चपराक

चतुरस्र । परखड । रास्त । कर्तव्यदक्ष

संस्थापक, संपादक घनश्याम पाटील

| | | |
|---|---|---|
| सहसंपादक | : | माधव गिर |
| उपसंपादक | : | सौ. चंद्रलेखा बेलसरे |
| सल्लागार | : | सुधीर गाडगीळ, ज्ञानेश्वर तापकीर |
| ऑनलाईन संपादक | : | ज्योती घनश्याम, वैभव कुलकर्णी |
| व्यवस्थापक | : | प्रमोद येवले |
| सजावट | : | संतोष शंकर खुटवड |
| अन्य सहकारी | : | अरुण कमळापूरकर, रवींद्र कामठे, सागर सुरवसे, सचिन सुंबे, दयानंद महापुरे |

**संपादकीय कार्यालय चपराक प्रकाशन**

**चपराक प्रकाशन,**
४०२, चौथा मजला, वेलस्प्रिंग, रयान स्कूलच्या मागे, मार्केट यार्ड,
बावधन बुद्रुक, पुणे ४११०२१.
भ्रमणध्वनी : ७०५७२९२०९२/८७६७९४१८५०
वेबसाईट : www.chaprak.com. ईमेल : info@chaprak.com

**वर्गणी**

वार्षिक रु. १०००/-
त्रैवार्षिक रु. ३०००/-
पंचवार्षिक रु.५०००/-

आपली वर्गणी आमच्या

**७०५७२९२०९२**

या क्रमांकावर भीम ॲप, फोन पेद्वारे भरू शकता. वर्गणी भरल्यावर त्याचा तपशील आणि आपला संपूर्ण पत्ता याच क्रमांकावर द्यायला विसरू नका.

BHIM UPI
वर्गणी भरण्यासाठी क्युआर स्कॅन करा

'साहित्य चपराक' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक घनश्याम वसंतराव पाटील यांनी शिवानी प्रिंटर्स, कसबा पेठ, पुणे ४११०११ येथे छापून चपराक प्रकाशन, ४०२, चौथा मजला, वेलस्प्रिंग, बावधन मार्केट यार्ड, बावधन बुद्रुक, पुणे ४११०२१ येथे प्रसिद्ध केले.

**संपादक : घनश्याम वसंतराव पाटील**

# वाचन प्रेरणेचा सुकाळ




एप्रिल महिन्यात २३ तारखेला 'जागतिक पुस्तक दिन' साजरा केला जातो. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यापासून गेल्या काही दिवसांत भाषाविषयक, पुस्तकविषयक उपक्रम झपाट्याने वाढले आहेत. पुस्तक दिनाचेही विविध ठिकाणी कार्यक्रम, उपक्रम आयोजित केले जातात. मराठी भाषा, साहित्य, संस्कृती आणि समीक्षेच्या दृष्टिने हा कालखंड कधी नव्हे इतका चांगला आहे.

'वाचनसंस्कृती कमी होतेय', अशी ओरड गेल्या अनेक दशकांपासून सुरूच आहे. त्यात मुळीच तथ्य नाही, हे या क्षेत्रातील कुणीही जाणकार सांगेल. उलट वाचणाऱ्यांचे प्रमाण लक्षवेधी वाढत असून त्यात तरूणाईची संख्या मोठी आहे. या मुलांची अभिरूची बदलली आहे, साधने बदलली आहेत पण वाचन मुळीच कमी झाले नाही. शारीरिक स्थूलपणा आणि मनावरील मरगळ सोबत वागवणारी काही मंडळी वाचन कमी झाल्याचे स्वानुभवावरून सांगतात. त्यातली वस्तुस्थिती ही आहे की ही मंडळी कधीही वाचत नव्हती. आपल्याकडे कोणत्या वर्षी किती वाचक होते, याची अधिकृत आकडेवारी कोणीही देऊ शकणार नाही! मग आधी खूप वाचक होते आणि आता ते लयाला गेले आहेत हे कशाच्या आधारे ठरवणार? उलट रोज डझनावरी प्रकाशित होणारी पुस्तके आणि त्याच्या धडाधड निघणाऱ्या आवृत्त्या कशाचे द्योतक आहेत? अनेक तरूणांच्या ब्लॉगला लाखो वाचक असणे आणि त्यातून त्यांनी मजबूत पैसे कमविणे हे अनेक ठिकाणचे वास्तव कसे नाकारता येईल...?

जे साहित्य कालबाह्य होते ते आजची पिढी वाचणार नाही. त्यांची आवड वेगळी आहे. रामायण-महाभारतापासून ते बायबल-कुराणपर्यंत कशाशीही देणे-घेणे नसलेल्या एका मोठ्या वर्गाला आजच्या विषयावरील साहित्य आकर्षित करून घेते. मग आज कालसुसंगत लेखन करणारे



## संपादकीय

घनश्याम पाटील : ७०५७२९२०९२

किती लेखक मराठीत आहेत? आजच्या पिढीच्या काय समस्या आहेत, त्यांना कोणत्या दिव्यातून जावे लागतेय हे तरी त्यांना उमजते का? वातानुकूलित दालनात बसून पुस्तकांचे नियोजन करणारे प्रकाशक, आलिशान बिछान्यावर लोळत शेतकऱ्यांच्या व्यथा-वेदना मांडणारे आणि कल्पनाविश्वात रमण्यात धन्यता मानणारे लेखक, ठोकळेबाज विचारसरणीचे डुढ्ढाचार्य समीक्षक, भरमसाठ पगारी असल्याने सामाजिक प्रतिष्ठेसाठी, नोकरीतील बढतीसाठी सुमार पुस्तके छापून घेणारे महाभाग, अशा पुस्तकांना पुरस्कार मिळावेत म्हणून चाललेली त्यांची धडपड, साहित्यिक उपक्रम-ग्रंथालये याबाबत उदासीन असणारे सरकार असे अनेक घटक वाचनप्रक्रियेचे मारेकरी आहेत. तरीही त्यांच्या नाकावर टिच्चून उत्तमोत्तम लिहिणारे, ते प्रकाशित करून अधिकाधिक वाचकांपर्यंत पोहोचविणारे, अतिशय निष्ठेने त्याच्या विक्रीची जबाबदारी पार पाडणारे असे अनेक तारे असल्याने वाचक वाढतच चालले आहेत.

पूर्वी वृत्तपत्रांच्या पुरवण्या वाचकांची अभिरूची घडवायच्या, त्यांना सुयोग्य दिशा दाखवायच्या. सध्या वृत्तपत्र उघडले की त्यात केवळ खून, मारामारी, दरोडे, अपघात, बलात्कार, राजकीय आरोप-प्रत्यारोप हेच वाचायला मिळते. सकारात्मक बातम्या आणि सर्जनशील साहित्य हे माध्यमांचे शेवटचे प्राधान्य ठरत आहे. रविवार पुरवण्यातून पुस्तकांचे संक्षिप्त परिचय प्रकाशित होतात पण मराठीतील सैद्धांतिक, आस्वादक समीक्षाही संपली आहे. नव्याने लिहिणाऱ्या उमलत्या अंकुरांना बळ द्यावे, त्याला प्रोत्साहन देऊन मार्गदर्शन करावे हा गुणही लुप्त होत चाललाय. मराठीला लागलेले हे

प्रतिसादशून्यतेचे ग्रहण सुटणे अत्यावश्यक आहे. 'एक वेळ माझं बाजूला ठेवा पण हा नवा लेखक चांगलं लिहितोय, त्याचं साहित्य बघा' असं मोठ्या मनाने सांगणारे ज्येष्ठ लेखक आपल्याकडे तयार होत नाहीत, तोपर्यंत त्यांना साहित्य व्यवहारावर बोलण्याचा अधिकार नाही.

घर बांधताना आधी त्याचा आराखडा तयार केला जातो. त्यासाठी अनेक वास्तुविशारद झटत असतात. बैठक व्यवस्था कुठे असावी, स्वयंपाकघर कसे असावे, देवघर कुठे करावे, खिडक्या कशा असाव्यात, फ्रिज, वॉशिंगमशीन कुठे ठेवता येईल, बाल्कनीबरोबर ड्राय बाल्कनी कुठे असेल, इतकेच काय तर टॉयलेट कसे आणि कुठे असावे याबाबतचा गंभीरपणे विचार होतो. त्यावेळी 'घरात पुस्तकाचे कपाट कुठे असावे?', हे मात्र त्यांच्या गावीही नसते. घर बांधताना घरात पुस्तकांचे कपाट कुठे असावे? याचा जेव्हा विचार सुरू होईल तेव्हा प्रगतीच्या दृष्टिने आपण एक पाऊल टाकलेले असेल.

सरहद संस्थेने आयोजित केलेल्या पंजाबमधील घुमान इथल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनानंतर तेव्हाचे सांस्कृतिक मंत्री विनोद तावडे यांना 'पुस्तकाचे गाव' ही कल्पना सुचली. महाबळेश्वरजवळील भिलार या गावी ही संकल्पना प्रत्यक्षातही आली. सातारा तालुक्यातीलच प्रल्हाद पार्टे यांच्या पुढाकारातून 'जकातवाडी' हे कवितांचे गाव म्हणून ओळखले जातेय. शिरपूरला पुस्तकांचे उद्यान तयार करण्यात आले. नाशिकला भीमाबाई जोंधळे या आजी 'पुस्तकांचं हॉटेल' चालवतात. असे अनेक उपक्रम पुस्तकांवर प्रेम करणाऱ्यांच्या दृष्टिने ऊर्जेची बेटे आहेत. यांचे प्रमाण वाढणे गरजेचे आहे.

अ. भा. मराठी साहित्य संमेलनातील ग्रंथदालनेही या चळवळीला बळ देतात. राजेश पांडे यांच्या प्रयत्नातून सुरू झालेला पुणे पुस्तक महोत्सव अल्पावधीत जागतिक स्तरावर गेला. विविध संस्थांच्या माध्यमातून विभागीय ग्रंथ प्रदर्शने भरतात. 'सकाळ'सारख्या महत्त्वाच्या वृत्तपत्रानेही पुस्तक महोत्सव सुरू केला आहे. येत्या मे महिन्यात राजेंद्र टकले आणि सहकाऱ्यांच्या माध्यमातून बारामतीत पुस्तकांची जत्रा होतेय. उच्च तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अशोक गाडेकर यांच्यासारख्या धडाकेबाज, दूरदृष्टी असलेल्या अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली राज्याचे ग्रंथालय महासंचालनालयही सातत्याने अनेक उपक्रम राबवत असते. हे सगळे पुस्तकांच्या दृष्टिने पोषक म्हणावे लागेल.

पुस्तक दिनाच्या निमित्ताने पुस्तके वाचण्यासाठी आणि प्रकाशित करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. 'लेखन हे स्वान्तसुखाय असावं,' असं आचार्य मम्मट म्हणायचे! मात्र स्वतः ची अभिव्यक्ती प्रकट करणे, विविध विषयांची अभ्यासपूर्वक, तपशीलवार माहिती देणे, आपल्या कल्पनाविष्काराचे दर्शन घडविणे, इतिहासाची माहिती, वर्तमानाचे ज्ञान आणि भविष्याची सुसंगत मांडणी करणे, माणसाचा दृष्टिकोन व्यापक करणे या हेतूने झालेले लेखन चिरकाल टिकते. आपले आकलन, कल्पनाशक्ती वाढवण्याबरोबरच आपल्या विचारांचे क्षितिज उंचावण्याची ताकद वाचनामध्ये आहे. उत्तम स्वास्थ्यासाठी रोज पौष्टिक जेवण करणे, नियमित व्यायाम करणे हे जसे आवश्यक आहे तसेच मेंदूला खाद्य पुरवण्यासाठी रोज काही तरी चांगले वाचणे, मन मोकळे करण्यासाठी लेखनाच्या माध्यमातून व्यक्त होणे आवश्यक आहे. निरोगी, निकोप, निर्मळ व्यक्तिमत्त्वासाठी वाचणे आणि लिहिणे हा सर्वोत्तम पर्याय आहे.

माहिती, मनोरंजन आणि ज्ञान यासाठी पुस्तकांसारखा दुसरा मित्र नाही. आपली आकलनशक्ती समृद्ध करण्यासाठी, शहाणपण वाढविण्यासाठी पुस्तकांना पर्याय नाही. एखादे पुस्तक सोडा, एखाद्या महत्त्वाच्या पुस्तकातील एखादे अर्थपूर्ण वाक्य वाचूनही आयुष्याला दिशा मिळाली, अशी अनेक उदाहरणे आपल्या आजूबाजूला आहेत. समाजमाध्यमामुळे वाचन कमी होतेय, असे म्हटले जात असताना ब्लॉग, व्हाटसअॅप, फेसबूक, विविध संकेतस्थळे या माध्यमातूनही अनेक जण उत्तमोत्तम वाचत असतात. सगळेच काही नकारात्मक आहे, असे मुळीच नाही. गेल्या काही वर्षात तर ई-बुकचे प्रमाणही अफाट वाढले आहे. या सुविधेमुळे एकेकाच्या संग्रहात शेकडो पुस्तके सहजी असतात.

अशा सगळ्या पार्श्वभूमीवर मराठी भाषेचे वैभव अनेकांना भुरळ घालेल. जगात सर्वाधिक बोलल्या जाणाऱ्या दहा भाषांत मराठीचा समावेश होतो. 'मराठी शिकल्याने पोट भरते का?' हा प्रश्न केव्हाच निकाली निघाला आहे. ज्याचा भाषेचा चांगला अभ्यास आहे त्याच्यासाठी रोजगाराच्या असंख्य संधी उपलब्ध आहेत. त्यामुळे रोज काहीतरी चांगले वाचणे आणि थोडेफार लिहिण्याचा प्रयत्न करणे अत्यावश्यक आहे. यंदाच्या पुस्तक दिनाच्या निमित्ताने तरी त्याची सुरुवात व्हावी, ही अपेक्षा.

**'चपराक'ची 'ग्रंथसूची**

# अंतरंग


| | | |
|---|---|---|
| १. | गोष्ट न वाचणाऱ्यांची आणि न वाचलेल्या पुस्तकांची – महेश सोवनी | ७ |
| २. | वीस 'गुणां'चा विषय–श्वेता म्हसकर | १० |
| ३. | गर्दीत हरवलेला माणूस–कस्तुरी देवरूखकर | १३ |
| ४. | संस्मरणीय, दखलपात्र कलकत्ता बुक फेअर २०२६ – विलास पोतदार | १५ |
| ५. | चंद्रावती – सुरेखा बोऱ्हाडे | १८ |
| ६. | विजयपुरम तथा अंदमानच्या बेटावरचे तीन दिवस –विजयालक्ष्मी मणेरीकर | २३ |
| ५. | पत्र – डॉ. मीना श्रीवास्तव | २८ |
| ६. | हिंदी चित्रपटातील स्त्री – श्रीराम नानल | ३३ |
| ७. | प्रकाशनकट्टा : साहित्यासाठी प्रेरणादायी उपक्रम – शिरीष चिटणीस | ३५ |
| ८. | गड्या, आपला गावच बरा! – सदानंद भणगे | ३८ |
| ९. | मला घडवणारे पुस्तक – प्राचार्य श्याम भुर्के | ४३ |
| १०. | हृदयस्पर्शी कथा सागर – नागेश शेवाळकर | ४५ |
| ११. | अनुभवांच्या उबेतून उमलणारं शिक्षणविश्व – मोनाली देशमुख | ४७ |
| १२. | कौटिलीयम् अर्थशास्त्रम्। – मंगला मिरासदार | ४९ |


**कविता**


| | |
|---|---|
| कुपोषण–अपर्णा कडसकर | १२ |
| माणूस देव माझा – रमण रणदिवे | ३२ |
| देह – दत्ता पवार | ३२ |


'चपराक'ची' ग्रंथसूची


साहित्य चपराक
साहित्य चपराकचे ॲप
GET IT ON Google play

**माणसं वाचत का नाहीत? आणि वाचणाऱ्या माणसांच्या घरातही न वाचलेल्या पुस्तकांचा गठ्ठा का असतो? वाचन संस्कृती वाढली पाहिजे हे जेवढे खरे आहे तेवढेच हेही खरे आहे की सगळे जण वाचत नाहीत आणि जे वाचतात त्यांच्या घरातही घेतलेल्या पण न वाचलेल्या पुस्तकांची थप्पी असते. असे का होते याचा उहापोह करणारा हा लेख.**




# गोष्ट न वाचणाऱ्यांची आणि न वाचलेल्या पुस्तकांची




**महेश सोवनी**
**भिवंडी**


मी जेव्हापासून पाहत आहे तेव्हापासून माझ्या घरात सगळेच वाचायचे. मी अगदी लहान असताना बाबा माझ्यासाठी शिशु वाचन, बाल वाचन ही पुस्तके आणायचे. आजी पोळ्या करत असायची. मी तिथे बसून वाचत असे. जोडाक्षरे आली की मी अडत असे. मी वाचून दाखवत असे जसे की फ अर्ध्या क ला जोडलेले. म्हणजे? मी आजीला विचारायचो. मग ती मला तो शब्द काय, त्याचा उच्चार सांगायची. त्यामुळे इंग्रजी माध्यमात शिकूनही माझं मराठी चांगलंच होतं. घरातील मोठी माणसे मनातल्या मनात कसे वाचतात याचे मला नेहमीच आश्चर्य वाटायचे. मी त्यांना नेहमी मनातल्या मनात कसे वाचता तुम्ही असा प्रश्न मी विचारायचो. आता माझी चौथीतली मुलगी मला हाच प्रश्न विचारते. तीही वाचते. लिहिते! पण कधी? जेव्हा मी वाचत असतो, तेव्हा ती माझ्या शेजारी येऊन बसून वाचते. मी लिहित असतो तेव्हा तीही शेजारी बसून लिहू लागते. मी मोबाईल घेऊन बसलो की तीही दुसरा मोबाईल घेऊन बसते.

लहान मुले ही अनुकरणप्रिय असतात. लहान मुलांशी वागता बोलताना नेहमी माकड आणि टोपीवाला ही गोष्ट लक्षात ठेवावी लागते. जर का पुढची पिढी वाचत नाही असे वाटत असेल तर मागच्या पिढीने आपण किती वाचतो हा विचार केला पाहिजे. आपली संस्कृती ही सगळ्यांनी एकत्र येऊन सणवार साजरे करणारी. आपण एकत्र पूजा करतो, आरत्या करतो, भजनं करतो, सहली काढतो, हॉटेलात जातो, त्याचे फोटो काढतो, शेअर करतो... मग आपण सगळे आठवड्यातून एकदा एकत्र बसून तासभर वाचू का शकत नाही? एकत्र एकच पुस्तक वाचू किंवा प्रत्येक जण आपल्या आवडीचे पुस्तक घेऊन एकत्र बसून वाचू. कसेही वाचू पण सगळे वाचू. हे चित्र निर्माण करण्यासाठी आपण सर्वांनी मिळून प्रयत्न करणे आवश्यक. जरा मोठा झाल्यावर वडिलांनी मला टारझन, हातिमताई अशी पुस्तके आणली. तशीच सुट्टीतल्या गोष्टी, तीर्थक्षेत्राच्या गोष्टी अशी पुस्तके आणली. कितीही प्रयत्न केले तरीही मी टारझन, हातिमताई ही पुस्तके वाचून पूर्ण करू शकलो नाही. त्याच वेळी तीर्थक्षेत्राच्या गोष्टीसारखी पुस्तके मला आवडत होती. बाळाचे पाय पाळण्यात दिसत होते पण मला तेव्हा ते समजले नाही.

मला फार गिल्टी वाटायचे की मी टारझन, हातिमताई ही पुस्तके पूर्ण केली नाहीत. हा अपराधगंड नंतरही अनेक पुस्तकांबाबत आला. चांदोबा लहान मुलांचे मासिक समजला जायचा पण तो भावला नाही. जरा कळायला लागल्यावर चांदोबातील पौराणिक कथात ते बराच वेळ रती क्रीडा करून झोपी गेले, असली वाक्ये समजायला लागली नि लहानपणी चांदोबा का भावला नाही त्याचे उत्तर सुद्धा मिळाले. या उलट 'चंपक'मधील बोलणाऱ्या, छान छान कपडे घालणाऱ्या, शाळेत जाणाऱ्या नि आमच्यासारखं

बोलणाऱ्या-वागणाऱ्या प्राण्यांच्या गोष्टी फारच आवडायच्या. मुख्य म्हणजे त्या यातून तुम्ही काय शिकलात, असल्या बोध देणाऱ्या, उपदेशाचे डोस पाजणाऱ्या नसायच्या.

माझी आजी, पणजी, माझे वडील सगळेच वाचायचे आणि सगळ्यांची आवड वेगवेगळी होती. माझी पणजी डिटेक्टीव्ह पुस्तके फार आवडीने वाचायची. तिच्या हातात इतर कोणत्याही प्रकारचे पुस्तक मी कधीही पाहिले नाही. लोक म्हणायचे, 'काय पण म्हातारी आहे. या वयात देवाधर्माचे वाचायचे सोडून खून खटल्यांची पुस्तके वाचते आहे.'

यावर ती म्हणायची, 'देवाधर्माचे मी सगळे वाचलेले आहे. वेद, अठरा पुराणे, गीता, ज्ञानेश्वरी सगळं एकदा वाचले आहे परंतु ते पुन्हा वाचण्यात मला कसलाही रस नाही.'

मला वाटते की हे सगळ्या वाचनसंस्कृतीचे सार आहे. माणूस त्याला रस असलेलीच पुस्तके फक्त वाचतो आणि प्रत्येकाला सर्वच विषयात रस नसल्याने, कोणीही माणूस आयुष्यात काही पुस्तके कितीही हौसेने विकत घेतली असली तरीही त्यात त्याला रस नसल्याने कधीही वाचणार नाहीच.

मोठ्या हौसेने विकत घेतलेली पुस्तके, लोकांनी छान म्हटलेली पुस्तके मला वाचवत नव्हती. म्हणजे मी फार काही मोठा अपराध करत आहे असे मला वाटत होते पण आता मला कळते आहे सगळी पुस्तके ही सगळ्यांसाठी असतात असे नाही. अशा प्रकारे न रुचल्याने विकत घेऊनही न वाचलेल्या पुस्तकांची यादी बनवायची झाल्यास एक स्वतंत्र लेख तयार होईल. त्याच वेळी वाचलेल्या नि खूप भावलेल्या पुस्तकांबद्दल लिहायचे झाल्यास एखादा महा ग्रंथ नक्कीच तयार होईल. म्हणजेच न आवडलेल्या पुस्तकांपेक्षा आवडलेल्या पुस्तकांची संख्या खूप जास्त आहे. हे पुन्हा आयुष्यासारखेच. चार-दोन माणसांना आपण आवडत नाही, आपल्याला चार-दोन माणसे आवडत नाहीत पण हा अपवाद सोडून दिला तरी आपल्या आयुष्यात आपल्याला भेटलेले बहुसंख्य लोक आपल्याला आवडतात, आपणही त्यांना आवडतो, जमते आपले त्यांच्याशी असेच काहीसे. शिवाय साहित्य म्हटले की डोळ्यासमोर येतात ते मोठाले (आणि बऱ्याच वेळा न समजणारे) ग्रंथ. या कारणामुळे वाचक आणि लेखक यांच्यात दुरावा निर्माण होत आहे. नवजात बालकाची फार लवकर साहित्याशी ओळख होते. चिऊ काऊची गोष्ट असो की इथे इथे बैस रे मोरा, हे सगळे साहित्यच की, असे मी माझ्या एका मित्राला म्हणालो. तर तो मला काय म्हणाला माहिती आहे! तो म्हणाला, 'काय साहित्य, हे इतके साधे सोपे असते?'

साहित्य म्हणजे केवळ मोठाले (आणि बऱ्याच वेळा न समजणारे) ग्रंथ, असा समज झाला आहे. वाचकांचाही आणि लेखकांचाही. अर्थात मोठाले आणि क्लिष्ट वाटणाऱ्या कलाकृती त्यांच्या ठिकाणी श्रेष्ठ आहेतच पण त्याचवेळी एवढे मोठे ग्रंथ पाहून सर्वसामान्य वाचक त्यांच्या वाट्याला जात नाही हेही तितकेच खरे. हे म्हणजे बऱ्याच जणांना गणित आणि इंग्लिश विषय क्लिष्ट वाटतो आणि त्यापासून लवकरात लवकर सुटका व्हावी असे वाटते तसेच काहीसे. मग कॉलेजला हे विषय सोडून दिले जातात. असेच अवघड, न समजणाऱ्या साहित्याचे बोट माणूस सोडून देतोच. साहित्य किती आवडत असते लहानपणी. मग त्या आजीने सांगितलेल्या गोष्टी असोत की आईने गायलेली अंगाई. मग मोठे झाल्यावर मात्र खूप जणांना कशाला वाचायची पुस्तके, डोळ्यासमोर पुस्तक धरले की झोप येते, असे का व्हायला लागते? माझी एक मावशी होती. तिला झोपताना पुस्तक लागायचेच.

डोळ्यासमोर पुस्तक धरल्याशिवाय झोपच येत नाही म्हणायची. आठ-दहा ओळी वाचते न वाचते तो डोळा लागतोच, असे म्हणायची. काहीच न वाचणाऱ्यापेक्षा माझी मावशी बरी, असे म्हणायची आता वेळ आली आहे. ती किमान पुस्तक तरी हातात घ्यायची.

तर मुद्दा हा होता की लहानपणी इतक्या आवडीचे असणारे साहित्य आपल्यापासून लांब का जाते? हे म्हणजे लहानपणी हिरो असलेले वडील आपण मोठे झालो की हिटलर वाटायला लागतात, त्यांचा जाच वाटायला लागतो तसेच काही. लहानपणी वडील म्हणजे जग असते. मोठे झालो की आपलेही एक जग निर्माण होते आणि आपले आणि वडिलांचे जग पूर्णपणे वेगळे असते. वाचन कमी होण्यामागचे हे एक महत्त्वाचे कारण आहे असे मला वाटते. एखाद्या पुस्तकाचा फार गाजावाजा होतो. कोणीतरी हे पुस्तक फारच भारी आहे म्हणून सुचवतो. आपण ते पुस्तक फार हौसेने (आणि अपेक्षेने) आणतो आणि पहिल्या पाच-सहा पानातच आपला पुरता भ्रमनिरास होतो. हे असे अनेक वेळा होते. याचे कारण म्हणजे प्रत्येक पुस्तक हे प्रत्येकाला आवडलेच पाहिजे, आवडेलच असे नाही. हा मुद्दा मला वाटते हर एक प्रकारे प्रत्येकापर्यंत पोचवला पाहिजे. आता तुमचे जग चिऊ काऊपेक्षा नि लिंबोणीच्या झाडामागे लपलेल्या चंद्रापेक्षाही मोठे झाले आहे. तुमच्या


जगात बसणारी, तुमच्या आवडीच्या विषयांची पुस्तके तुम्ही वाचली पाहिजेत. प्रत्येक पुस्तक तुम्ही वाचालच असे नाही. होतं असं, एखादं कोणी तरी सुचवलेले, फार गाजावाजा झालेले पुस्तक वाचून भ्रमनिरास झालेला वाचक बऱ्याचवेळा पुस्तकांपासून दूर जातो. पुन्हा तो कोणत्याच पुस्तकाच्या वाट्याला जात नाही. त्यामुळे प्रत्येक पुस्तक हा प्रत्येक जण वाचणार नाही, कारण आपल्या सगळ्यांच्या आवडी-निवडी वेगवेगळ्या आहेत, याचा स्वीकार करणे आवश्यक आहे.

काही वेळा आवडीच्या विषयाचे पुस्तक वाचत असतानाही त्यात व्याकरणाच्या इतक्या चुका असतात की ते पुस्तक वाचवतच नाही. काही वेळा छपाई सदोष असते. काही अनुक्रमणिका आणि पान नंबरही नसलेली पुस्तके वाचनात आली आहेत. काहींचे फॉन्ट इतके विचित्र असतात की ती पुस्तके पुढे वाचली जात नाहीत. यामुळेही काही वेळेला वाचक कायमचा दुरावतो. याची काळजी लेखक, प्रकाशक यांनी घेतली पाहिजे. मोबाईल, इंटरनेटमुळे वाचन कमी झाले आहे हे खरे असले तरीही या नव्या माध्यमांमुळे पुस्तके खूप ठिकाणी पोचू लागली हेही तितकेच खरे. आता कोणतेही पुस्तक कुठेही बसल्या बसल्या मागवता येणे सहज, सुलभ झाले आहे. पूर्वी ते पुस्तक मिळवणे, मागवणे किती अवघड होते? शिवाय आता या फोटो आणि एकंदरच समाजमाध्यमांवर काढल्या जाणाऱ्या मिरवणुकींच्या काळात, पुस्तक जत्रांना एक वेगळेच ग्लॅमर प्राप्त झाले आहे.

शिवाय, मोबाईलमुळे केवळ पुस्तकांचीच विक्री नाही तर थेटरमध्ये जाऊन सिनेमा पाहण्याचे प्रमाणही कमी झाले आहे. थेटर बंद पडत आहेत, नवीन पिढीत कोणीही सुपर स्टार्स निर्माण झालेले नाहीत. त्याच वेळी ओटीटी माध्यमाचा उदय होऊन लेखकांना कधी नव्हे एवढे महत्त्व प्राप्त झाले आहे या नव्या माध्यमात.

पूर्वीपेक्षा आता साक्षरतेचे प्रमाणही बरेच वाढले आहे. बऱ्याच घरात शाळेत गेलेली आणि पुस्तके हातात धरणारी ही पहिलीच पिढी आहे. हे वाचकच आहेत. त्यांची त्यांच्या आवडीच्या पुस्तकांशी गाठ घालून देणे आवश्यक आहे. ही मंडळी पुस्तके वाचतातच की! पण केवळ अमुक एक पुस्तक ग्रेट म्हणत जो आग्रह केला जातो त्यामुळे कदाचित ती दुरावत आहेत.

जगातील प्रत्येक श्वास घेणाऱ्या माणसासाठी अनेक पुस्तके आहेत. ती पुस्तके त्याच्या आवडीची आहेत. तो त्यांच्या प्रेमात पडेल अशी पुस्तके आहेत. साहित्य संमेलने, पुस्तक परिचय, अभिवाचन, समीक्षा, मुलाखती हे सर्वच प्रकार ह्या दोघांची भेट घडवून आणण्यासाठीच तर आहेत. ■●■


चपराक प्रकाशन
www.chaprak.com

## राजकीय आणि सामाजिक स्थित्यंतरांचे चित्रण

पुरोगामी विचारांना प्रेरणा देणारे हे पुस्तक प्रत्येक वाचकाने आपल्या संग्रही ठेवावे असे एक महत्त्वपूर्ण नाट्यमय सामाजिक चित्रण आहे.

डॉ. सोमनाथ मुटकुळे यांच्या लेखणीतून साकारलेल्या, समाजाला तटस्थपणे आरसा दाखवणाऱ्या 'चक्र', 'सावट' आणि 'जू' या तीन नाटकांचा प्रभावी संग्रह!

पाने ११२

आजच नोंदणी करा!

मूल्य २००/-

फोन पे / गूगल पे क्र. ७०५७२९२०९२

महत्वाचे : कृपया नोंदणीनंतर त्याचा तपशील आणि आपला पूर्ण पत्ता याच क्रमांकावर व्हाट्सऍप करावा.

# वीस 'गुणां'चा विषय



**श्वेता म्हसकर**
**मुंबई**
**भ्रमणध्वनी : ९९६७२०३५७९**

अगदी लहानपणापासून, म्हणजे सहावी-सातवीत असल्यापासून परीक्षा सुरू झाली की मनावर एक प्रकारचे दडपण यायचे. त्याआधी चौथी-पाचवीपर्यंत परीक्षांची इतकी समज नव्हती आणि तोपर्यंत मी अगदी हुशार विद्यार्थिनी होते (असे माझ्या आईचे तरी ठाम मत होते!) पण सहावी-सातवीपासून मुलांच्या मनात दहावीच्या बोर्डाची परीक्षा नावाच्या एका भूताची भीती घालण्याची पद्धत तेव्हापासूनच रूढ होती. मुले आतापासूनच अभ्यासाला गांभीर्याने लागतील, असा पालकांचा त्यामागे एक भाबडा समज असायचा. अर्थात, आम्हा मुलांचा अभ्यास हा कायम परीक्षेचे वेळापत्रक हाती आल्यावरच सुरू व्हायचा.

माझ्यासाठी मराठी, हिंदी, संस्कृत, इतिहास आणि भूगोल हे विषय फार काळजीत पाडणारे नव्हते. खरी भीती वाटायची ती विज्ञानाची आणि त्याहीपेक्षा जास्त गणिताची! गणिताचा पेपर समोर आला की, भरल्या परीक्षा हॉलमध्ये मला दिवसा तारे दिसायचे... जणू काही तो माझा स्वतःचा 'तारे जमी पर' प्रयोगच असायचा!

मुळात भाषेबद्दल कायमच प्रेम असल्यामुळे मराठी-हिंदी विषयांचा कधी त्रास झाला नाही पण या सगळ्यात माझा एक आवडता, छोटासा विषय असायचा तो म्हणजे नागरिकशास्त्र. इतिहास आणि भूगोलाच्या सोबतीने पाठ्यपुस्तकाच्या शेवटी अवघ्या काही पानांचा आणि २० मार्कांचा हा विषय! त्यावेळी वाटायचे, फक्त २० मार्कांसाठी हा विषय कशासाठी शिकवत असतील? पण आज जगाची समज आल्यावर मनापासून वाटते की, संपूर्ण देशातल्या प्रत्येकाला १०० मार्कांसाठी हा विषय पुन्हा-पुन्हा शिकवण्याची नितांत गरज आहे.

नागरिकशास्त्र म्हणजेच सिव्हील सायन्स याची सोपी व्याख्या सांगायची तर नागरिकांचे हक्क, कर्तव्ये आणि त्यांचे समाजातील स्थान व जबाबदाऱ्या यांचा अभ्यास. म्हणायला हा अभ्यास अगदी साधा-सुधा आणि सुबोध वाटतो पण आजूबाजूची सामाजिक परिस्थिती पाहिली की लक्षात येते, की त्याचे ज्ञान आपल्याला किती अपुरे पडत आहे.

आपण समाजात राहतो, त्यामुळे समाजाप्रती आपली काही प्राथमिक कर्तव्ये आहेत. त्यातले सर्वात महत्त्वाचे कर्तव्य म्हणजे स्वच्छता. ही स्वच्छता फक्त स्वतःच्या घरापुरती मर्यादित नसावी तर ती संपूर्ण परिसराची आणि सार्वजनिक ठिकाणांचीही असायला हवी. जगात आपण कुठेही असलो तरी ही शिस्त पाळलीच पाहिजे. दुर्दैवाने या साध्या विषयात आपला देश काहीसा मागासलेलाच वाटतो. आज जिथे-तिथे रस्त्यांवर प्लास्टिक पिशव्या, कागद, सिगरेटची थोटके आणि पानाच्या पिचकाऱ्या सहज दिसतात. सार्वजनिक शौचालयांबद्दल तर न बोललेलेच बरे!

लोक देशाच्या प्रगतीबद्दल किंवा सरकार आणि समाजाबद्दल तावातावाने गप्पा मारतात पण स्वतः मात्र सहज कुठेही कचरा फेकून देतात. त्यावेळी एक नागरिक म्हणून आपण स्वतः किती चुकीचे वागतोय, याची जाणीव त्यांना नसते. जेवण करणे किंवा अंघोळ करणे जशा सवयी आहेत, तसेच कचरा भिरकावणे ही देखील अनेकांची सवय झाली आहे.

एकदा माझ्यासोबत असेच घडले. एक ओळखीची व्यक्ती मला भेटली. गप्पा मारता मारता त्यांनी गाडीतून पाण्याची बाटली काढली, पाणी प्यायले आणि रिकामी बाटली सहजपणे मागच्या रिकाम्या जागेत फेकून दिली. मी त्यांना तात्काळ टोकले, ''अरे, तिथे कोपऱ्यात कचऱ्याचा डबा आहे ना!''

त्यावर ते अतिशय सहजपणे म्हणाले, ''अगं, नको काळजी करू (डोन्ट वरी), सकाळी सफाईवाले येतातच ना!''

मी काहीही न बोलता ती बाटली उचलून डब्यात टाकली; कारण आपण कचरा करतोय ही जाणीवच जर त्यांच्या मनात नसेल तर त्यांना काहीही बोलणे म्हणजे मूर्खपणाच होता. म्हणूनच परिसर स्वच्छ ठेवणे हे आपले प्रथम कर्तव्य आहे, हे नागरिकशास्त्रातून पुन्हा एकदा ठसवण्याची गरज आहे.

जागोजागी असणाऱ्या खाऊ गल्ल्या किंवा भाजी मार्केट यांचे रात्रीचे चित्र पाहिले की खूप वाईट वाटते. जिथे तुम्ही



तुमची भाकरी कमावता, ती जागा स्वच्छ करून जाणे हे तुमचे कर्तव्य नाही का? काही ठिकाणी लोक स्वच्छता राखतातही पण बहुतांश ठिकाणी परिस्थिती अत्यंत गलिच्छ असते. आश्चर्य म्हणजे, लोकांनी घाण करू नये म्हणून भिंतींवर देवांचे फोटो लावले जातात पण आपल्या परिसराच्या कणाकणात देव आहे, ही जाणीव आपल्याला का होत नाही? स्वच्छता ही केवळ एका व्यक्तिची किंवा प्रशासनाची जबाबदारी नाही, ती आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे.

प्लास्टिक पिशव्यांमुळे मुंबईत आलेले महापूर आपण पाहिले आहेत पण आपण धडा घेतलेला नाही. प्लास्टिकचा वापर कमी करणे आणि घरातच ओला व सुका कचरा वेगळा करणे, हे तर आपल्याच हातात आहे. अनेक संस्था प्लास्टिकच्या पुनर्वापरासाठी (रियुझ) पुढाकार घेत आहेत, त्यात सहभागी होणे अजिबात कठीण नाही.

स्वच्छता ही आपल्याकडून आपसूक घडणारी गोष्ट व्हायला हवी. अस्वच्छता करणाऱ्याला सांगायला गेले तरी मोठी पंचायत होते. काही लोक ऐकतात पण काही जण ''तू कोण मला सांगणारा?'' किंवा ''मी एकट्यानेच केलंय का? बाकीचे पण तेच करत आहेत ना!'' अशी बालिश कारणे देऊन भांडायला येतात. एखाद्याला समजावून सांगताना आपण आपली सद्सद्विवेक बुद्धी गमावून बसतो की काय, असे वाटते. हल्ली तर रस्त्यावरच्या भांडणाचे व्हिडिओ काढून ते पोस्ट करण्याचा एक वेगळाच प्रकार सुरू झाला आहे. अशा पत्रकारितेबद्दल बोलायचे झाले तर एक वेगळे प्रकरणच लिहावे लागेल!


आज आपण पाश्चात्य संस्कृतीचे अंधानुकरण करतोय पण तिथली शिस्त मात्र घेत नाही. परदेशातील वेस्ट मॅनेजमेंट आणि सार्वजनिक स्वच्छता खरंच कौतुकास्पद असते. एखादी जागा किंवा तिथली माणसे यांची पर्सनल स्पेस आणि शांतता जपली पाहिजे, हे आपले कर्तव्य आहे. भारतात तर शांतता या शब्दाचा विचार मिरवणुका आणि रॅलीमध्ये अजिबात केला जात नाही. मोठ्या आवाजात डीजे लावणे, फटाके फोडणे आणि प्रचंड घाण करणे म्हणजे आनंद व्यक्त करणे, अशी एक विचित्र विचारसरणी समाजात पसरली आहे. सत्ता आणि पैशाच्या जोरावर हवं तसं वागणाऱ्या लोकांमुळे मला पुन्हा पुन्हा त्या नागरिकशास्त्र विषयाची आठवण येते.

सण साजरे करणे चुकीचे नाही पण ते करताना प्रदूषण टाळून आणि शिस्तीत केले तर कोणाचीच हरकत असणार नाही. संपूर्ण देशासाठी शिस्त हा एक अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. रांगा मोडून पुढे जाणे, ट्रेनमध्ये धक्काबुक्की करणे या गोष्टी लोकसंख्येचा भार म्हणून मान्य केल्या, तरीही शिस्तबद्ध पद्धतीने त्या नक्कीच सुधारता येऊ शकतात. यासाठी कोणत्याही विशेष प्रशिक्षणाची गरज नाही, फक्त 'हा माझा देश आहे आणि त्याची शिस्त मी राखली पाहिजे' ही भावना रुजणे गरजेचे आहे.

रस्त्यावर थुंकताना आपण विसरतो की, तो रस्ता आपल्याच पैशातून तयार झाला आहे. रेल्वे प्रवासात एक साधी पिशवी सोबत ठेवून त्यात आपला कचरा जमा केला आणि स्टेशनवरच्या डब्यात टाकला तर आपण कितीतरी घाण कमी करू शकतो. मुंबईसारख्या शहरात पार्किंगचा तर मोठा स्वैर कारभार सुरू असतो. मोठी गाडी रस्त्यात कुठेही उभी करून गायब होणाऱ्या लोकांमुळे ट्रॅफिक जाम होतो आणि इतरांना त्रास होतो. पार्किंगची जागा कमी आहे हे मान्य केले तरी आपला सिविक सेंस वापरून आपण इतरांना होणारा त्रास नक्कीच कमी करू शकतो.

नागरिकशास्त्र म्हणजे फक्त कर्तव्येच का? मग हक्कांचे काय? असा प्रश्न अनेकांना पडेल. हक्क मिळायलाच हवेत, त्याबद्दल दुमत नाही पण आपण आपली कर्तव्ये पार पाडायला सुरुवात तर करूया! हक्कांची लढाई सुरूच राहील पण कर्तव्यांमुळे जर आपले जीवन सुखकर होणार असेल तर सुरुवात स्वतःपासून का नको?

चला, आपण एक उत्तम नागरिक बनूया. नागरिकशास्त्र हा विषय परीक्षेसाठी २० मार्कांचा असला तरी तो व्यवहारात पक्का असणे आपल्या आणि देशाच्या प्रगतीसाठी खूप महत्त्वाचा आहे. हो की नाही?



# कुपोषण

चार दोन कविता लिहून झाल्यावर
तीन-चार कविता करणारे दगड घेऊन
बरीच मंडळी मांडत असतात आपापल्या चुली
मग घातली जातात त्यात शब्दांची लाकडं
कधी अर्धवट वाळलेली लाकडं करतात नुसताच
स्वतःच्या व्यक्तिगत घटनाकल्लोळांचा
सार्वजनिक धूर.
नाही तर नुसताच मोठा जाळ करून
जळून जातात भर्रकन
कधी राजकारणाच्या तव्यावर
नुसत्याच उडत राहतात काव्याच्या ठिणग्या
कविता राहून जातात अर्ध्या कच्च्या
करंट अफेयर्सच्या भांड्यात शिजवतात
काही जण भावनांचे पीक
भडकाऊ कविता बऱ्या वाटतात श्रोत्यांना
कधी कधी बनवतात कोणी कोणी
अत्याधुनिक शब्द वापरून चविष्ट सामाजिक विचारांचे
ओरिजिनली निःसत्त्व तत्त्वज्ञानाचे डेझर्ट
आणि ठेवतात समीक्षकांच्या पुढ्यात
मग समीक्षकही भाजून घेतात
अशा कवितांच्या तव्यावर
आपल्या प्रसिद्धीची पोळी
राहून जाते कवितेचे पोषण.

लोकही खातात ओरपून कधीकधी
क्रांतिकारी, दलित, ग्रामीण, वंचित,
शोषित शब्दांनी बनवलेला
राष्ट्रभक्ती आणि शत्रूनिंदेचे वाटण असलेला
मसालेदार कवितेचा रस्सा आणि
साहित्यिक देतात तृप्तीचा ढेकर

अधिमधी दांभिक भक्तीत बुडवलेले
धार्मिक कवितांचे गुलाबजाम बनवून
प्रसाद म्हणून वाटणारे
महान बनू पाहणारे बरेच असतात कवी
काही प्रस्थापित कवीही
आपण आणि आपली कविता चिरतरुण आहे
हे शाबित करण्यासाठी
लैंगिक भावनांचे बेदाणे पेरून
केवीलवाण्या प्रेमकवितांची
शुगरफ्री खीर वाटण्यात मग्न असतात.
जड पांडित्यपूर्ण शब्दांचे कांदे वापरून
अलंकारिक तेलात तळलेली
कुरकुरीत अनाकलनीय कवितांची भजी
आयुष्यभर तळत राहतात काही कवी
त्यामुळे खऱ्या कल्पक कवितांचा
वाढत राहतो न्यूनगंड.

निसर्ग कवितेच्या नावाखाली
त्याच त्याच सूर्य चंद्र ताऱ्यांचा
पानाफुलांचा पाचोळा
लुसलुशीत मुलायम हिरवे सॅलेड म्हणून सजवून
निसर्ग कविता म्हणून
रसिकांच्या पुढ्यात ठेवतात काही कवी.
कविता तर आपोआप होते
असा डांगोरा पिणाऱ्या डोकेबाज कविता
नाही देऊ शकत हृदयाची ऊब
आणि वाढत राहते कवितेचे कुपोषण.

माझ्यासारखा एखादा
स्वतःला व्हर्सटाईल समजणारा कवी
कालजयी आणि लोकजयी नावाच्या
तागड्या असलेला तराजू घेऊन
खरी कल्पक संवेदनशील कविता शोधत राहतो
टोलवला जातो तो या कंपूकडून त्या कंपूकडे
मग कुठल्या तरी चुलीच्या राखेत
स्वतःला घेतो काळं करून तो
भस्म लावल्याच्या आवेशात नंतर
तोही लिहायला लागतो
वडे आणि मिसळीसारख्या ब्रँडेड कविता
असेच होत राहते अभिजात कवितेचे कुपोषण.

**– अपर्णा कडसकर,** बाणेर, पुणे.
भ्रमणध्वनी : ९६५७७१२५००

# गर्दीत हरवलेला माणूस



**त्या दिवशी शनिवार होता. आठवड्याची सांगता म्हणजे प्रचलित इंग्रजी शब्द विकेंडचा वार असल्याने पतीसोबत फेरफटका मारायला बाहेर पडले. इथे मुंबईत रस्त्यावर वाहनांची गर्दी एवढी असते की चालणाऱ्या माणसाला रस्ताच सापडत नाही. त्यात घरापासून कमी अंतरावर कुठे फिरायला जायचे म्हटले, तर येऊन–जाऊन एकच जागा उरते, ती म्हणजे फूड मॉल.**




**कस्तुरी देवरूखकर**
मुंबई
**भ्रमणध्वनी : ८२९१११४९९९२**



आता तुम्ही म्हणाल, हे तर श्रीमंती चोचले वगैरे! तर आमच्या इथे जो फूड मॉल आहे, तिथे जाऊन काहीही न विकत घेता नुसते तास-दीड तास मठ्ठासारखे बसले तरी तुम्हाला त्या जागेवरून कोणीही उठवायला येत नाही आणि तिथे बसायला एक रुपयाही लागत नाही. तर विकेंड असल्याने प्रचंड गर्दी होती. काही वेळ रेंगाळल्यानंतर आम्हाला निवांत बसायला जागा मिळाली. मी सहज आजूबाजूला न्याहाळत होते. एवढा माणसांचा जत्था एका छताखाली असूनदेखील सर्वच जण एकमेकांपासून अलिप्त राहण्याचा प्रयत्न करत होते. मग मलाही एकटेपणा जाणवला.

अर्थार्जनासाठी गावाहून शहरापर्यंतचा प्रवास करताना, 'इथल्या महाकाय गर्दीत माणूस हरवून गेलाय, हेच खरे' असे मनात आले. हे शॉपिंग मॉल म्हणजे पारंपरिक जत्रेचे आधुनिक स्वरूप आहे, असे ऐकले होते परंतु मोकळ्या मैदानावर विखुरलेल्या जत्रेची जी सर असते ती या वातानुकूलित, अद्ययावत

सोयींनी सुसज्ज टोलेजंग वास्तूला येत नाही. ही झाली नाण्याची एक बाजू. दुसरी बाजू मात्र एकटेपणाचा समान धागा असला तरी परिस्थितीने पूर्णपणे विरुद्ध आहे. शहरात गर्दीत बसूनही एकटेपणा जाणवतो, हे खरे असले तरी आजच्या स्पर्धेच्या युगात माणूस एकांतात बसला तरीही शांत नसतो. याचे कारण त्याच्या अंतर्मनाच्या गहिऱ्या ढोहात विचारांच्या व विवंचनांच्या असंख्य दगडांचा सतत भडिमार होत असतो. त्या गहिऱ्या पाण्यात निर्माण झालेले तरंग पुढे लहरींचे रूप घेतात आणि मनातील कोलाहल अधिकच वाढवतात. थोडक्यात, मनाच्या आत एक प्रकारचा अखंड गोंगाट सुरू असतो. त्यातलाच आणखी एक प्रकार : डिजिटल जगात हरवलेला माणूस..

हल्ली समाजमाध्यमांवर शेकडो लोक मित्रयादीत असतात. लाईक, कमेंट, शेअरचा सारा खेळ चालू असतो. असे असूनही प्रत्यक्षात कितीसे लोक एकमेकांच्या संपर्कात असतात? याच कारणामुळे तर त्याला आभासी जग म्हटले आहे.

बोलायचे खूप असते परंतु ऐकून घेणारी योग्य व्यक्ती सापडत नाही अशी अवस्था आपण अनुभवत आहोत कारण या आभासी जगात विश्वासाचा धागा कमकुवत झालेला आहे. या गर्दीत आपण कितीही टाहो फोडला तरी आपल्या व्यथा कोणाला ऐकू जातील की नाही, याची शाश्वती नसते आणि जर ऐकू गेल्याच तर समोरची व्यक्ती त्याचे भांडवल करून आपल्यालाच गोत्यात आणेल काय! ही भीती सतावत असते.



स्टेटस, रिल्सच्या काळात कोणाची प्रत्यक्ष उपस्थिती उरलेली नाही. जे आहे ते फक्त हातामधल्या विजाणवीय म्हणजेच इलेक्ट्रॉनिक उपकरणांपुरते मर्यादित आहे. या यांत्रिकी जगात एक प्रकारची जीवघेणी स्पर्धा लागलेली असते. दुसऱ्याच्या कलागुणांचे कौतुक करतानाही ''आपण कुठे कमी आहोत? त्याच्यापेक्षा आपणही कमी नाही, हे दाखवून देऊ'' ही ईर्ष्या मनात उत्पन्न होते. इथे असणारे अनुनयायी अर्थात फॉलोअर्स हे नावालाच असतात; उलटपक्षी तेच तुमचे स्पर्धक असतात. औपचारिक नात्यांमुळे पुन्हा एकटेपणा येतो. त्यायोगे ओळखीच्या गर्दीतून येणारा आपुलकीचा दुष्काळ अनुभवास येतो. कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडताना स्त्री आणि पुरुष दोघांचीही खूप दगदग होते. जबाबदार पालक, कर्मचारी, मैत्री, कुटुंबीय, सुजाण नागरिक अशा अनेक पातळ्यांवर भूमिका साकारताना गर्दीच्या विळख्यात आपण स्वतःलाच हरवून बसलो आहोत. माझे अस्तित्व, मला नेमके काय साध्य करायचे आहे, ही स्पर्धा कोणी सुरू केली, आपण त्याचा भाग का आहोत...! अशा प्रकारचा सखोल विचार करायला वेळच कुणाकडे आहे!

खरे जगणेच विसरल्याने अंतर्मनाशी संवाद तुटत चालला आहे. हे सगळे करायला कोणी भाग पाडलेले नाही; माणूस आपसूकच या स्पर्धेत ओढला गेला आहे. त्यामुळे इथे थांबवणारे कुणीच नाही.आधी गरजा, कर्तव्य आणि त्यानंतर कधीतरी आवड, स्वप्ने, लेखन, कला वगैरे अशी जीवनशैली झाल्याने भावनांचा निचरा व्हायला वेळ लागत आहे.

या सगळ्या गर्दीत हरवलेला माणूस शोधायचा आहे. तो माणूस तुमच्याच आत दडलेला आहे. प्रत्येकाच्या मनातला आवाज, आत्मारामाची खरी ओळख... जो या नश्वर देहाला सांभाळत आहे. नुकतीच देशाने एक दुर्दैवी घटना पाहिली, ज्यामध्ये राज्याच्या उपमुख्यमंत्र्यांचा विमान अपघातात मृत्यू झाला. जीवन क्षणभंगुर असते, हे सिद्ध करणारीच ही घटना आहे. आयुष्य अधूनमधून असे धक्के देत असते, जेणेकरून एकमेकांवर कुरघोडी करत भावनाशून्य होऊन जगणाऱ्या माणसाला नियतीच्या खेळाची जाणीव व्हावी. सरतेशेवटी, गर्दीत हरवलेला माणूस शोधताना... गर्दी माणसांची नसून, देहातल्या, पिंडातल्या विषयांची आहे; अपेक्षांची आहे; जबाबदाऱ्या, भूमिका, मतमतांतरे यांची आहे. क्षणभर थांबून स्वतःलाच विचारा, ''गर्दीत असूनही अलिप्त राहिलो तर अडले कुठे? करत राहिलो संवाद स्वतःशी तर बिघडले कुठे?''

■●■




# संस्मरणीय, दखलपात्र

# कलकत्ता बुक फेअर २०२६



**विलास पोतदार**
**वैशाली प्रकाशन**
**९८९०९३३७९०**

**कलकत्ता बुक फेअर या पुस्तक प्रदर्शनाविषयी खूप काही ऐकलेलं होतं. एकदा प्रत्यक्ष जाऊन बघावं असं ठरलं. यावर्षी जायचंच. मागच्या वर्षी जयपूर लिटरी फेस्टला भेट देऊन झाली होती. तिथं जाणवलं तिथे 'बुक सेलिंग' हा प्रकार नव्हता. तेथे फक्त साहित्य, कला, संगीत चित्रपट व इतर कला यावर बौद्धिक चर्चा व ऐकणारे लोक हे त्या संमेलनाचे वैशिष्ट्य.**

आता यावर्षी कलकत्त्याला बुक फेअरला निघालो. जायचा उद्देश पुढच्या वर्षी स्टॉल लावावा हा सुद्धा मनात होता. बरोबर ज्योति स्टोअरचे संचालक वसंतराव खैरनार हे होते. मग आम्ही दोन्ही माळकरी (पुस्तकाचे) निघालो. एक महिना आधीच विमानाचे बुकिंग करून घेतले होते. त्यामुळे जरा आर्थिकदृष्ट्या सोयीचे झाले. ठरलेली तारीख आली. सकाळचे फ्लाईट असल्यामुळे रात्री अकरा वाजताच निघालो. नेहमीप्रमाणे फ्लाईट वेळेत होते. सकाळी नऊ वाजता डॉ. सुभाषचंद्र बोस आंतराष्ट्रीय विमानतळावर पोहोचलो.

विमानतळावर उतरल्यावर टॅक्सीत बसलो. रस्त्यावर इकडे तिकडे पाहू लागलो. आपल्या महाराष्ट्रातील सवयीप्रमाणे ग्रंथ प्रदर्शन जाहिरातीचे कुठे बॅनर, कुठे कमानी लागलेल्या आहेत का? एवढ्या मोठ्या शहरात कुठेही मला ग्रंथ प्रदर्शन आहे याची खूप मोठी जाहिरात दिसली नाही. बरोबर वसंतराव होते. त्यांना म्हणालो, ''एवढे मोठे प्रदर्शन! कुठे जाहिरात, बॅनर काही दिसत नाही!''

''अहो पोतदार जाऊ द्या! आपण प्रदर्शन बघायला आलोय, पुस्तक विकायला नाही.''

मनातच मी म्हटले या प्रदर्शनाचे




काही खरे दिसत नाही. जाहिरातीचे बॅनर नाहीत, कमानी नाहीत. काय हे पुस्तक प्रदर्शन असेल? ठीक आहे. माझे मन म्हणाले, जरा शांतीला पकड.

सकाळी नऊला पोहोचलो. हॉटेलला एक वाजता एन्ट्री होती. आता प्रश्न आला कुठे जावे? हॉटेलमध्ये बॅग वगैरे ठेवल्या. बाहेर निघालो. सेक्टर फाईव्ह, साल्ट लेक या कलकत्त्यातील उच्चभ्रू वस्ती असणाऱ्या परिसरात आमचे हॉटेल होते. चला एक वाजेपर्यंत वेळ आहे, जरा बाहेर फेरफटका व नाश्ता बंगाली कुठे मिळतो का बघू...

बॅगा ठेवून निघालो फिरायला. हॉटेलमधील वेटरला विचारून घेतले, कुठे जायचे! त्याने तोंडी थोडे फार मार्गदर्शन केल्याप्रमाणे निघालो. फिरत असताना मी वसंतराव खैरनार यांना म्हणालो, ''इथे मला खूपच तरुण मुली सिगारेट पिताना दिसतात.''

''नाही हो! तुमचं चुकतं. थोड्या फार मुली सर्व शहरात सिगरेट पितात.'' मी शांत बसलो.

त्यांनी मी बोलल्यावर निरीक्षण सुरू केले. मग ते म्हणाले ''मला तुम्ही जे म्हणता ते बरोबर वाटतं. येथे तरुण मुलामुलींमध्ये सिगारेट पिण्याचे खूप मोठे प्रमाण दिसते.''

कदाचित आमचे निरीक्षण थोडे फार चूक असू शकते. थोडाफार बंगाली ब्रेकफास्ट करावा असं वाटलं. परत इडली, डोसाने घात केला. मग हाच नाष्टा करून लॉजला आलो. फ्रेश होऊन एक वाजता निघालो. सॉल्ट लेक या परिसरात करुणामइ या कलकत्ता शहराच्या मेट्रोच्या स्टॉपजवळ हे अवाढव्य ग्रंथ प्रदर्शन आम्हाला पसरलेलं दिसलं. साधारणतः नंबर एक ते नऊ प्रवेश गेट होते.

पहिला दिवस असल्यामुळे मनात गोंधळच होता. सुरुवातीला आम्ही मुख्य प्रवेश द्वाराजवळ जाऊन एक फोटो काढला. म्हणजे आता अधोरेखित झाले, घरच्या व बाहेरच्या लोकांसाठी पुरावाही झाला की आम्ही ग्रंथ प्रदर्शनासाठीच येथे आलो आहोत. बंगाली भाषेचे पुस्तक स्टॉल दिसत होते.

मी प्रकाशक व जोडीदार पुस्तक विक्रेता. दोघंही पुस्तकं बघत होतो. वसंतराव खैरनार पुस्तक विक्रेते असल्यामुळे ते किंमत, डिस्काउंट, रोख का... क्रेडिट किती दिवसाचे? विचारत होते. मी प्रकाशक असल्यामुळे पुस्तकाचा कागद, पुस्तकाची बांधणी, प्रिंटिंग, पुस्तकाचं ले आउट, कव्हर हे सगळं बघत होतो. स्टॉल बघत बघत पुढे जात होतो. बंगाली पुस्तकांच्या कागदाचा, पुस्तक बांधणीचा दर्जा खूपच चांगला वाटला. बरीचशी पुस्तके पुठ्ठा बांधनीमध्ये होती. थोडे फिरल्यानंतर आम्हाला त्या संपूर्ण परिसराचा नकाशा प्राप्त झाला. प्रदर्शन हे इंटरनॅशनल असल्यामुळे यावर्षी अर्जेंटिना या देशावर फोकस करण्यात आलेला होता. अर्जेंटिना, जर्मनी, फ्रेंच पेरू, रशिया, इंग्लंड, युक्रेन इत्यादी देशांचे स्टॉल या प्रदर्शनात होते. युक्रेन देशाच्या स्टॉलवर गेल्यावर तेथील एक महिला इंग्रजीत सांगत होती की रशिया आमच्यावर कशाप्रकारे अत्याचार करत आहे. हे सर्व शांततेत ऐकून घेतलं. याच्याशिवाय एक मराठी गरीब बिचारा प्रकाशक काय करू शकतो?

तीन-चार वर्षांपासून बंगाली भाषा व इंग्रजी भाषा यांचे स्टॉल वेगळे करण्यात आलेले होते. आम्ही नकाशाप्रमाणे फिरायला सुरुवात केली. पहिला दिवस असल्यामुळे तसेच बरेच जागरण असल्यामुळे पहिल्या दिवशी थोडे लवकर आवरून आम्ही लॉजवर परतलो. थोडा पाण्याच्या बदलामुळे सर्दी, खोकला असल्यामुळे खोकल्याचे औषध घेतले आणि झोपलो.

दुसऱ्या दिवशी घरच्या देवीच्या आदेशाप्रमाणे सकाळी लवकर उठून पश्चिम बंगालच्या मुख्य देवता कालिकामातेचे दर्शन घेतले. प्रार्थना केली की घरच्या देवीला शांतता लाभू दे आणि आम्हालाही. दर्शन घेऊन बारा वाजता करुणामई या ग्रंथ प्रदर्शन स्थळी टॅक्सीने पोहोचलो. बारा वाजेपासून रात्री आठ वाजेपर्यंत पूर्ण वेळ स्टॉल बघून सुद्धा आमचे पूर्ण स्टॉल

बघून झालेले नव्हते. मी ऐकले होते की येथे लोकं पुस्तकांसाठी लाईनी लावतात. खरोखरच सायंकाळी आम्ही तिथली गर्दी बघितली आणि लक्षात आले की आपण महाराष्ट्रातील प्रकाशक आपल्याच मराठी पुस्तकांच्या भाषेच्या धुंदीत राहतो. ७०० स्टॉलही आपल्याला जास्त होतात. थोडं वाईट वाटलं तरी चालेल पण मला असं वाटतं हे प्रदर्शन पुणे बुक फेस्टपेक्षा नक्कीच मोठे आहे. तुलनात्मक बाबीत काही कमी जास्त होऊ शकतात. पुणे बुक फेस्ट प्रदर्शनात असणारा नेमकेपणा, टापटीप, स्वच्छता, नियोजन, प्रदर्शनात असणारा रिचनेस इथे मात्र दिसत नाही. स्टॉल आहे, गर्दी आहे, लोक आहेत, खरेदी आहे परंतु पुन्हा बुक फेस्टला जो एक रिचपणाचा लुक दिसतो तो येथे दिसत नाही.

ग्रंथदालनांमध्ये फिरताना पुस्तकांच्या स्टॉलचे जर निरीक्षण केले तर प्रत्येकाने आपल्याला जागा मिळाल्याप्रमाणे आपल्या मनाप्रमाणे स्टॉल बांधून घेतले आहेत. त्यामुळे त्या प्रदर्शनात एकसंघता दिसत नाही. या सर्व प्रदर्शनात बंगाली भाषेचा संपूर्ण प्रभाव होता हे प्रकर्षाने जाणवते. बंगाली भाषेच्या पुस्तकांना डावलून इतर भाषेची पुस्तके खास करून इंग्रजी भाषेची पुस्तके प्रभावी ठरत आहेत असे दिसले नाही. बंगाली भाषेबरोबर लोकं त्याच उत्साहाने इंग्रजी भाषेचीही पुस्तके घेत होती. त्यांचा पुस्तक घेण्याचा जो विचार होता तो दोन्हीही भाषांचा अभ्यास व्हावा हा असावा. बंगाली भाषेबरोबरच इंग्रजी भाषेच्या स्टॉलला खूप मोठी गर्दी होती. ऑक्सफर्ड प्रकाशन, रूपा प्रकाशन, पेंग्विन प्रकाशन यांच्या ग्रंथ दालनाला इंग्रजी पुस्तके घेण्यासाठी लोकांच्या रांगा लागल्या होत्या. एक प्रकर्षाने जाणवले की तिथे एक मोठा मंडप दिलेला होता. ज्यांची कमी म्हणजे तीन-चार पुस्तके प्रकाशित झालेली आहेत अशा लेखक, छोटे मासिकवाल्यांसाठी. ज्यांची पुस्तक संख्या कमी आहे अशा लोकांसाठी त्यांनी जवळजवळ अखंड एक टेबल स्पेस असे २०० टेबल दिलेले होते. तिथे त्यांना कोणत्याही प्रकारचे भाडे नव्हते. ही खूप मोठी मोफत व्यवस्था होती.

सांस्कृतिक कार्यक्रमांच्या बाबतीत जर म्हटले तर चार-पाच ओपन स्टेज होते आणि चार-पाच बांधलेले स्टेज होते. बंगाली संगीत, नाट्य, नृत्य या कलेला या दहा प्रकारच्या स्टेजवर खूप मोठ्या प्रमाणात सादरीकरणासाठी सोय करून देण्यात आलेली होती. फूड स्टॉलच्या बाबतीत सांगायचं तर ग्रंथ प्रदर्शनाच्या चारी बाजूला खूप मोठ्या प्रमाणात स्टॉलवाले यांना स्पेस देण्यात आला होता किंवा कदाचित फूड स्टॉलवाल्यांनी स्वतःची व्यवस्था निर्माण करून घेतली असवी परंतु तिथेही खूप मोठ्या प्रमाणात गर्दी होती.

ममता बॅनर्जी माननीय मुख्यमंत्री पश्चिम बंगाल यांच्या पुस्तकांचा फुलांनी सजवलेला एक स्टॉल होता. बांबूचा वापर करून १००० स्क्वेअर फुटाचा तो स्टॉल असावा. तिथे ममतादीदींची पुस्तके लावलेली होती. आम्ही तेथे विचारले, ''ममता बॅनर्जींचे दहाएक पुस्तके आहेत का?'' तर तिथल्या आयोजकाने आम्हाला सांगितले की, ''ममता बॅनर्जींनी तीनशे पुस्तके बंगाली भाषेत व ४० पुस्तके इंग्रजीत लिहिलेली आहेत.''

आता त्याने सांगितलेले ते सांगतो आहे. आम्ही कन्फर्म केले नाही परंतु एखाद्या राज्याचा मुख्यमंत्री त्याच्या नावावर इतकी पुस्तके असतील तर तो ग्रंथ महोत्सव मोठा असणारच यात शंका नाही.

मी तिथे ज्योती बसू यांचे चरित्र मला करायचे असल्यामुळे इंग्रजी, बंगाली भाषेत बराच तपास केला परंतु मला हे पुस्तक येथे मिळाले नाही व कारण सांगता येणार नाही. या प्रदर्शनात योगायोगाने आम्हाला नासिक येथील मराठा विद्या प्रसारक शिक्षण संस्थेचे शिक्षण अधिकारी माननीय भास्कर ढोके भेटले. मग त्यांनी आम्हाला पश्चिम बंगाल येथील झारमुरेबाबत बरीच माहिती दिली व स्वतः झारमुरे यांची भेळ घेऊन आले. तसेच खास करून एका तिथल्या फिशविषयी सांगितले. जो फिश गंगेच्या खोऱ्यात मिळतो. घाईमुळे या फिशचा आम्हाला आस्वाद घेता आला नाही. त्यांच्याबरोबर त्याच दिवशी नाशिक जिल्हा मराठा समाज विद्या प्रसारक संस्थेचे नितीनभाऊ ठाकरे सुद्धा या प्रदर्शनास भेट देण्यास आलेले होते. आमची भेट आम्हाला लवकर निघायचे असल्यामुळे होऊ शकली नाही.

एकंदरीतच या ग्रंथ प्रदर्शनाचा आवाका खूप मोठा आहे. तेथील पब्लिशर अँड बुक सेलर गिल्ड या संस्थेच्या ऑफिसला भेट दिली. त्यांनाही आम्ही सांगितले की, नेक्स्ट इयरला आम्हाला येथे ग्रंथदालन घेण्यात इंटरेस्ट आहे. त्यांनी आम्हाला आनंदाने सर्व माहिती दिली. डिसेंबरमध्ये येऊन तुम्ही मेल करून इथे स्टॉल घेऊ शकता, असे सांगितले.

एकंदरीत सर्व ग्रंथ प्रदर्शन फिरून ग्रंथ प्रदर्शन, ग्रंथ व्यवहाराविषयी माहिती करून घेण्याचा, कलकत्ता बुक फेअरला जाण्याचा आमचा उद्देश होता आणि अशा प्रकारचे नासिकम ध्ये काही करता येईल का? असा आमचा उद्देशही आहे. बघू आमच्या प्रयत्नांना किती साथ मिळते. इथे तुलना केली पुणे वाईट, कलकत्ता चांगले असे नाही तर कुठे काय कमी, कुठे काय चांगले हे सांगणे गरजेचे होते. कोणालाही कमीपणा आणणे हा उद्देश नाही, तर त्यात भर घालणे एवढेच.

पुन्हा एकदा पुणे बुक फेस्ट नियोजनात एक नंबर आहे परंतु अजूनही त्यात बऱ्याच चांगल्या गोष्टी वाढवता येण्यासारख्या आहेत. त्यामुळे हे प्रदर्शन अजून रिच होईल.

■●■

आटपाट नगर होतं. त्या नगरीचे नाव होते चंद्रवती. तेथे कोणत्या राजाने राज्य केले ते माहीत नाही परंतु त्या नगरीवर पूर्वापार चंद्रावतीने मात्र राज्य केले आणि आजही तेथे चंद्रावतीचेच राज्य आहे. चंद्रावतीच्या मायेच्या पदराखाली तेथील जनता आजतागायत गुण्यागोविंदाने, सुख समृद्धीने नांदत आहे. ती चंद्रावती म्हणजेच ब्रह्मगिरी पर्वतावर उगम पावून नाशिकमधून दक्षिणेकडे पंचवीस किलोमीटर वाहत आलेली, दक्षिण गंगा म्हणून ओळखली जाणारी गोदावरी नदी होय. येथे मोठ्या भूपृष्ठाला वळसा घालत गोदावरीने प्रतिपदेपासून वाढत जाणाऱ्या चंद्राच्या आकाराप्रमाणे रुप घेतले आहे आणि म्हणूनच गोदावरीला चंद्रावती नावाने येथे ओळखले जाते. म्हणून गोदामाईच्या कुशीत बसलेल्या या नगरीलाच चंद्रावती नगरी हे नाव पडले. पुढे चंद्रावतीचा अपभ्रंश होऊन चांदोरी हे नाव प्रचलित झाले. हेच माझे गाव चांदोरी. येथे अजूनही हुकूमत चालते ती या चंद्रावती राणीची म्हणजे गोदामाईची!



# चंद्रावती

चांदोरी हे गाव निफाड तालुक्यातील क्षेत्राच्या दृष्टीने सर्वात मोठे गाव म्हणता येईल. मोठा पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक परंपरांचा वारसा लाभलेले माझे चांदोरी गाव कायमच वैभवसंपन्न राहिले आहे. गोदामाईच्या एका काठावर चांदोरी तर पलीकडच्या काठावर पंचक्रोशीतील बाजारपेठ असलेले



**सुरेखा बोऱ्हाडे**

नाशिक

९१५८७७४२४४


सायखेडा गाव वसलेले आहे. जणू दोघे भाऊ-बहीण.

माझ्या लहानपणी वडील सायखेडा येथील मराठा विद्या प्रसारक समाजाच्या हायस्कूलमध्ये शिक्षक असल्याने आम्ही राहायला सायखेडा येथे होतो पण आमची शेती आणि एकत्र कुटुंब चांदोरीमध्ये सुकेना रोड येथे होते. तेव्हा दर रविवारी आणि प्रत्येक सुट्टीत आम्ही चांदोरीला मळ्यात जात असू ते गोदामाई पार करून. सायखेडा-चांदोरी या दोन्ही गावांना जोडणारा एक दगडी पूल होता.



त्या पुलाला सर्व फरशी म्हणत. फरशीवर गुडघ्याइतके पाणी असेल तर ती पार करून चांदोरीला जाता येत असे. त्यापेक्षा जास्त पाणी असेल तर मात्र मोठी नाव होती. तिच्यातून लोक नदी पार करीत असत. नावेच्या एका बाजूला लाकडी घोडा होता. त्या घोड्याच्या मानेवरून नावाडी मोठा दोरखंड ओढत नाव पैलतीरी आणत असे. हा प्रवास अगदी रोमांचकारी असे. अगदी स्तब्ध, शांत बसून गोदामाईच्या भव्य प्रवाहातीलहा नौकाप्रवास माझा अतिशय आवडीचा होता. नावेने पैलतीर गाठल्यावर नावेतून काठावर लाकडी फळी लावली जायची. त्या फळीवरून तोल सांभाळत आम्ही मुलं पटापट काठावर उड्या मारत असू. मोठी लढाई जिंकल्याच्या आविर्भावात आम्हा मुलांची स्वारी वडिलांबरोबर चिंचबनातून प्रथम येत असे ती चांभारबाबांच्या दुकानात. घारे डोळे, गोऱ्या रंगाचे, ठेंगणे असे चांभारबाबा आम्हा सर्व भावंडांची आस्थेने चौकशी करायचे. कितवीत शिकते वगैरे... वगैरे...! वडील त्यांच्याकडून कधी नवीन जोडे घेत तर कधी चप्पल दुरुस्त करून घेत. या कामाचे पैसे काही द्यायचे नाही. तेथून आमचा मोर्चा तेली काकांच्या दुकानात निघायचा. पान खाऊन रंगवलेले तोंड आणि झुकेदार मिशा असलेले सावळ्या रंगाचे तेलीकाका पांढरा कुर्ता - पायजमा घालत. ते भारदस्त दिसायचे. गेल्यावर आम्हा मुलांच्या हातात ते एक एक गोळी टेकवीत पण आम्हा मुलांशी बोलताना ते प्रत्येक वाक्यात आमची फिरकी घेत. त्यामुळे त्यांच्याशी बोलायला आम्हाला आवडायचे नाही. वडील किराणा माल घेईपर्यंत आम्ही तेथेच लाकडी बाकावर पाय हलवत शांत गंमत बघत असू. वडील आणि तेलीकांकांच्या

मोठ्या विषयांवरच्या गप्पा मात्र लवकर संपत नसत. आम्ही मुलं त्यामुळे अगदी कंटाळून जायचो. तेथून पुढे हनुमान मंदिरावरून आमचा लवाजमा न्हावीकाकांच्या घरी जाई. त्यांच्या घरी गेल्यावर मात्र स्वतःचे घर असल्याप्रमाणेच आई-वडील आणि आम्ही भावंडं अगदी निवांत बसत असू. नाईनआजी कपाळावर मोठे आडवे कुंकू लावी. तिच्या डोळ्यावर मोठ्या फ्रेमचा चष्मा असे. मायेने आम्हा मुलांना ती मांडीवर घेई. कधी कधी आम्ही तेथे जेवतही असू. जवळच त्यांचे केसकर्तनालय होते. तेथे माझ्या भावंडांच्या केसांची कटिंग केली जाई. आई माझेही केस तेथून कापून घेण्यासाठी मला भावंडांबरोबर पाठवे. त्यावेळी केलेला बॉबी कट मला छान दिसत असे.

गावातील सर्व बारा बलुतेदारांबरोबर गावकऱ्यांचा असा स्नेहसंबंध होता. लहानपणी कळत नव्हतं. गावातील सर्व लोक आपले आहेत, एकही पैसा न घेता आपली सर्व कामे होतात त्यामुळे अतिशय भारी वाटायचं.

चांभार, न्हावी, वाणी यांना त्यांच्या कामाचा मोबदला म्हणून पैसे न देता वर्षभराच्या वापरासाठी शेतातील धान्य गहू, बाजरी, कांदे, डाळी यांची आसामी दिली जायची. लहानपणी कळत नव्हते पण गावातील बारा बलुतेदार आणि शेतकऱ्यांचे, गावकऱ्यांचे एकमेकांशी सहकार्याचे, प्रेमाचे, आपलेपणाचे वागणे प्रत्येकालाच श्रीमंत करीत होते. पैशाच्या श्रीमंतीपेक्षाही मनाची श्रीमंती असणाऱ्या माणसांचा सहवास बालपणी लाभल्याने खूप समृद्धी अनुभवल्याच्या गोड आठवणी आजही मनाला उभारी देतात.

पुढे वडिलांनी बिऱ्हाड हलवल्याने आम्ही आमच्या गावात चांदोरी येथेच वास्तव्यास आलो. गावात आल्यावर गावच्या परंपरा, संस्कृती, वैशिष्ट्ये हळूहळू कळू लागले. चांदोरी गावाची ओळख म्हणजे गोदावरीकाठी असणारे खंडेरावाचे मंदिर. जेजुरीच्या खंडेरायाला दर्शनाला जाऊन आल्यानंतर चांदोरीच्या खंडेरावाचे दर्शन घेतले तरच यात्रा पूर्ण होते असे मानले जाते. येथील मंदिरात खंडेराव लिंग स्वरूपात आहे. हे अतिप्राचीन जागृत खंडेरावाचे मंदिर आहे. लहानपणापासून आम्ही ही कथा ऐकत आलो की हे लिंग गोदामाईच्या पात्रात वाहत इथे आले आणि स्थिरावले. त्यामुळे या देवस्थानाविषयी लहानपणापासून अतिशय भक्तिभाव आणि श्रद्धा मनात आहे. गोदावरीकाठी चांदोरी हे गाव अतिशय उंचावर वसलेले आहे. तरीही प्रत्येक पावसाळ्यात गावाला नदीपुराचा वेढा बसतो. बाहेरच्या जगाशी गावाचा संपर्क तुटतो. नाशिक येथे गोदावरी नदीला पूर आल्यावर मारुतीच्या छातीला पाणी लागले का यावरून पुराचा अंदाज घेतला जातो. तसे चांदोरीला खंडेरावाच्या मंदिराच्या कळसाला पाणी लागले का यावरून पुराचा अंदाज केला जातो.

गोदावरी नदीपात्रात लहान मोठी तब्बल दहा ते बारा मंदिर आहेत. त्या सर्वात शिंद्याचे मंदिर लक्षवेधी असून त्यातील काही मंदिरे हेमाडपंती शैलीत बांधलेली आहेत. विशेषतः कायमस्वरूपी पाण्यात असूनही आणि अनेकदा महापूर झेलूनही या मंदिरांना किंचितसाही धोका निर्माण झालेला नाही. यावरून मंदिराच्या बांधकामाची कल्पना येते. सन १९९०च्या दरम्यान उन्हाळ्यात नदीचे पाणी आटल्यानंतर ही मंदिरे उघडी पडली. खरं तर ही दगडी मंदिरे आणि सुंदर दगडी बांधकाम केलेले दोन मोठे घाट नदीकिनाऱ्यावर पूर्वी असावेत परंतु असे म्हटले जाते की १९०७ मध्ये नांदूर मनमेश्वर धरणाचे बांधकाम झाल्यानंतर नदीच्या पात्राचा प्रवाह बदलला व नदीकाठी असणारी दगडी मंदिरे व घाट पाण्याखाली गेले. नदीपात्रात शिवलिंग, नंदी असणारे मंदिरे अधिक आहेत. त्याबरोबरच गणपती मंदिर आहे आणि कुठेही नसलेले दुर्मीळ असे इंद्राचे मंदिर आहे.

पूर्वापार चांदोरी हे गाव खूपच धार्मिक असावे. म्हणून गावात अनेक देवदेवतांची मंदिरे आहेत. श्री. खंडेरावाचे मंदिर, पंचमुखी महादेव मंदिर, लिंगायत समाजाचे भव्य असे नीलकंठेश्वर महादेव मंदिर, श्री गणेश मंदिर, श्री शनिदेव, दुर्गादेवी भैरवनाथ, राधाकृष्ण अशी अनेक मंदिरे आहेत परंतु भव्य असा राममठही येथे आहे. या मठातील मंदिरात सोन्याच्या राम-सीता-लक्ष्मण यांच्या सुवर्णाच्या झुल्यावर बसलेल्या मूर्तींची पूजा केली जाते. तेथे हनुमान आणि श्री दत्ताचे मंदिरही आहे. इंद्रदेवाने अहल्येकडे वाकड्या नजरेने पाहिल्यामुळे गौतम ऋषींच्या शापाने इंद्राच्या शरीराला हजार भोके पडली. या शापातून उःशाप घेऊन मुक्त होण्यासाठी इंद्रदेवाने येथेच गोदावरी काठी सोमेश्वराची प्रार्थना केली. ते शिवलिंग सोमेश्वर मंदिर या मठामध्ये आहे. पुराणातील या आख्यायिकेवरून हे निदर्शनास येते की परस्त्रीकडे वाकडी नजर करून पाहणाऱ्याला कठोर शासन होत आले आहे. श्रीरामाच्या मठात परंपरेने सेवा करणाऱ्या कुटुंबाचे आडनाव मटकरी असे आहे.

येथे नदीकाठी मोठी कोळी वस्ती आहे. मासेमारी व्यवसाय करून ते आपला उदरनिर्वाह करतात. नदीपासून गावात जाणारा एक दगडी चढणीचा रस्ता आहे. तो हिंगणे वाड्यापर्यंत जातो.



भव्य हिंगणेवाडा आणि त्याला लागून असलेल्या गल्लीतील तीन मजली माड्या साडेतीनशे वर्षांपूर्वी बांधल्या गेल्या आहेत. हिंगणे हे पेशव्यांचे वकील होते. हा वाडा अतिशय भव्य आहे. वाड्यात श्री महालक्ष्मीचे व राधा कृष्णाचे मंदिर आहे. हिंगणे वाड्याजवळील तीन मजली माडी वडिलांनी खरेदी केली होती. त्यात आमचं बिऱ्हाड होतं. आमच्या घरासमोर प्राथमिक शाळा आणि त्या लगतच पोस्ट ऑफिस होते. हिंगणे वाड्यातील बागेश्री हिंगणे ही माझी बालमैत्रिण. ती आणि मी शाळेत हातात हात घालून जात असू. शाळा सुटल्यावर आम्ही दोघी गोदाकाठी नारायण महाराज मंदिराच्या कठ्ठ्यावर जाऊन बसत असू. नारायण महाराज हे सिद्ध पुरुष चांदोरीत वास्तव्यास होते आणि त्यांची समाधी

येथे आहे. संत गाडगे महाराज यांनीही चांदोरीला भेट दिल्याचे जुने गावकरी सांगतात. बऱ्याचदा मी एकटीही गोदाकाठी बसून निसर्गसौंदर्य न्याहाळत असे. बालपणाचा काळ सुखाचा असे म्हणतात ते उगाच नाही. मैत्रिणींबरोबर खेळण्यापेक्षा गोदाकाठी शांत बसून तिचे निसर्गसौंदर्य बघणे जास्त आवडत असे.

गावात चाकरमाने आणि काही गावकरी राहतात. या सर्वांमध्ये खूपच एकोपा आहे. बाकी गावकरी शेतातील वस्तीत घरे, बंगले बांधून राहतात. गाव तसे मोठेच आहे. गावातील सर्व महिला सकाळी नऊ ते अकरा पर्यंत गोदावरीवर म्हणजे गंगेवर धुणे धुण्यासाठी जात असत. गोदाकाठी मोठं मोठे खडक आणि सोबतीला गोदेचे खळाळते मुबलक पाणी. मग काय कपडे धुणाऱ्या महिलांचा कपडा दोन घसऱ्यात लख्ख स्वच्छ होई. कपडा जसा स्वच्छ होत असे तसेच आलेल्या सख्यांपाशी संसाराच्या सुख-दुःखांनी भरलेले मन मोकळे होऊन मनाला नवी झळाळी मिळत असे. गोदामाईत आंघोळीला गावातील ठरावीक मंडळी नित्यनेमाने येत असत. उन्हाळ्यात मात्र पोहणाऱ्यांची आणि अंघोळ करणाऱ्यांची गर्दी वाढत असे. चांदोरी गावाचे आणखी एक वैशिष्ठ्य म्हणजे पारंपरिक बोहाडा उत्सव. गेल्या तीनशे वर्षापासून संस्कृतीचे प्रतीक असणारा बोहाडा उत्सव दरवर्षी आषाढ महिन्यात मोठ्या उत्साहाने गावकरी साजरा करतात. बोहाड्यांमध्ये देव-देवतांच्या प्रभावळी काढल्या जातात. सूर-असूरांचे मुखवटे, वेश परिधान करून संबळ व पिपाण्यांच्या तालावर नृत्य करत मिरवणूक काढली जाते. रात्री नऊला सुरू होणारा बोहाडा पहाटे पहाटे संपत असे. बोहाडा पाहण्यासाठी आम्ही मुले लवकर जेवण करून गल्लीतील खालच्या अळीतील घराच्या ओट्यावर सतरंजी पसरवून जागा पकडत असू. गच्च अंधार, गार वारा तर कधी रिमझिमत्या पावसात बोहाडा रंगत असे. गणपती, सरस्वती, मच्छराक्षस, मारुती, जामवंत, त्रिपुरासुर, शंकर, त्राटिका, राम-लक्ष्मण, खंडेराव, दैत्य, विक्रम-वेताळ, नृसिंह, हिरण्यकश्यपू अशी कितीतरी देवांची सोंग करून मिरवणूक काढली जायची. त्यावेळी वापरात येणारे जळते टेंभे, अग्निचे बाण आणि देवांचे सोंग रंगवलेली माणसं खूप आवडायची. मिरवणुकीत नाचणारे लोक, पुराणातील आख्यान, संबळ- पिपाण्यांची संगीत आठवले तरी आजही मनावर गारुड करते. वरूणराजाला पावसासाठी साकडे घालण्यासाठी सुरू झालेल्या बोहावड्यातून गावातील एकोपा, संस्कृती, परंपरा, सहकार्य आपोआपच वृद्धिंगत होत आले आहे.

गावांमध्ये सर्व जातीधर्माचे लोक गुण्यागोविंदाने राहतात. सर्व सण-उत्सव आनंदाने साजरे होतात. पोळ्याला मानाच्या बैलाची व त्याच्या पाठोपाठ सर्व बैलांची मिरवणूक धुमधडाक्यात निघत असे. एक गाव एक होळी ही परंपरा चांदोरी गावाने आजतागायत कायम जपली आहे. दुसऱ्या दिवशी थंड होणाऱ्या होळीभोवती वीर नाचवले जातात. गावातून गण-गौळण आणि वीरांची मिरवणूक काढली जाते. हा सोहळा बघण्यासारखा असतो. आषाढी एकादशी व बकरी ईद हे हिंदू-मुस्लिम बांधवांचे सण बऱ्याचदा एका दिवशी येतात. गावातील हिंदू-मुस्लिम बांधव अत्यंत प्रेम आणि श्रद्धेने एकमेकांच्या रूढी परंपरांचा आदर करत हे सण साजरे करतात. गावातील बहुतांश लोक शेती करतात. द्राक्ष, कांदा, गहू असे उत्पादन शेतातून घेतले जाते. उच्च शिक्षणासाठी मुलं-मुली २५ किलोमीटर अंतर असणाऱ्या नाशिकला ये-जा करतात. गोदामाईच्या पाण्यावर सधन-समृद्ध झालेले चांदोरी आहे. सुबत्ता आली की बेपर्वा वृत्ती वाढते असे म्हणतात. कामापेक्षा गावातील पुरुष लोक कडक पांढरी गांधी टोपी, पांढरे शुभ्र कपडे घालून पुढारपण करत फिरतात असा समज आहे. समृद्धीमुळे लग्नकार्यात मोठा खर्च करण्याकडे लोकांचा कल आहे. बऱ्याचदा ऋण काढून सण साजरे करण्याची हौस चांदोरीकरांना जास्त आहे असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही.

घरची शेती आणि मुबलक उत्पन्न यामुळे पूर्वी गावातील तरुणांचा उच्च शिक्षणाकडे कल नव्हता परंतु काळ बदलला तसे आता सारे बदलताना दिसत आहे. गावाचा चेहरा-मोहरा बदलला आहे. गावातील मुले-मुली डॉक्टर, इंजिनियर, शिक्षक व्यावसायिक झाले आहेत. विविध क्षेत्रात नेत्रदीपक कामगिरी करून नावलौकिक मिळवत आहेत. येथे रयत शिक्षण संस्थेचे माध्यमिक विद्यालय आहे. त्याबरोबरच आता इंग्लिश माध्यमाच्या खासगी शाळा सुरू झाल्या आहेत. महाविद्यालय सुरू झाले आहे. सहकारी पतसंस्था, सहकारी दुग्ध व्यवसाय पूर्वी होताच. आता ते भरभराटीला आले आहेत. दळणवळणाची साधने वाढल्याने नाशिक-चांदोरीमधील अंतर कमी झाले आहे. बालपणी अनुभवलेले, गोदेच्या प्रवाहाला बिलगुण असलेले, धुक्यातील उंच कौलारू वाड्यांचे, मंदिरांच्या उंच कळसांचे चांदोरी गाव संस्कृती, परंपरेचा पदर घेऊन जणू वावरत होते परंतु आता नव्या काळानुरूप स्वतःत बदल घडवत, नव्या उपनगराचा वेश परिधान करून जगाच्या स्पर्धेत पुन्हा एकदा कणखरपणे ते उभे राहत आहे स्वतःला सिद्ध करण्यासाठी!



# विजयपुरम तथा अंदमानच्या बेटावरचे तीन दिवस

## स्वातंत्र्यवीर सावरकर आदरांजली सोहळ्यातील सुवर्णक्षण...




**विजयालक्ष्मी मणेरीकर**
**नाशिक**
**९८२२६८३७९९**


बंगालच्या उपसागरातील अंदमान-निकोबार बेट म्हणजे महाराष्ट्रातून अंतर मोजायचे ठरल्यास तीन हजार किलोमीटरपेक्षा जास्त अंतर असेल. जिथे पोहोचायला आजच्या वर्तमान काळातही केवळ हवाई मार्ग किंवा समुद्रमार्ग उपलब्ध आहे. त्या अंदमान बेटाच्या राजधानीत विजयपुरम येथे भारतीय क्रांतिकारकांचे बलिदान सार्थ ठरले आणि आपल्या देशास स्वातंत्र्य मिळाले. जिथे वीर सावरकरांच्या द्रष्टेपणातून, मार्गदर्शनातून, सहवासातून क्रांतिची मशाल आणखी तीव्र झाली. क्रांतिकारक चळवळी आणखी सशक्त झाल्या. शारीरिक शिक्षेतून देहाची लक्तरे झाली तरी मनाची गाठ पक्की राहिली त्या विजयपुरममध्ये जणू महाराष्ट्र अवतरला होता. सावरकरांच्या स्मृतिंचा न भुतो न भविष्यति असा 'सागरा प्राण तळमळला' या वीर सावरकर लिखित महान काव्यावर आधारीत अतिशय अद्भुत हृद्य कार्यक्रम पं. हृदयनाथ मंगेशकर यांनी अंदमान येथे सादर केला. या कार्यक्रमात माझाही खारीइतका सहभाग होता याचा मला आनंद आणि अभिमान आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची शतकपूर्ती आणि स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर लिखित 'सागरा प्राण तळमळला' या श्रेष्ठ काव्याची एकशे सोळा वर्षपूर्ती असा सुवर्णकांचन योग साधून अतिशय हृद्य सोहळा अंदमान (विजयपूरम) येथे

आयोजित केला होता. हा संपूर्ण कार्यक्रम अतिशय नियोजनबद्ध होता.

या सोहळ्यात क्रांतिवीरांची पवित्र भूमी अंदमान येथील पहाडगाव येथे डॉ. बी. आर. आंबेडकर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी सभागृहात या शतकातील महान संगीतकार पं. हृदयनाथजी मंगेशकर यांची 'वीर सावरकर' यांच्याबद्दल मी मुलाखत घेतली. या कार्यक्रमात पंडितजींनी त्यांच्या तरुणपणातील सावरकरांच्या आठवणी सांगितल्या. महाराष्ट्रातून आलेल्या कलाकारांनी पंडितजींनी संगीतबद्ध केलेली सावरकर गीते सादर केली.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत, गृहमंत्री श्री. अमित शाहजी, महाराष्ट्राचे सांस्कृतिक मंत्री ॲड. आशिष शेलार हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते तर सावरकरांचे स्नेही आदरणीय पं. हृदयनाथजी मंगेशकर, अभिनेते शरद पोंक्षे, सावरकर चित्रपटाचे निर्माते, दिग्दर्शक, अभिनेता रणदीप हुडा, सावरकरांवर दहा ऐतिहासिक व चरित्रात्मक पुस्तके लिहिलेले विक्रम संपत हे सन्मानित अतिथी उपस्थित होते.

माझ्यासाठी हा सोहळा याची देही याची नयनी बघणे हा अमृतानुभव होता. पं. हृदयनाथ मंगेशकर यांच्या सहवासातील हे सावरकरमय तीन दिवस संपूच नये असे वाटत होते. पंडितजी म्हणजे उत्साह, असीम उर्जा, स्नेहमय आत्मियता, प्रेरणेचा, ज्ञानाचा अखंड स्त्रोत.

पहाटे पाच वाजता मुंबई एअरपोर्टवर अगदी वेळेआधी उपस्थित राहून, सर्वांशी गप्पा मारत चैतन्यमयतेची अनुभुती देणारे पंडितजी अजूनही माझ्या मनात तसेच प्रसन्नचित्त दिसत आहेत. मुंबई विमानतळावरील सकाळचे दोन तास वेटींग



आणि मुंबईहून साडेतीन तासाचा विमान प्रवास करून आम्ही थकून गेलो होतो पण पंडितजींच्या चेहऱ्यावर थकव्याची बारीकशी रेघही उमटलेली नव्हती. या वयातही चेहऱ्यावर एकही सुरकुती नाही. डोळ्यात आजही उत्सुकता, कुतुहलयुक्त चौकस अष्टावधानी नजर. डोक्यावर एकदम स्टाईलीशपणे पूर्ण मागे वळवलेले दाट केस, चेहऱ्याचा नितळ निमगौरवर्ण, धारधार नाक, रेखीव चेहरेपट्टी... कपडे अतिशय स्वच्छ, करकरीत कोट, पांढरा शुभ्र अतिशय तलम मऊ शर्ट, कोटच्या खिशात खास अत्तराची कुपी आणि न कंटाळता संवाद करण्यास तत्पर असलेले मनाने अगदी तरुण पंडितजींसोबतचे एअरपोर्टवरील आणि विमान प्रवासातील ते सहा तास म्हणजे साक्षात ईश्वर सहवास. अतिशय सजग असलेले पंडितजी उगीचच कुठला दिखावा नाही की तक्रार नाही. विमानात बसताना जो फ्रेशनेस त्यांच्या चेहऱ्यावर होता उतरताना त्यात थोडीशीही कमतरता नव्हती.

दि. १२-१२-२५ रोजी पंडितजींनी खुद्द अंदमान येथे प्रत्यक्षात येऊन 'सागरा प्राण तळमळला' कार्यक्रम सादर करणे हे अजूनही स्वप्नवत वाटते. या कार्यक्रमात मला पंडितजींची मुलाखत घेण्याचे सौभाग्य प्राप्त झाले हे माझे पूर्वसंचित, महद्भाग्य.

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या हृद्य आठवणी त्यांनी श्रोत्यांना सांगितल्या. सभागृहातील उपस्थित महोदय आदरणीय सन्माननीय व्यक्तिमत्त्वे, सावरकर भक्त, हजारो सावरकर प्रेमी प्रेक्षकांना पंडितजी आपल्या प्रसन्नचित्त स्मृती संचित वाणीने सावरकरांच्या काळात घेऊन गेले. गेली साठ-सत्तर वर्षे जगभर दौरे करून सावरकरांवरील प्रेमाखातर स्वतः अतिव कष्ट घेऊन सावरकरांचे महान काव्य, देशभक्ती, सावरकरांची तत्त्वे, भाषाशुद्धीची तत्त्वे पंडितजींनी जगभरात लोकप्रिय केली आहेतच, त्याच ओढीने सावरकर भक्तीने पंडितजी त्याच उर्जेने अंदमान येथील श्रोत्यांना एकोणीसशे पन्नास-बावण्णच्या काळात घेऊन गेले. आजच्या तरुण श्रोत्यांना त्या काळात घेऊन जावेसे वाटणे यातच त्यांची अतूट देशभक्ती व अद्भुत



सावरकरप्रेम दिसून येते. पंडितजींची मराठी भाषा ज्ञानेश्वरीय युक्त सावरकरीय आहे. ती प्रत्यक्षात ऐकणे ज्ञानमयो विज्ञानमयोसी असते. विजयपुरममधील श्रोतृवर्ग हिंदी भाषिक असल्यामुळे पंडितजी अंदमानच्या रंगमंचावर कार्यक्रमाच्या प्रोटोकॉलनुसार हिंदीतून बोलले आणि त्यांची हिंदीही अतिशय श्रवणीय आहे हे कळले. पंडितजी बोलत असताना सभागृहातील प्रत्येक व्यक्ती अतिशय लक्षपूर्वक कान देऊन संपूर्ण नजर पंडितजींवर एकाकार करुन ऐकत होते. त्यामुळे सभागृहात खरोखर सावरकरांचा तो काळ अवतरीत झाला होता आणि जणू काही पंडितजी, लतादीदी आणि सावरकर असा तो प्रसंग इथे घडतोय असा आभास निर्माण झाला होता. पंडितजींचे वडील म्हणजे मास्टर दीनानाथ मंगेशकर ह्यांचे सावरकरांशी जुळलेले मैत्र, मास्टर दीनानाथ यांनी संगीतबद्ध केलेले सन्यस्तखड्ग हे सावरकर लिखित नाटक, ब्रिटीश सरकारसमोर या नाटकाचे केलेले धारिष्ट्यपूर्ण सादरीकरण अशा आठवणी सांगत पंडितजी बोलू लागले.

पंडितजींनी अनेक आठवणी सांगितल्या ज्यातून सावरकरांचा स्वभाव, त्यांचे व्यक्तिमत्त्व मनात उमटत होते. पंडितजींनी सावरकरांचे बाह्यांग व्यक्तिमत्त्वाचे वर्णन तर केलेच पण सावरकरांचे अंतरंग कसे होते त्याचेही वर्णन काही प्रसंग सांगून उलगडले.

ही गोष्ट जवळजवळ १९५२-५३ची असावी. पंडितजी साधारण तेरा-चौदा वर्षांचे असताना जेव्हा तात्यासाहेब सावरकरांना भेटायला गेले होते त्यावेळी ''मी हृदयनाथ दीनानाथ मंगेशकर'' असे कळविले. तात्यांनी भेटायला वर त्यांच्या खोलीत बोलावले. पंडितजींनी त्यांना सांगितले की, ''मला तुमच्या कविता संगीतबद्ध करायच्या आहेत,'' असे सांगून काही कविता सावरकरांकडून घेतल्या. दुसऱ्या दिवशी ते पुन्हा सावरकरांना भेटायला आले आणि ते तात्यांना सांगू लागले की, ''चांगले रेकॉर्डिंग स्टुडिओ पाहून ठेवले आहे, रेकॉर्डिंग मशिन अतिशय छान आहे, साऊंड सिस्टीम अतिशय छान आहे. तिथे ह्या गाण्यांचे मी रेकॉर्डिंग करणार आहे.''

त्यावर तात्या सावरकर बाबाराव सावरकर यांना म्हणाले की, ''बाबाराव या मुलाकडून ती कविता परत घ्या. त्यांना भाषाशुद्धिचे पुस्तक द्या.''

पंडितजी पुढे सांगतात, ''मला कळले त्यांना काय सुचवायचे होते. मी मराठीत इंग्रजी शब्द वापरलेले त्यांना आवडले नव्हते. तात्यांचे मराठी भाषेवर जिवापाड प्रेम होते. ते मराठी भाषेचे रक्षक होते. त्यांनी मराठी भाषेत इंग्रजी शब्दांना पर्यायी शब्द दिलेले आहेत. ते मराठी भाषाशुद्धी चळवळीचे प्रणेते होते. अनेक

इंग्रजी शब्दांना त्यांनी शुद्ध सुंदर मराठी शब्द दिलेले आहेत. ध्वनीमुद्रण, ध्वनिसंयोजन, ध्वनिक्षेपक यंत्र, दूरध्वनी अशी महत्त्वपूर्ण शब्दनिर्मिती ही मराठी भाषेस सावरकरांची देण आहे. शुद्ध मराठीत बोला यावर त्यांनी त्या काळात आंदोलने केली होती.'' अशा अतिशय महत्त्वपूर्ण आठवणी पंडितजी कार्यक्रमात सांगत होते. पुढे ते म्हणाले, मी ते 'भाषाशुद्धी' पुस्तक घेऊन घरी परत आलो. एका दिवसात ते संपूर्ण पुस्तक पाठ करुन टाकले आणि माझी मराठी भाषा शुद्ध करुन दुसऱ्याच दिवशी पुन्हा परत तात्यांना भेटायला गेलो आणि तात्यांना सांगितले, ''तात्या, मी उत्तम ध्वनिमुद्रण व्यवस्था पाहून ठेवली आहे. तिथे मी तुमचे गीत ध्वनिमुद्रीत करेन.''

हा संपूर्ण प्रसंग अतिशय सुंदर शब्दात साभिनय पंडितजींनी सभागृहात मांडला आणि श्रोत्यांच्या मनात संपूर्ण प्रसंग उभा केला. पंडितजींना बोलताना पाहिले की वाटते की ते आत्ताच्या काळात जगत नाहीत, ते मनाने त्याच काळात जगतात. त्यांचा आविर्भाव असा होता की जणू ते चौदा वर्षांचे बाळासाहेब झाले होते. दुसरा प्रसंग पंडितजींनी सांगितला. एकदा सावरकरांच्या एका कार्यक्रमात ते लतादीदींसमवेत गेले असताना त्यांनी पाहिले की सावरकरांचे कपडे नेहमीच खूप स्वच्छ, नीटनेटके असतात, डोक्यावर टोपी, अंगात काळा कोट, पांढरा सदरा आणि धोतर! पण एकदा एका ठिकाणी धोतरात टवकाभर कोच गेलेला पंडितजींना दिसला होता. युवा हृदयनाथांस ते बरोबर वाटले नाही. ते लतादीदींस म्हणाले, ''दीदी, तात्यांचे धोतर थोडे फाटले आहे, त्यांना एक नवी कोरी धोतरजोडी घेऊन दिली पाहिजे.''

दीदींनी गालातल्या गालात स्मित केले. लतादीदी तात्यांना खूप चांगले ओळखत होत्या. तात्यांचा स्वभाव त्यांना पूर्णतः माहीत होता. तात्या नवे कपडे स्वीकारणार नाहीत, हेही त्यांना माहीत होते परंतु बाळला त्यांनी तसे स्पष्ट न सांगता बाळला स्वतःलाच तात्या कळले पाहिजेत या उद्देशाने त्या बाळला (म्हणजे हृदयनाथ यांना) म्हणाल्या, ''ठीक आहे, नवी धोतरजोडी, नवे कपडे तात्यांसाठी घेऊन जा.''

युवा हृदयनाथ नवी धोतरजोडी घेऊन तात्यांच्या घरी गेले. त्यावर तात्यांचे बंधू बाबारावांनी त्यांना समजावून सांगितले की ''आत्ता काही विशेष प्रसंग नाही त्यामुळे आत्ता देऊ नकोस. तात्या नवे कपडे स्वीकारणार नाहीत. त्यांचा जन्म दिवस लवकरच येतोय, त्या प्रसंगी दे म्हणजे ते कदाचित स्वीकारतील.''

हृदयनाथजी ते नवे कपडे घेऊन तसेच घरी परत आले. तात्यांचा जन्म दिवस आला त्या दिवशी हृदयनाथजी सावरकरांसाठी कपड्यांचे दोन नवे सेट घेऊन परत सावरकरांना भेटायला गेले. त्यावेळी तात्या त्यांच्या बंधुना म्हणाले, ''बाळनी आणलेले कपडे ठेवून घ्या. आज आपण वृद्धाश्रमात जाणार आहोत तिथे ज्या वृद्धांना कपडे नाहीत त्यांना हे कपडे देऊ.''

या प्रसंगावरुन तात्यांचे अंतरंग कळते. हृदयनाथजी मंचावर अगदी तल्लीन होऊन पुढे पुढे बोलतच होते. ते आता सभागृहात नव्हतेच. ते त्या जुन्या काळात सावरकरांसोबतचे क्षण जगत होते. पंडितजींनी सांगितले, बावीस वर्ष त्यांना सावरकरांचा सहवास लाभला होता. आता सभागृहात तात्यासाहेबांचा एवढा प्रत्यक्ष सहवास मिळालेले दुसरे कोणीही नाही.

पुढे हृदयनाथजींचे डोळे पाणावले. ते सांगत होते तात्यांचा मृत्यू झाला त्या प्रसंगी तात्यांच्या अगदी जवळ मी व लतादीदी (लतादीदी म्हणजे भारतरत्न लता मंगेशकर) बसलेले होतो. तात्यांचा मृत्यू आम्ही अगदी जवळून पाहिलाय. हा प्रसंग सांगतानाच पंडितजींचा भाव मी जसाच्या तसा शब्दांत मांडू शकत नाही. शब्द हतबल आहेत. अपूर्ण आहेत. प्रत्यक्षात आम्ही जे डोळ्यांनी टिपले, हृदयात जाणवले ते शब्दांत मांडणे शक्य नाही. सावरकरांवर एवढी वर्षे अविरत प्रेम करत राहणे, त्यांचे भक्त बनून त्यांचे काव्य जगप्रसिद्ध करणे, जिथे सावरकरांनी 'सागरा प्राण तळमळला' हे काव्य लिहिले त्या इंग्लंडच्या शहरात जावूनही पंडितजींनी सावरकरांवरील कार्यक्रम त्यांच्या तरुणपणी सादर केला होता.

पंडितजी पुढे बोलत होते, ''वयाच्या अकराव्या वर्षी 'हे हिंदुशक्ती संभूत दीप्तितम तेजा । हे हिंदूतपस्या पूत ईश्वरी ओजा । हे हिंदुश्री सौभाग्य भूतीच्या साजा । हे हिंदुनृसिंहा प्रभो शिवाजी राजा।।' हे महान काव्य लिहिणारे तात्या जन्मजात प्रतिभा, दिव्यत्व, तेज, ज्ञान, बल, सौष्ठव, अखंड ऊर्जा घेऊन आले होते. त्यांच्यासारखा कलासक्त उच्चतम साहित्यिक आणि स्वातंत्र्यवीर न दुसरा कोणी झाला न भविष्यात होईल.''

'हे हिंदुशक्ति संभूत दीप्तितम तेजा' हे अतिशय अवघड काव्य पंडितजींनी उपस्थितांना समजावून सांगितले. ''हे काव्य म्हणजे स्वातंत्र्यवीर सावरकरांनी छत्रपती शिवाजी महाराजांना उद्देशून लिहिलेली एक वीररसयुक्त स्तुती आहे, ज्यात महाराजांना हिंदू साम्राज्याची शक्ती, तपस्येचे फळ आणि दैवी अवतार मानून, त्यांच्या पराक्रमाने प्रेरित होऊन, परतंत्र झालेल्या देशाची दुर्दशा दूर करून स्वातंत्र्याची पुनर्स्थापना करण्याची याचना केली आहे. या कवितेतून सावरकरांनी महाराजांच्या शौर्याला वंदन करत, त्यांच्या आदर्शानुसार देशासाठी लढण्याची प्रेरणा दिली आहे. 'हे हिंदुशक्ति संभूत दीप्तितम तेजा' : हे हिंदूंच्या एकत्रित शक्तितून

निर्माण झालेल्या, अत्यंत तेजस्वी आणि प्रज्वलित तेजा! तुम्ही हिंदूंच्या तपश्चर्येचे फळ म्हणून अवतरलेले आहात. तुम्ही हिंदू देवतांच्या सौभाग्याचे प्रतीक आहात. हे शिवाजी राजा, तुम्ही नृसिंहासारखे पराक्रमी आहात, तुम्हाला वंदन आहे. आमचे मन तुम्हाला आदराने अभिवादन करते. या मनातल्या स्वातंत्र्याच्या गुप्त आशा पूर्ण करा. सर्व किल्ले भंगले आहेत, राजधान्यांची जंगले झाली आहेत, सर्व मंगल गोष्टी पराभूत झाल्या आहेत. अशा परतंत्र अवस्थेत जगणे आम्हाला लाजिरवाणे वाटते. हे महाराजा या दुर्दशेकडे पाहा. पुन्हा अवतार घ्या. सावरकर या कवितेतून शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची आठवण करून देत आहेत आणि त्यांच्यासारख्या वीराच्या नेतृत्वाखाली परतंत्रतेतून मुक्त होऊन पुन्हा वैभवशाली हिंदुराष्ट्र निर्माण करण्याची प्रेरणा देत आहेत.''




पंडितजींनी हे काव्य इतकं सुंदर समजावून सांगितलं की भारताचे गृहमंत्री आदरणीय श्री. अमित शाहजी यांनी त्यांच्या भाषणात उल्लेख केला की, ''मलाही या काव्याचा इतका गहन अर्थ माहीत नव्हता.'' मंचावर उपस्थित प्रत्येक आदर्श व्यक्तिमत्त्वांनी पंडितजींच्या योगदानाबद्दल उल्लेख करून त्यांना नमन केले. पंडितजींना मंचावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहनजी भागवत यांच्या हस्ते व व्हॅल्युएबल ग्रुपचे श्री. अम्येय हेटे यांच्या हस्ते सावरकरांची मूर्ती देऊन सन्मानित करण्यात आले.

पंडितजी मनोगतात ज्येष्ठ कवी राजा बढे यांच्याविषयीही बोलले. ते आकाशवाणीत लागल्यावर पहिल्यांदा राजा बढेंना घेऊन सावरकरांकडे गेले होते. त्यावेळी त्यांनी 'ने मजसी ने परत मातृभुमीला, सागरा प्राण तळमळला' हे काव्य निवडून दिले होते. या काव्यात सागर हा खलनायक आहे. भारतमाता म्हणजे मातृभुमी, सागर आणि क्रांतिकारक या तिघांतील हे काव्य आहे. सागरा प्राण तळमळला, ने मजसी ने परत मातृभूमीला. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकरांच्या वेदनेतून उमटलेली विव्हळयुक्त साद म्हणजे हे काव्य! महाराष्ट्रातीलच नव्हे तर अवघ्या भारतातील जनतेच्या मनात या पोर्ट ब्लेअरविषयी चीड, उत्कंठा, भय जागृत ठेवणारे हे महान काव्य आहे. क्रांतिवीरांची ही करुणेची याचना स्वातंत्र्यानंतर गेली कैक वर्षे इथे भारतीय पर्यटकांना खेचून आणते आहे. याचे कारण म्हणजे या गीताचे करुण संगीत आणि हृदयद्रावक शब्द! हे काव्य लिहून आता एकशे सोळा वर्षे पूर्ण झाली आहेत.

मला असं वाटतं की, अनेक काव्य श्रेष्ठ असतात पण जेव्हा अप्रतिम संगीत रचनेमुळे ते काव्य घराघरात पोहोचते, रसिकांच्या हृदयात वसते तेव्हा त्या काव्याचे श्रेष्ठत्व जनमानसात ठसते आणि दिव्य संगीतामुळे त्या काव्याचे आयुष्यमान चिरंतन टिकते. अशी अनेक सुंदर, श्रेष्ठ काव्ये अद्वितीय संगीतरचना करून पं. हृदयनाथ मंगेशकर यांनी घराघरात, जनमानसांच्या मनात, हृदयात ठसवली आहेत. त्याबद्दल अवघा महाराष्ट्र त्यांच्या ऋणात आहे. त्याची उतराई आपण होऊच शकत नाही. आदरणीय स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या कवनांतून वाहणारा दुर्दम्य उत्साह, विलक्षण आत्मविश्वास, अचाट धैर्य व अतुल निर्भयता पंडितजींच्या संगीतामुळे आणखीन अधोरेखित होऊन हृदयस्थ होतो.

पंडितजी या कार्यक्रमात अतिशय उत्तम रसाळ हिंदी बोलले आणि श्रोत्यांना जुन्या काळात घेऊन जाऊन वातावरण अतिशय करुण, भावपूर्ण केले. पंडितजी आपणास मनापासून अभिवादन, वंदन. आम्ही मराठी रसिक तुमच्यावर फार फार प्रेम करतो.

# पत्र

मूळ लेखिका (हिंदी) : **डॉ. हंसा दीप,** टोरोंटो, कॅनडा

अनुवादिका (मराठी) : **डॉ. मीना श्रीवास्तव, ठाणे**

**प्रिय लियम, हे पत्र म्हणजे माझ्याकडून तुला मिळालेली हृदयस्थ भेट आहे असे समज! हिची तुला आयुष्याच्या प्रत्येक वळण वाटेवर गरज पडेल. मी येथे जे काही लिहिले आहे ते पुरेसे नक्कीच नाही पण मी शपथपूर्वक नमूद करतो की यानंतर मी काहीही बोलणार नाही.**



आज तू माझ्या लाडक्या लेकीशी विवाह करून तिला स्वतःच्या घरी घेऊन जाणार आहेस. मी मात्र बापुडवाणा 'वधूपिता' आहे. 'फादर ऑफ द ब्राईड' हा चित्रपट मी एकवार पाहिला आणि समाधान न झाल्याने नंतर बऱ्याचदा मुद्दाम पाहिला होता. माझ्या पोरीनं लग्नाच्या अगदी आधी तो पुन्हा एकदा पाहण्याची मला गळ घातली होती, जेणेकरून मी असा कुठलाही विक्षिप्तपणा करू नये ज्यामुळे समारंभाचा विचका होईल आणि तिला लाजिरवाणं होण्याचा प्रसंग येईल अथवा तिच्या भावी पतीला खिजवल्यागत होईल. हा पत्रप्रपंच एका महत्त्वाच्या कारणासाठी करतो आहे. ते म्हणजे या पत्रातील शाब्दिक अर्थ तर तू जाणून घ्यावेसच पण त्यांच्या पलीकडल्या भावना तू समजून उमजून आपल्या हृदयात सामावून घेण्याचा प्रयत्न करावास. हे खासमखास पत्र माझ्या लाडक्या मुलीच्या अंतर्बाह्य रूपाचे प्रतिबिंब आहे असेच समज. माझ्या परमप्रिय कन्येकेविषयीच्या अलवार प्रेमबंधनाच्या रेशीमगाठी मनाच्या गाभाऱ्यात जपून ठेवीत असतानाच तुझा तिच्या अंतरंगाशी घनदाट परिचय व्हावा हा माझा प्रामाणिक प्रयत्न आहे. माझ्यावर विश्वास ठेव, मी माझ्या लाडक्या कन्येच्या आनंदात जाणीवपूर्वक सहभागी झालो आहे. मनाच्या एका कोपऱ्यात मला तुझा प्रचंड मत्सर वाटतोय. ही असूयेची भावना माझ्या मनाला नेहमीच डाचत राहणार. काय करू? तू कसाही असलास तरी माझ्या लेकीने तुला पसंत केलंय. म्हणून तर मी निव्वळ तिच्या



**डॉ. मीना श्रीवास्तव**
**ठाणे**
**९९२०१६७२११**



आनंदासाठी अत्यंत कष्टाने या लग्नाची जय्यत तयारी केली. तरीही मी तितकासा समाधानी नव्हतो. मी अश्या-तश्या प्रकारे तिची पाठवणी कशी करणार? मी जणू माझे काळीजच काढून तुझ्या हाती सोपवतोय! पण एखाद्या परक्या व्यक्तिसोबत तिची पाठवणी करण्याआधी ती माझ्यासाठी काय आहे हे तर त्या व्यक्तिला नक्कीच कळायला हवे ना!

जेव्हापासून तिने तुझ्याशी लग्न करण्याचा निर्णय घेतला तेव्हापासूनच मी हे पत्र लिहायला सुरुवात केली. माझ्यापासून दूर जाण्याच्या दिशेने ते तिचे प्रथम पाऊल ठरले. खरं सांगू का! त्या विलक्षण क्षणी तू मला एक अतिशय हिंस्र शत्रू वाटत होतास, जो सीमेपलीकडून माझ्या संपूर्ण लष्करी छावणीला आपल्या ताब्यात घेऊ इच्छित होता! मी तुझ्या सकळ अवगुणांच्या यादीचा पाढा वाचत जणू कित्येक तोफांतून तिच्यावर बॉम्बचा भडीमार केला पण माझ्या पोटच्या पोरीने तिच्या बिनचूक युक्तिवादाने ते सर्व हल्ले यशस्वीरित्या माझ्यावरच पलटवून लावले आणि मला गपगार केले. या तिरीमिरीच्या युद्धाच्या अंती मला माझी सर्व अस्त्रे-शस्त्रे म्यान करत बिनशर्त शरणागती पत्करावी लागली.

तिचे तुझ्याबद्दलचे वेड वर्धमान होतच गेले आणि मी असहाय होऊन मुकाट्याने त्याच्या आवेगाची उभारी बघत राहिलो. आपल्या घराच्या पणतीचा प्रकाश कुणा परक्याचे घर उजळताना पाहणे हे असह्य दुःख मनाला पिळवटून टाकीत असते. दिव्याखालीच सर्वाधिक अंधःकार असतो हे दारुण सत्य स्वीकारण्यास माझे कमकुवत मन सपशेल नकार देत होते. आता तर गोष्टी या थरावर पोहोचल्या होत्या की ती चक्क तुझ्या सोबतीने जाण्याकरिता सजून-धजून तयार व्हायला लागली. मेकअप करणाऱ्या कलावतींची अख्खी पलटण तिला या जगातील सर्वांगसुंदर मुलीच्याच नव्हे तर वधूच्या रूपात सजवण्यासाठी सज्ज होती. तू तिच्याकडे अनिमेष नजरेने पाहत तिच्या अलौकिक सौंदर्याची प्रशंसा करीत होतास, तेव्हा मी तिच्या नजरेआड कुठेतरी दूरवर बसून हे पत्र पूर्णत्वास नेत होतो. सुंदर सजलेली वधू म्हणून तिची तारीफ करण्याचा पहिलावहिला हक्क तू भलेही आजच्यापुरता माझ्याकडून हिरावून घेतला असेल पण मी तुला सांगू इच्छितो की मी तिला दररोज जगातील सर्वात सुंदर कन्यकेचा किताब देत असे. प्रत्येक सकाळी जेव्हा मी तिला शाळेसाठी तयार करीत असे तेव्हा तिला काळजीपूर्वक न्याहाळून पाहत असे की चुकीने कुठे काही कसर तर राहिली नाही! ही लाडुबाई माझी सर्वात अनवट कृती आहे. तिची प्रशंसा करण्यास फक्त एक नजर पुरेशी नाही रे मुला. तुला कदाचित आठवतही नसेल, त्या अविस्मरणीय क्षणांच्या सानिध्यात असताना तिची पाणवलेली नजर मलाच शोधत होती.

आज जर तुला मी एक भला माणूस म्हणून दिसत असेन तर हे चांगुलपणाचे सगळे देणे माझ्या मुलीकडून मला लाभलंय. माझ्यातील सर्व वाईटपणा कशामुळे असेल तर तो माझा मूर्खपणा समज कारण मी त्या वळणावर तिचे ऐकले नाही. तू देखील हे सत्य जितक्या लवकर स्वीकारशील तितके तुझ्यासाठी बरे! ही माझी लेक म्हणजे निसर्गाचा अपूर्व चमत्कार आहे. एखाद्या कलाकाराने जसे मनोभावे आपला जीव ओतून रमणीय शिल्प घडवावे तसेच ईश्वराने स्वतःच्या हातांनी मोठ्या निगुतीने आणि निवांतपणे तिची निर्मिती केली असावी. या सर्वांगसुंदर ईश्वरीय कृतीतून मी कठोर मेहनतीने एक अत्युत्कृष्ट संस्कारशील व्यक्तिमत्त्व घडवले आहे आणि आता त्याच सुकुमार कळीचे सुगंधित पुष्पात परिवर्तन झाल्यानिशी मला ते तुझ्या हाती सोपवायचे आहे. तू स्वतःला अतिशय भाग्यवान समज की तिने लग्नाच्या वेदीपर्यंत आमंत्रित करण्याइतपत तुझ्यात पुरीशी योग्यता पाहिली.

तिच्या केसांची बट बाजूला सारत तू तिला लाडाने पहिला घास खायला घालत आहेस. तिच्या रेशमी केसांना कुरवाळत असताना असे समजू नकोस की तू तिला तुझे सर्व प्रेम देत आहेस. अरे वेड्या! मी हे हजारो वेळा केले आहे. तिला लांबसडक केस आवडायचे म्हणून तिने लांब केसांचा हट्टच केला. मला काही केल्या तिच्या केसांची वेणी घालता येत नसे. तिला मात्र या बाबतीत माझा अडाणीपणा अजिबात सहन होत नसे.

ती चिडून म्हणायची, ''बाबा, तुम्हाला वेणी कशी घालायची हे सुद्धा माहीत नाही!''

''हो ग बाळा, मी शिकेन हळू हळू.''

हे आव्हान माझ्यासाठी खूप त्रासदायक होते. मग मात्र मी इरेलाच पेटलो. कृत्रिम केस विकत घेऊन यू ट्यूबवरील व्हिडिओ निरखून बघत बघत एकदाचा मी तिची वेणी गुंफायला शिकलो. आता तर हे काम माझ्या दोन्ही हातांचा मळ आहे आणि मी गुंफलेली सुरेख वेणी ऐन्यात बघितल्यावर माझ्या मुलीच्या चेहऱ्यावर उमटलेले गोड गोजिरे समाधानाचे हास्य म्हणजे माझ्यासाठी साता-जन्मांचा अक्षय आनंदाचा ठेवा आहे! मी तुला हे यासाठी सविस्तर सांगत आहे की तू काहीही केलेस तरी कधीही माझी बरोबरी करूच शकणार नाहीस. हे आणि हेच त्रिवार सत्य आहे.

तू तिला नुकताच जो घास भरवलास त्यात राजमा होता, हे तुझ्या लक्षात कसे काय आले नाही? तिला राजमा अजिबातच आवडत नाही. जर तू तिला थोडेसेही ओळखत असतास तर तू या खास दिवशी तिला राजमा खाऊ घातला नसतास. अरे, तिच्या अन्नप्राशनाच्या मुहूर्तावर मीच तिच्या मुखात अन्नाचा

पहिला कण भरवला. तिचा जन्म होता क्षणी तिची आई तिला माझ्या कुशीत टाकून देवाघरी गेली. मी तिच्या प्रत्येक श्वासाचा साक्षीदार आहे. मी तिला नव्हे तर तिने मला जगायला शिकवले.

तू तुझ्या मित्रमंडळींच्या आग्रहाखातर तिचे चुंबन घेतलेस. मला ते विशेष आवडले नाही. ती भावना उत्कटतेने तुझ्या हृदयातून आलेली नव्हती, तर हा जबरदस्तीचा मामला दिसून येत होता. तिच्या ड्रेसच्या टोकाचा घोळ चांगलाच लांबलचक होता. तो स्वतःच्या हातानी सावरण्याचे तू निष्फळ प्रयत्न केलेस. याचे कारण म्हणजे ती इतकी कार्यक्षम आहे की अशा बारीकसारीक कामांसाठी कोणाचीही मदत घेणे तिला बिलकुलच पटत नाही. ऐक ना, तू तिच्या गळ्यात हार घालत असताना तुला कोण आनंद झाला होता पण तुला हे माहीत नव्हते की तिला त्या विशेष फुलांची ॲलर्जी आहे. हे लक्षात आल्याने मी ऐन वेळेवर ती फुले हारातून काढायला लावली होती.

आज तू थोडक्यात बचावलास बेट्या! पण प्रत्येक वेळी तुला वाचवण्यासाठी मी तिथे असणार नाही. ती अगदी लहान असल्यापासूनच स्वतःचे काम तिच्या अस्सल शैलीत करत आली आहे. तिला तसेच करणे प्रिय आहे, तिचा स्वतःचा असा खास बाज आहे. घरातल्या कानाकोपऱ्यात माझ्या या इवल्याश्या चिमणीचा चिवचिवाट भरून राहिला आहे. ''बाबा हे.. बाबा ते...'' अशी तिची मधाळ किलबिल माझ्या कानात अजून गुंजते आहे. तिचा हा किलबिलाट कधीही कमी होणार नाही याचे तू सदोदित भान राख म्हणजे झालं!



जेव्हा तिला एखादी गोष्ट समजत नसे तेव्हा मी म्हणायचो, ''तुझ्या डोक्यात शेण भरलंय.''

ती लगेच माझ्या माथ्यावर आपलं बोट ठेवून चित्कारायची, ''इथूनच तर आलंय.''

मी हसून हसून बेजार व्हायचो आणि भावनेच्या भराने माझे हृदय गदगदून जायचे. तिच्या विलक्षण हजरजबाबी हुशारीने मी अगदी हैराण होऊन जायचो. किती झपाट्याने माझ्याच शब्दात ती मला लीलया अडकवू शकत होती. लियम, भावा! मी माझ्या या लाडोबाला, या शेणाच्या गोळ्याला पोसून चांगलंच बाळसेदार बनवलंय. आता तुझी पाळी! त्याला चांगले-चुंगले खत-पाणी घालत राहा रे बाळा!

त्या काळात मी तंबाखू ओढायचो. ती म्हणायची, ''बाबा, तुमच्या तोंडाला वसु येतोय!''

'वास' या शब्दापासून 'वसु' या मजेदार शब्दाची उत्पत्ती बाईसाहेबांचीच बरं का! हे असे नवीन शब्द सुचणे तिच्यासाठी सहज सोप्पे काम होते. का कुणास ठाऊक, तू तिची असामान्य प्रतिभा ओळखशीलच याची मला खातरी नाही कारण ती ओळख पटायला कलाकाराची नजर असावी लागते. ती तुझ्यात नाही कारण तू पडलास निर्जीव अवजारांच्या सानिध्यात वावरणारा भावनाशून्य अभियंता. तिचे कलासक्त व्यक्तिमत्त्व समजून उमजायला तुला बरेच काही शिकावे लागेल.

ती सकाळी उठल्या उठल्या तोफेसारखा धडाधड प्रश्नांचा भडीमार करायची. मी म्हणायचो, ''बेटा, बाबाची गाडी मोशनमध्ये तर येऊ दे. मी आताच उठलोय गं.''

लगेच तिचे चटपटीत उत्तर तयार असायचे, ''ही टिनपाट गाडी खूप जुनी आहे, साठचे मॉडेल आहे ना! ते मोशनमध्ये यायला वेळ हा लागणारच!''

मला आपल्या हास्याचा गडगडाट अजिबात आवरता येत नसे. मी इतके खदखदून हसत असे की घरातल्या भिंतींवर तिच्या निरागस शब्दांमुळे हास्यरसाचा जणू गिलावा दिल्यासारखा वाटे. माझी कन्यका माझ्या घरच्या बहरलेल्या कल्पवृक्षाचे सुकोमल सुमन आहे. आता लग्नानंतर सासरी तिची जमीन भलेही बदलणार असेल पण तिचा स्वभाव नाही बदलायचा. तिच्या सौंदर्याला कुठलेही गालबोट लागणार नाही आणि तिच्या अस्तित्वाचा परिमल तुझ्या घर-अंगणात सदैव दरवळत राहील याची काळजी तुलाच घ्यायची आहे. फुलाच्या कोवळ्या पाकळ्या इवलीशीही दुखापत सहन करू शकत नाहीत पण ही माझी नाजूक साजूक लेक त्यांच्याहूनही अधिक सुकुमार आहे. आणखी एक गोष्ट सांगतो, ती माझे कपडे स्वतः पसंत करून निवडायची. तिचे बाबा जगातील सर्वात देखणे वडील म्हणून शोभावेत यासाठी हा खटाटोप असायचा. या कारणामुळे अनेकवार तिच्या आग्रहास्तव आधी घातलेल्या कपड्यांना बदलून तिच्या आवडीचे कपडे मला घालावे

लागत. मित्रा, तू देखील या वस्त्रबदलाच्या फेऱ्यात अडकलास तर तिच्यावर कधीच चिडून जाऊ नकोस. कपडे बदलण्याच्या आळसापासून दूर राहणे आणि ते परिधान करणे, फक्त एवढेच तुझ्या हातात आहे. तुम्हाला स्वतःलाच कळेल की हे सर्व किती आनंददायक आहे. माझ्यावर विश्वास ठेव, स्वतःला आरशात पाहिल्यावर तुझे तुलाच कळेल की तिची मर्मज्ञ सौंदर्यदृष्टी किती अचूक आणि सुनियोजित आहे!

तिने कुठलाही पदार्थ रांधू दे, तिला तू घेतलेल्या पहिल्याच घासात तुझा अभिप्राय अभिप्रेत असेल. बघ, मीठ कमी जास्त असू दे, आधी तिची तारीफ नक्कीच कर, नाही तर ती ते मनाला लावून घेत दुःखी होईल. मी तिच्या मनाला कधीही किंचितसा सुद्धा ओरखडा पोहोचू दिला नाही. खाण्यावरून बरं आठवलं गड्या, जेवताना कधीही बोलू नकोस. खाताना तोंडातून काहीही बाहेर पडू नये याची काळजी घे. तिला अव्यवस्थित रीतीने बकाबक खाणारे लोक अजिबात आवडत नाहीत बरं का!


माझी मुलगी कौशल्याने निर्मिलेली निसर्गाची एक उत्कृष्ट कलाकृती आहे, जणू एखादे मौल्यवान सर्जन! तू त्याच भावनेने या अनवट निर्मितीचे निगुतीने जतन कर. मी तुमच्या सहजीवनाच्या पायवाटेवर पदोपदी तुला समजावून सांगायला नसेन, म्हणून मी तिच्या खासमखास गोष्टी तुला लेखी देत आहे. येणाऱ्या काळात या तमाम मुद्द्यांची यादी तुझ्यासाठी अक्षय आनंदाचा अमूल्य नजराणा ठरेल हे नक्की. असे अजिबात समजू नकोस की मी तिच्यापासून दूर आहे. तिचे डोळे आसवांनी जरी किंचित ओले झाले तरी माझ्या घरात पाऊस कोसळेल आणि मी ती जिथे कुठे असेल तिथे तिला या पावसाच्या माऱ्यापासून वाचवण्यासाठी तिथे तडक पोहोचेन. तिला जराशीही ठेच जरी लागली तरी माझ्या घराच्या भिंती थरथर कापतील आणि मी तिला भक्कम आधार देण्यासाठी तिच्या नजीक येईन. मी माझी कन्या नव्हे तर माझे जीवन, माझ्या हृदयाची धडधड, माझा एक एक श्वास, हे सर्व तुझ्या हातात सोपवले आहे. हे सदोदित लक्षात असू दे की तिने इथल्यासारखंच रसरसलेलं जीवन जगावं यासाठी मी ते सर्व काही करीन जे तू मला करायला बाध्य करशील. मग ते तिला तुझ्यापासून हिसकावून घेणे असो किंवा तुला जबर शिक्षा करणे असो.

ही तुला दिलेली धमकी नव्हे किंवा इशारा देखील नव्हे. ही एका पित्याची नम्र विनंती आहे. हवं तर हा माझा दुराग्रह समजून तू तो स्वीकारावास. माझ्यानंतर तिच्या आयुष्यात आलेल्या दुसऱ्या पुरुषाला हे सांगणे माझे परम कर्तव्य आहे. ही जबाबदारी पार पाडण्याचा पुरेपूर प्रयत्न कर. माझी तुझ्याकडून इतकीच अपेक्षा आहे. मी आशा करतो की या पत्राचा मजकूर आपल्या दोघांतच सीमित राहील. माझ्या लेकीला हे माहीत नाही आणि तू तिला सांगायचेही नाहीस.

तिला तुझ्यात असे काय विशेष दिसले जे मला इतके प्रयत्न करूनही दिसत नाहीय. म्हणूनच तर मी म्हणतो की तिच्याकडे उत्तम दूरदृष्टी आहे. असो, मला आता थांबायला हवं. माझ्या लाडक्या सोनुलीची ओळख करून देण्यासाठी हे पुरेसे नाहीच. तिच्याबद्दल मी तुला हजारोंनी पाने लिहून देऊ शकतो पण मी तसे करणार नाही. ही गोष्ट पुरेपूर जाणून घे की जर माझ्या मुलीने तुला तिच्यासाठी योग्य मानले असेल तर तुलाही माझ्या या मोजक्या शब्दांचा गर्भितार्थ समजून घ्यावा लागेल.

तुझ्यावर काडीभरही विश्वास नसला तरी मला माहीत आहे की तिला आयुष्यभरासाठी ज्याच्या संगतीची गरज आहे तो तू आहेस, मी नव्हे. मी तिचे बोट धरून तिला एक एक पाऊल पुढे टाकायला शिकवले, आता तू 'कर हा करी धरिला शुभांगी' असे गुणगुणत तिचा हात हातात घेत जीवनभर तिच्यासोबत जीवनाची पुढील वाटचाल कर. शुभास्ते पन्थानः सन्तु! आणि हो, जर तुला कुठल्याही क्षणी किंचितही आभास झाला की तुझे तिच्याविषयीचे प्रेम किंचितही कमी झालंय तर कृपया तिला सांगू नकोस, ती निराशेने खचून जाईल. त्या प्रसंगी लगेच एक काम करायचं, मला सांगायचं, मी तिला परत घेऊन येईन, तिची शप्पथ!

■●■



# माणूस देव माझा

हाती गुलाब त्याच्या काटा उरी असावा
हसरा ऋतू व्यथेच्या वेलीवरी असावा

कोठे बरे निघाले सारे गरीब इथले?
सत्कार भाकरीचा कोठेतरी असावा

घालून शूभ्र वळसा म्हणतो झरा नदीला
''माझा तुझा घरोबा जन्मांतरी असावा''

वारा उनाड, त्याला मोडू नयेत बोटे
ताबा जरा स्वतःच्या पदरावरी असावा

त्याने बऱ्या कराव्या जखमा भलेपणाच्या
कोणी असा दयाळू धन्वंतरी असावा

आभाळ उंच असते, त्याची तमा कशाला?
विश्वास पाखराचा पंखावरी असावा

'माणूस' देव माझा, मी भक्त माणसाचा
प्रत्येक माणसाच्या तो अंतरी असावा


**- रमण रणदिवे,**
**पुणे.**
**भ्रमणध्वनी : ९७६५८०१६९९**




# देह

रांगडा... राबणारा
मनगटाच्या बळावर
छातीचा भाता फुटेस्तोवर
सर्वांगातून घाम सुटेस्तोवर
पोटातील आतडी तुटेस्तोवर
धमन्यांतील रक्त आटेस्तोवर...
देह...
कमनीय... हेलकावणारा
यौवनाच्या बळावर
छातीचा कुस्करा करेस्तोवर
अंगाखाली गुदमरुन मरेस्तोवर
मस्ती वासनेची उतरेस्तोवर
शेवटचाही निचरुन झरेस्तोवर...
देह...
अविरत कष्टतो
बाजारी विकतो...
झिजुन जगतो
खंगुन मरतो...
देह...
असतो फक्त पोशिंदा...
कुटुंब पोसतो!


**- दत्ता पवार,** अहिल्यानगर
**भ्रमणध्वनी : ९२०९२३१३५६**

# हिंदी चित्रपटातील स्त्री

## संकोचातून निर्भयतेकडे भावना, वेशभूषा आणि समाजाचा प्रवास





**श्रीराम नानल**
सातारा
९४२३०३४०५०



**भारतीय समाजाच्या मनोवृत्तीत कोणते बदल हळूहळू होत गेले हे जाणून घ्यायचे असेल तर कोणतीही इतिहासाची पुस्तकं उघडण्यापेक्षा हिंदी चित्रपटांकडे पाहिलं तरी पुरेसं ठरतं; कारण पडद्यावरची स्त्री ही केवळ एका भूमिकेतील व्यक्तिरेखा नसते. ती तिच्या काळातील स्त्रीचे मन, तिची बंधनं, तिची स्वप्नं आणि कधी कधी तिचं अबोल बंड घेऊन येते. तिच्या ओठांवरची गाणी, तिच्या चालण्यातल्या छटा, तिच्या कपड्यांतील धिटाई किंवा संकोच हे सर्व म्हणजे समाजाच्या मानसिक स्थित्यंतराचा अदृश्य इतिहास.**




इतिहासाची सुरुवात होते 'जेलर' (१९५८) मधील त्या वेदनायुक्त ओळीने. ''हम प्यार में जलने वाले हैं चैन कहाँ?'' या एका वाक्यात स्त्रीचे संपूर्ण अस्तित्त्व बंदिस्त असल्यासारखे वाटते. प्रेम ही गुपित वेदना आहे, आनंदाची घोषणा नाही. जणू भावना व्यक्त करणे म्हणजे अपराध आणि प्रेमाची चाहूल लागली तरी ती जगापासून लपवून ठेवण्याची सक्ती. नायिकेच्या चेहऱ्यावरचा संकोच, वेशभूषेतील साधेपणा, रंगांतील फिकेपणा हे सगळे मिळून त्या काळातील स्त्रीच्या अंतर्मनातील दडपणाची छाया बनून उभे राहतात. परंतु काही वर्षांनीच 'मुग़ल-ए-आज़म'मधील अनारकली



समाजाच्या मध्यभागी एक धाडसी आवाज फेकते ''प्यार किया तो डरना क्या?'' या एका प्रश्नात स्त्रीने स्वतःच्या भावनांचा स्वीकार दिला आहे. प्रेम हे पाप नाही हे सत्य प्रथमच चित्रपटातील नायिका ठामपणे जगासमोर मांडते. तिच्या वेशभूषेत आता



चमक आहे, रंग आहेत, हालचालीत एक धीट सौंदर्य आहे. ती जगापुढे थेट उभी राहते, तिच्या प्रेमाची किंमत जाणते आणि तिच्या हृदयाच्या आवाजाला भीतीच्या बेड्या घालण्यास नकार देते. स्त्रीचा आवाज पहिल्यांदा थरथरत नाही, तो घुमतो.

या दोन टोकांच्या मधोमध स्त्रीचे एक नाजूक पण सूक्ष्म रूप दिसते 'कहानी किस्मत की'मधील ती लाजरी ओळ, ''मैंने ऐसा तो नहीं कहा था''. हा क्षण विशेष आहे. येथे स्त्री प्रेमाला नकार देत नाही पण प्रेम व्यक्त करण्याची तिची शैली अत्यंत नाजूक, अलवार आणि सांकेतिक आहे. ती लाजते, ओठांवर कुठे तरी लाजरे स्मित फुलते, डोळे खाली झुकतात. प्रेमाचे स्वीकार करण्याचा हा







एक कोवळा पण विलक्षण सुंदर मार्ग आहे. तिच्या भावनात स्पष्टता आहे पण त्या बोलण्याचा तिचा ढंग अजूनही सौम्य, संयमित. इथे स्त्री स्वतःचे स्वत्त्व शोधायला लागली आहे पण समाजाच्या चौकटी अजूनही तिच्याभोवती सौम्य स्वरूपात आहेत. वेशभूषेत थोडी आधुनिकता दिसते पण मर्यादाही आहे; रंगांची निवड थोडी मुक्त पण अद्याप 'सुसंस्कृत' चौकटीत.



आणि मग, अचानक जणू काळाची चाकंच फिरून जातात. 'खेल खेल में'मधील नायिका खेळकर, हसरी, निर्भीड स्वरात घोषणा करते, ''खुल्लम खुल्ला प्यार करेंगे हम दोनों!'' येथे प्रेम ही वेदना नाही, पाप नाही, सावधपणे व्यक्त करण्याची बाब नाही तर आनंदाने, मैत्रीने, उत्साहाने जगासमोर मांडण्याची गोष्ट आहे. तिच्या वेशभूषेत आधुनिकतेचा धडाका आहे. स्कर्ट, जीन्स, खुले केस, रंगीबेरंगी पोशाख ही केवळ फॅशन नाही; ही स्वतंत्रतेची अभिमानाने परिधान केलेली ओळख आहे. स्त्रीचे पाऊल आता मागे हटत नाही; ती भावना दडवत नाही; ती स्वतःच्या मनावर स्वतःचा हक्क निर्भयपणे सांगते. प्रेम व्यक्तिगत नाही, ते सार्वजनिक होऊ शकते, जगापुढे सांगण्यासारखे आहे, हे या काळातील स्त्रीच्या आत्मविश्वासाने सिद्ध केले.

या सर्व बदलांकडे लक्ष दिले तर दिसते स्त्रीची उत्क्रांती. ही केवळ भाषेची किंवा वेशभूषेची नाही; ती तिच्या स्वतःकडे पाहण्याच्या दृष्टिकोनाची आहे.

जिथे ती एकेकाळी प्रेमाच्या ज्वालेत 'चैन नहीं' अनुभवत होती, तिथे ती नंतर प्रेमाला हक्क मानीत होती, कधी प्रेम सांगताना लाजेच्या गुलाबी पडद्याआड दडत होती आणि शेवटी त्या भावना जगापुढे उघडपणे, निर्धास्तपणे जाहीर करत होती.

चित्रपटातील स्त्रीचा हा प्रवास म्हणजे भारतीय समाजाच्या मनाचा नकाशाच. तिच्या ओठांवरील शब्द बदलले तसे समाजाचे मूल्य बदलले; तिच्या वेशभूषेतील धिटाई वाढली तसे लोकांच्या विचारांत मोकळेपणा आला; आणि प्रेम व्यक्त करण्याच्या तिच्या पद्धती बदलल्या तसे भारतीय संस्कृतीने भावनांच्या अभिव्यक्तिला अधिकाधिक जागा दिली. आजची स्क्रीनवरील स्त्री आत्मविश्वासी, मुक्त, स्वतःचे निर्णय स्वतः घेणारी ही त्या काळातील पडद्यावरच्या नायिकांच्या धीट हळूहळू चाललेल्या प्रवासाची उजळ परिणती आहे आणि म्हणूनच हिंदी चित्रपटातील स्त्रीची बदलती प्रतिमा हा केवळ मनोरंजनाचा इतिहास नाही तर भारतीय समाजाच्या मानसिक उत्क्रांतीचा एक जिवंत, रंगीबेरंगी दस्तऐवज आहे.



■●■






**शिरीष चिटणीस**
सातारा
७५८८८६५०५१

# प्रकाशनकट्टा : साहित्यासाठी प्रेरणादायी उपक्रम

९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात आगळावेगळा उपक्रम प्रकाशनकट्ट्याच्या निमित्ताने संपन्न झाला. ९९ पुस्तकांचे प्रकाशन चार दिवसात संपन्न व्हावे, यासाठी प्राचार्य शिवाजीराव भोसले प्रकाशन मंचाचे मुख्य समन्वयक लेखक-संपादक-प्रकाशक घनश्याम पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी नियोजन केले होते. मी या प्रकाशनकट्ट्याचा अध्यक्ष म्हणून कार्यकर्त्याच्या भूमिकेत होतोच. १, २, ३, ४ जाने. २०२६ या चार दिवसाच्या कालावधीत जवळपास एकशे पस्तीस पुस्तकांचे प्रकाशन या प्रकाशनकट्ट्यावर करण्यात आले. यामध्ये मराठवाडा, विदर्भ, कोकण, पश्चिम महाराष्ट्र आणि इतर उर्वरित भागामधून लेखक-कवी-विचारवंतांनी आपापली पुस्तके प्रकाशनकट्ट्यावर प्रकाशित केली. अगदी इंदूरचे लेखक-कवी डॉ. श्रीकांत तारे यांच्याही पुस्तकाचे



प्रकाशन या प्रकाशनकट्यावर झाले.

घनश्याम पाटील हे संवेदनशील, समाजमन जाणणारे लेखक-प्रकाशक आहेत. त्यांनी 'चपराक प्रकाशन'च्या माध्यमातून या संमेलनात नेत्रहीन वाचकांसाठी ब्रेल लिपीतील पाच पुस्तके प्रकाशित केली. चंद्रलेखा बेलसरेलिखित राखणदार आणि सत्यापितम, संदीप वाकचौरे यांचे शिक्षणाचे पसायदान, डॉ. सोमनाथ मुटकुळे यांचे चक्र आणि इतर नाटके तसेच सुहास कोळेकर यांचे रँगिगचे दिवस अशी दृष्टीहीनांसाठी ज्ञानाचे आणखी एक व्यापक-आकाश खुले करणारी ही पुस्तके आहेत. यामुळे




सर्वसामान्य वाचकांप्रमाणे दृष्टीहीनांनाही उत्कट साहित्याची अनुभूती घेता येईल. विविध विषयांवरील ही पुस्तके नेत्रहीन विद्यार्थ्यांच्या शाळांना भेट दिली जाणार आहेत. प्रकाशनकट्ट्याच्या उद्घाटन समारंभात १ जानेवारी २०२६ रोजी संमेलनाध्यक्ष विश्वास पाटील, स्वागताध्यक्ष श्री.छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले, महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, संमेलनाचे कार्याध्यक्ष विनोद कुलकर्णी, महामंडळाच्या कार्यवाह सुनीताराजे पवार आणि इतरांनी नरहर कुरुंदकर यांचे युगप्रवर्तक छत्रपती या ग्रंथाचे प्रकाशन केले. याचप्रसंगी ब्रेल लिपीतील पाचही पुस्तकांचे प्रकाशन दृष्टीहीनांसाठी याच समारंभात करण्यात आले.

२ जानेवारी २०२६ रोजी साहित्य संमेलनाच्या उद्घाटन समारंभानंतर अ.भा.मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष ज्येष्ठ विचारवंत डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते 'लाडोबा प्रकाशन' पुणे तर्फे आश्लेषा महाजन यांच्या 'गप्पी गप्पा आणि इतर कथा' या पुस्तकासह वेगवेगळ्या प्रकाशनाच्या जवळपास तीस पुस्तकांचे प्राचार्य शिवाजीराव भोसले प्रकाशन मंचावर प्रकाशन करण्यात आले. यावेळी प्रसिद्ध लेखिका आश्लेषा महाजन सर्व लेखकांच्या-कवींच्या वतीने मनोगत व्यक्त करताना म्हणाल्या, ''लेखकाच्या आयुष्यात पुस्तकाचे येणे नेहमीच आनंददायी असते. यानिमित्ताने लेखकाला स्वतःकडे, स्वतःच्या निर्मितीकडे बारकाईने आणि चिकित्सकपणे बघता येते. सिंहावलोकन करता येते. पुस्तक प्रकाशनातून लेखकाच्या स्वतःच्याही व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो. आधीच्या पुस्तकापेक्षा नव्याने येणारे पुस्तक कशा पद्धतीने वेगळे असावे, त्यात कोणती मौलिकता असावी? अशा प्रकारचा अभ्यास करून, त्या ध्यासातून लेखकाचाही प्रवास सुरू होतो. तो प्रवास एकाच वेळी थकवणारा असतो आणि तेवढाच आनंद देणारा, हुरहूर लावणाराही असतो. पुस्तकांच्या माध्यमातून लेखकांनी एकमेकांशी भेटणे महत्त्वाचे आहे.''

डॉ. श्रीपाल सबनीस म्हणाले, ''आज प्रकाशित झालेल्या पुस्तकांच्या लेखकांनी फक्त लेखन केलेले नसून मराठी संस्कृतीचे आयुष्य वृद्धिंगत केले आहे. मराठी संस्कृतीचा पोत तुम्ही समृद्ध केला आहे. घनश्याम पाटील यांच्यासारखा लेखक-प्रकाशक दुसऱ्या लेखकाला-प्रकाशकाला या प्रकाशन मंचाच्या माध्यमातून उत्तेजन देतो आणि याठिकाणी एकशे पस्तीस पुस्तके प्रकाशनासाठी संपूर्ण भारतातून येतात ही अत्यंत अभिनंदनीय बाब आहे. मराठी भाषा मरण्याची चिंता कोणीच करू नये. मराठी भाषा श्रीमंत असून संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, शिवाजी महाराज, बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले आणि इतरांनी हा वारसा आपल्यापर्यंत पोहोचवला असून तुमच्यासारख्या लेखकांकडून पुढच्या पिढीपर्यंत हा वारसा पोहोचत आहे. आज जरी याठिकाणी तुम्हा लेखकांचे पुस्तक प्रकाशन झाले असले तरी आपापल्या गावात तुमच्या पुस्तकांचे लोकार्पण करून त्या पुस्तकांवर चर्चा आयोजित करा.''

घनश्याम पाटील यांनी प्राचार्य शिवाजीराव भोसले प्रकाशन मंचावर होत असलेल्या पुस्तकांच्या प्रकाशनाबद्दल भूमिका विशद करताना सांगितले, ''आज अ.भा.मराठी साहित्य संमेलनात लेखकांची पुस्तके प्रकाशित होत असल्यामुळे लेखकाला आयुष्यभर आपले पुस्तक संमेलनात प्रकाशित झाल्याची आठवण मर्मबंधातली ठेव म्हणून जपता येणार आहे. आम्ही सातारच्या दीपलक्ष्मी सभागृहात दीपलक्ष्मी पतसंस्थेच्या





वतीने वर्षभर याठिकाणी प्रकाशित झालेल्या पुस्तकांवर चर्चासत्रे त्या त्या लेखकांच्या सोयीने आयोजित करणार आहोत. यासाठीचा सर्व खर्च दीपलक्ष्मी पतसंस्था करणार असून लेखकाने फक्त साताऱ्यापर्यंत आम्हाला पूर्वसूचना देऊन यायचे आहे. पुस्तक लोकार्पणाची बातमी, यू-ट्यूब रेकॉर्डिंग, प्रसिद्धी, साताऱ्यातील प्रसिद्ध लेखकांची त्या त्या पुस्तकांवरची मनोगते हे सर्व आम्ही आयोजित करणार आहोत. तसेच 'चपराक'च्या अंकात पुस्तकांची परीक्षणेही देणार आहोत.''

मी अध्यक्ष म्हणून या मंचामध्ये कार्यरत असताना मला हे सर्व आशादायी चित्र दिसते आहे. आज नरहर कुरुंदकरांची पुण्यतिथी आहे. अवघं पन्नास वर्षाचं वय असताना १० फेब्रुवारी १९८२ रोजी ज्ञानाचा धगधगता अग्निकुंड असलेले हे व्यक्तिमत्त्व आपल्यातून निघून गेले. प्रा. राम शेवाळकर यांची प्राध्यापक पदासाठीची मुलाखत एक शाळामास्तर घेणार आहेत हे कळल्यावर ते रुष्ट झाले होते पण जेव्हा ही मुलाखत दोन तास चालली आणि सौंदर्यशास्त्रावरची कधी न ऐकलेली मेजवानी त्यांना मिळाली तेव्हा ते ओशाळून गेले. रीतसर नेमणूक झाली आणि त्या संस्थेतून नोकरी सोडण्याच्या दिवशी प्रा. राम शेवाळकरांनी या मुलाखतकार शिक्षकाच्या-प्राध्यापकाच्या पायावर डोकं ठेवलं. मुलाखत घेणारे होते नरहर कुरुंदकर. दोघेही सद्गदित झाले. रणजित देसाई यांची 'श्रीमान योगी' कादंबरी गाजलीच पण त्याहून अधिक गाजली या कादंबरीसाठी आस्वादक अभ्यासपूर्ण लिहिलेली प्रा. नरहर कुरुंदकर यांची प्रस्तावना. नरहर कुरुंदकर यांचं व्याख्यान ऐकणे म्हणजे एक बौद्धिक मेजवानीच असे. विद्वान मंडळी त्यांच्या व्याख्यानाच्या नोंदी कधी टिपायला लागत, ते त्यांनाही समजत नसे.

साहित्य संमेलनात प्रकाशित झालेल्या पुस्तकांमधील आश्लेषा महाजन यांच्या 'लाडोबा प्रकाशन,' पुणे यांनी प्रकाशित केलेल्या किशोर विश्वाची भन्नाट सफर घडविणाऱ्या 'गप्पी गप्पा आणि इतर कथा' याचे लोकार्पण आणि पुस्तकावरील चर्चा २० मार्च २०२६ रोजी साताऱ्यात दीपलक्ष्मी सांस्कृतिक सभागृहात संपन्न होणार आहे.

■●■



# गड्या, आपला गावच बरा!

**नुकतेच आम्ही उभयता अमेरिकेला जाऊन आलो. थांबा घाबरू नका. तुम्हाला वाटेल झालं आता ह्याचं प्रवासवर्णन आणि स्वत:च कौतुक सुरु! पण मी ते लिहिणार नाही. अमेरिकेला जाऊन आले की सगळेच लिहायला सुरुवात करतात, ‘‘मध्यरात्री विमान निघणार होतं. विमानतळावर खूप नातेवाईक, मित्र जमा झाले होते. खाड खाड इंग्रजी बोलत मी पासपोर्ट दाखवला. पत्नी थोडीशी घाबरली. तिला म्हटलं डोन्ट वरी, सिक्युरिटीमधून जाताना आपण नवीन आहोत हे दाखवू नकोस. विमानतळ एअर कंडीशन्ड होतं...’’ वगैरे वगैरे! पण मी तसं काही लिहिणार नाही. तेव्हा तुम्ही पान उलटू नका. तसेच मॅनहॅटनमध्ये लेखक, स्वातंत्रदेवीच्या पुतळ्याखाली लेखक पत्नीसह, नायगऱ्याजवळ अस्मादिक, असे फोटो सुद्धा मी दाखवणार नाही. प्रवास चालू असतानाच मी (मराठीतून) शपथ घेतली होती, की मी माझे ‘प्रवास वर्णन’ अजिबात लिहिणार नाही. तेव्हा वाचक हो, तुम्हाला हा लेख वाचायला काहीच हरकत नाही.**



**सदानंद भणगे**
**अहिल्यानगर**
**९८९०६२५८८०**

खरं तर आजच्या जमान्यात इंग्लंड, अमेरिकेला जाणं फारसं कौतुकास्पद राहिलेलंच नाही. तुमच्या घराच्या आसपासच बघा. कुणाचा मुलगा, मुलगी, सून, जावई, भाचा, पुतण्या कोणीतरी परदेशात असतोच. एवढंच काय पण अगदी जपान, सायप्रस, जर्मनीमध्येही मुलं गेली आहेत. मग आईबाप, सासू सासरे, नातेवाईक जातात तिकडे चार सहा महिने मजा करायला. तिथलं रंगीबेरंगी, शिस्तीचं वातावरण पाहून चाट होतात. आपलं वय, नोकरी विसरून हाफ पॅन्ट, रंगीत टी शर्ट, टोप्या, बूट घालून हिंडतात. भारतात आले की लेखक नसलेलेही दणादण प्रवास वर्णन लिहितात. त्यात स्वतःचं, पोराबाळांचं कौतुक, तिथले फोटो वाचकांच्या माथी मारतात. एवढेच नाही तर स्वखर्चाने पुस्तकही छापतात आणि वाटत बसतात सगळ्यांना. त्यामुळे जाणाऱ्यापेक्षाही न जाणाऱ्यानाच जास्त माहिती असते परदेशाची. अशी पुस्तके म्हणजे लग्नाच्या फोटो अल्बमसारखी वाटतात. ज्याचं असतं त्याला कौतुक, बाकीच्यांना कंटाळवाणं. उलट बाकीच्यांना ती शिक्षाच! म्हणूनच मी प्रवासवर्णन लिहायचं नाही, फोटो दाखवायचे नाहीत आणि वाचकांना अजिबात त्रास द्यायचा नाही असं ठरवलं. तात्पर्य हा लेख तुम्हाला वाचायला काहीच हरकत नाही.

न्यूयॉर्क, फिलाडेल्फिया, वॉशिंगटन, बोस्टन, नायगारा फॉल्स हे अमेरिकेच्या इस्ट कोस्टला येतात. तेथे अटलांटिक महासागर आहे तर सानफ्रान्सिस्को, लास वेगास, लोसेन्जोलीस हे वेस्ट कोस्टला येतात. तेथे पॅसिफिक महासागर आहे. एका कोस्टकडून दुसऱ्या कोस्टला जायला सुद्धा विमानाने सहा सात तास लागतात. विमान प्रवास खरोखरीच अत्यंत कंटाळवाणा प्रकार आहे. प्रचंड महाग आणि तिकीटही सिझनप्रमाणे वाढत जाणारं. आपलं नगर-पुणे कसं एकदा तिकीट दर ठरला म्हणजे भाडेवाढ होईपर्यंत तोच. अमेरिकेचा प्रवास तर बोअर. कल्पना करा वीस-बावीस तास नुसतं सीटवर बसून राहायचं. दारं बंद, खिडकीतून ढगांशिवाय काहीच दिसत नाही. भीतीच वाटते. मध्ये ना स्टॉप, ना स्टेशन. विमान बदलायचं म्हणजे टेन्शन. काय एन्जॉय करणार सांगा. त्यांचं इंग्रजीसुद्धा आपल्याला समजत नाही. विमानतळावरच्या त्या कडक तपासण्यात कधी

बॅगा उघडायला लावतील नेम नाही. एकदा आमच्या शेजारच्या प्रवाश्याचे डिंकाचे लाडू काढून टाकायला लावले. बिचाऱ्याने बकाबका चार-पाच खाल्ले. एवढ्या महागामोलाचे लाडू फेकून द्यावे लागले. एवढ्या तपासण्या झाल्या की तास-दोन तास नुसतं बसून राहायचं. सगळे अति सुशिक्षित असल्याने कुणाशी बोलायची पंचाईत. तिथेच कंटाळ्याला सुरुवात होते. त्यापेक्षा आपल्या तांबड्या 'यष्टी'चा प्रवास काय मस्त! चार-दोन टाळके येतात, टवाळ गप्पा सुरु होतात, विड्यांचे धूर निघतात. कुणी पचकन तंबाखूची पिंक टाकतो, कुणी वडे खाऊन कागद टाकतो. एसटी आली की दारापाशी तुडुंब गर्दी, रेटारेटी, धक्के खात खात कंडक्टरचं खेकसणं सहन करीत आत घुसायचं. मग त्याच टपावर चिमटा आपटणं, सुटे पैसे परत न देणं, लहान पोरांचं केकाटणं, मग जागेवरून भांडणं, कुणी पायावर पाय देत, कुणाची ट्रंक खसदिशी लागणं, सॉरी वगैरे म्हणण्याची आपल्या देशात पद्धतच नसल्याने प्रश्नच येत नाही. तर अशी मजा विमान प्रवासात अजिबात नाही. तिथे सगळी शांतता. जो तो आपला लॅपटॉपमध्ये डोकं घालून बसलेला. कुणी कुणाशी बोलणं लांबच, बघत पण नाही. कॉफी, चहा घ्यायला जावं तर किंमत ऐकून तलफच जाते. साधा पांचट चहा तीनशे रुपयाला. आपला एसटी कॅन्टीनमधला चहा कसा जीभ टाळूला चिकटेल एवढा गोड अन घट्ट तोही दहा रुपयात. मस्तपैकी माशा उडवीत प्यायचा. तो आनंद पण मिळत नाही. भूक लागली तर पाववड्याची आठवण करीत बसायचं, एसीमधल्या खुर्चीवर.

तसं आम्हाला विमान प्रवासाचं लहानपणापासून फार अप्रूप. सिनेमात पाहिल्यावर तर वाटायचं ह्याला म्हणतात श्रीमंती प्रवास. नायक विमान तळावर येतो, पाच पन्नास लोक त्याला सोडवायला येतात, हार तुरे घालतात, मिठ्या मारतात, रडतात. नायिका लांबून हात हलवीत बाय करीत असते. आपणही तसेच जाऊ, विमानाच्या शिड्या चढताना अभिमानाने खाली पाहू, टाटा-बायबाय करू, मग हवाई सुंदरी आपल्याला सीटपर्यंत हसतमुखाने घेऊन जाईल. प्रत्यक्षात तसं घडतच नाही. गेटचा दरवाजा वेळेवर उघडतो. अति श्रीमंत बिझिनेस क्लासवाले अगोदर जातात. आपण मागून गर्दीत जायचं. न समजणाऱ्या सूचना चालू असतात. मग शांततेत लाल गालीच्यावरून चालत राहायचं. एखाद्या लग्न मंडपात गेल्यासारखे लांबलचक बोळीतून थेट विमानातच खुर्चीपाशी जावं लागतं. विमानात कधी प्रवेश केला तेच समजत नाही. खूप जवळजवळ असणाऱ्या खुर्च्यामध्ये जाऊन बसायचं. अनेक लोक अनेक भाषेत बोलत असतात. शेजारी कोणीतरी मक्ख सूटवाला असतो. ''काय पावणं कुणीकडं निगाला?'' असं पण कुणी विचारत नाही. मग हवाईसुंदरी खडखडा वरच्या सामानाच्या कपाटाची दारं लावते. सीटबेल्ट व इतर सुचना चालू असतातच. आपल्याला कसं मोकळंढाकळं बसायची सवय. कुणी सामानावरून पाय देऊन जातोय, कुणाची बॅग डोक्याला लागतेय, कुणी म्हणतो, जरा सरकून घ्या की राव. विमानात तसलं काही नाही. गुबगुबीत खुर्चीवर बसून राहायचं. एसी इतका चालू असतो की थोड्या वेळातच गारठून जातो आपण. काही जण हात वर करून एसी अॅड्जस्ट करतात. आपल्याला तेही जमत नाही. तो एकदम बंद तरी होतो नाही तर बर्फ अंगावर आल्याइतक गार वारं तरी सुरु होतं. मग गोड हसत एअर होस्टेस येतात. अंगावर टॉवेल टाकून जातात. काही अनुभवी प्रवासी लगेच तो पांघरूण झोपीही जातात. आपण इकडे तिकडे बघत बसायचं.


प्रत्येकाच्या खुर्चीसमोर टीव्ही स्क्रीन असतो. त्यावर तुमचं स्वागत, मग सीट बेल्ट कसा लावायचा, आपत्कालीन परिस्थितीत बाहेर कसं पडायचं ते दाखवतात. ते पाहूनच भीती वाटायला लागते. एकदम वॉशिंग मशीन बंद होताना आवाज करते तसा आवाज सुरु होतो आणि विमान हलायला सुरुवात होते. थोड्याच वेळात कानाला दडे बसायला सुरुवात होते. सूचनाच ऐकू येत नाहीत. विमान प्रचंड वेग घेते पण आत काहीच जाणवत नाही. स्क्रीनवर आपण किती वेगाने चाललो आहोत, किती उंचीवर आहोत ते दिसते. त्यामुळे आणखीनच भीती वाटते. मध्येच विमान हेलकावे खाते. शेजारचा मजेत कुठला तरी सिनेमा पाहत असतो. आपल्याला काहीच लावता येत नाही. कधी बटन सापडत नाही तर कधी वायर अडकते. कधी ऐकूच काही येत नाही. बरं शेजारच्याला विचारावं तर शेजारचा वेगळ्याच देशातला असतो. कुठल्या भाषेत विचारायचे, शिवाय आपण भारतीय, अज्ञान कसे दाखवणार? आता मला सांगा ह्या कटकटीपेक्षा आपला एसटीचा प्रवास मस्त. खडखडाट, अनेक खड्डे असले तरी भीती वाटत नाही. शेजाऱ्याशी बिनधास्त बोलायचे, ''काय पावन, पाउस झाला का गावाकड?''

रेल्वेत तर अजून मजा. फेरीवाले हिंडत असतात. किचेन, कंगवे विकणारे पार नाकापर्यंत वस्तू आणतात. भिकारी तर मित्र असल्यासारखे अंगाला हात लावतात. गरम पदार्थांचे खमंग वास येत असतात. गाडी थांबली की कलकलाट, बाटल्याचे आवाज, हिंदी, मराठी शिव्यातली भांडणे. शेजारच्या प्रवाशाच्या रडकथा ऐकण्यात वेळ कसा जातो समजत नाही. विमान प्रवासात सगळे स्तिथप्रज्ञ, समाधी लागल्यासारखे. आवाज फक्त विमानाचा. ते देतील ते खायचे, प्यायचे. त्यात देखील शेजारचा काहीतरी चांगलं खातपीत असतो. आपल्या हातात ब्रेड आणि अॅपल जूस! बरं मागायचे तरी कसं... एअरहोस्टेस काय विचारते ते आपल्याला

समजत नाही आणि आपली भाषा तिला समजत नाही. सगळाच आनंद. एसटीत कसं गाडी थांबली की पाववडेवाले एकदम तोंडाशी ताट आणतात.

दुबई किंवा फ्रॅन्कफ्रूटला विमान बदलायचं असेल तर पोटात गोळाच येतो कारण ती विमानतळे प्रचंड मोठी. मुंबईत निदान काही जण हिंदी, मराठी बोलत असतात. इथे सगळेच वेगवेगळ्या भाषेत बोलत असतात. त्याची भाषा, उच्चार पण समजत नाहीत. विमान आपल्याला न घेताच सुटलं तर करायचं काय? म्हणून नुसतं पळत सुटायचं. आसपास भरलेली दुकाने दिसतात. ती न बघताच धावायचं. पुन्हा सुरक्षा तपासणी, घड्याळ, पाकीट, बेल्ट, मोबाईल काढा, पासपोर्ट दाखवा, एखादी वस्तू राहिली की संपलंच सगळं. काउंटरवरची स्त्री अगम्य इंगजीत बोलत असते. सगळंच अवघड. सहज चहा विचारावा तर दहा डॉलर म्हटल्यावर रुपये किती हिशेब करीत माघार. परत रटाळ विमान प्रवास... न्यूयॉर्क यायला लागलं की गडबड सुरु होते. लोक उभे राहतात. बाहेर पडायलाच अर्धा तास लागतो. पुन्हा सिक्युरिटी, पासपोर्ट पाहणार, अमेरिकन इंग्रजीमध्ये काहीतरी विचारणार. मग सोडणार. मराठी जशी दहा मैलावर बदलते तशी इंग्रजीही बदलते. ती समजून घेता घेताच जायचे दिवस येतात.

प्रवास संपला तरी ताण संपत नाही. लगेज मिळण्यासाठी बोर्ड बघत कोणत्या बेल्टवर सामान येणार ते वाचावे लागते. चार-पाच बेल्ट फिरत असतात, तिथेही गर्दी. सगळ्या बॅगा सारख्याच दिसतात. एक एक बॅग येत राहते, ती घ्यायची आणि बाहेर पडायचे. त्यावेळी भारतात रात्र तर अमेरिकेतली सकाळ सुरू झालेली असते. त्यामुळे सवयीने झोप येत असते. घरी पोहोचल्यावर जेटलॅगमधेच दोन दिवस जातात. अमेरिकेतले ते आरशासारखे स्वच्छ रस्ते पाहून चक्कर येते. एसटीत शेंगा खाऊन टरफले खाली फेकणारे, केळीच्या साली, वेफर्सच्या पिशव्या रस्त्यावर फेकण्याच्या सवयी असणारे आम्ही अमेरिकेचे कौतुक करू लागतो पण स्वत: सुधारत नाही. विनोदाचा भाग सोडा पण अनुभवातूनच माणूस शहाणा होतो. आपल्या माणसाची किंमत समजते. टॅक्सीने घरी जाताना स्वच्छ, प्रशस्त रस्ते, वाहतुकीची शिस्त पाळणारे नागरिक पाहूनच आश्चर्य वाटते. दुतर्फा टुमदार छोटे बंगले आणि शांतता. कुठल्याही रस्त्यावर एकही फ्लेक्स बोर्ड, नेत्यांचे वाढदिवस वा शुभचिंतकांचे फोटो दिसत नाहीत. रस्त्यावर मिरवणूक, नाच दिसत नाहीत. कोठेही लाउडस्पीकर नसतो. किती सुखी आहेत ना नागरिक. न्यूयॉर्क सिटी कमालीची स्वच्छ आहे, आकाशाला भिडणाऱ्या इमारतीचे फोटो काढण्यासाठी लोक चक्क रस्त्यावर पाठीवर झोपतात, तरीही शर्ट मळत नाही. स्वातंत्र्यदेवीच्या पुतळ्याच्या आसपास कचरा टाकल्यास एक हजार डॉलर दंड आहे. डॉलरचा दर नव्वद रुपये धरून तुम्हीच गणित करा. मला भारतातली स्मारके आठवली. गंगा नदी आठवली. विवेकानंद स्मारक आठवलं. ताजमहाल आणि आसपासचा कचरा आठवला. वाहतुकीचे नियम तोडूनही कोणाची ओळख सांगितली की आम्ही सुटतो. अमेरिकेत लायसन्स रद्द होते.



रेल्वे, बसमधून सायकली, व्हील चेअर्स नेता येतात. अपंगांसाठी खास पार्किंग असते. तिथे गाडी लावल्यास बाकीच्यांना दंड होतो मात्र अमेरिकन माणूस खूप खात, पीत असतो. रस्त्याने सुद्धा त्याच्या हातात मोठा ब्रेड वा कॉफीचा भला मोठा मग असतो. हॉटेलमध्ये वेटरच्या हातून ग्लास फुटला तर सगळे जण टाळ्या वाजवतात, हसतात, त्याला चिअरअप करतात. आपल्याकडे वेटरलाच वाजवतात, पगार कापतात. तिथे हॉटेलमध्ये एक-दोन डॉलर्समध्ये वाईन वा बिअर टेस्ट करता येते, मग आवडेल ती विकत घेता येते. वाशरुम्स तर जागोजागी असतात. अतिशय स्वच्छ, सुवासिक, भरपूर पाणी असणारी. तेव्हा आठवतात आपल्या एसटी बस स्थानकावरील टॉयलेट्स आणि त्यांची अवस्था!

न्यूयॉर्कच्या टाईम स्क्वेअरवर श्रीमंती वाहत असते. चोवीस तास लाईट्सचा झगमगाट, रॉकफेलर टॉवरच्या एकशे पस्तीसाव्या मजल्यावर एका मिनिटात जाता येते. ही सिटी झोपतच नाही. प्रचंड गर्दी पण कुणी कोणाकडे पाहतही नाही. अगदी दोन भारतीय दिसले तरी ओळख देत नाहीत. सकाळी फिरायला बाहेर पडलो की समोर येणारा प्रत्येक अमेरिकन गुड मॉर्निंग म्हटल्याशिवाय आणि हसल्याशिवाय पुढे जात नाही.

नायगरा पाहणं एक अनोखा अनुभव आहे. न्यूयॉर्कपासून पाच सहा तासांच्या अंतरावर एकही खड्डा नसलेल्या सुरेख दुतर्फा झाडी असणाऱ्या रस्त्यावरून बस जाते. लांबूनच धबधब्याचा आवाज ऐकू येतो. प्रचंड मोठा प्रपात, उरात धडकीच भरवतो. त्याचा इतिहास व इतर माहिती एका फिल्मद्वारे दाखवली जाते. रात्रीच्या वेळी लाल, निळा, हिरवा रंग त्या प्रपातावर सोडला जातो. तो देखावा डोळ्यात साठवून ठेवावासा वाटतो. मोठ्या मोटर बोटने धबधब्यापर्यंत जाता येते. ते तुषार अंगावर घेणे म्हणजे निम्मी अमेरिका पाहिल्याचे समाधान आहे.

इथे प्रत्येक सिटी वेगळी आहे. न्यूयॉर्क असे तर सिलिकॉन व्हॅली हिरवी गार, एकदम शांत, रस्त्याने बदके गेली तर गाडीवाले थांबतात. सॅनफ्रान्सिस्को पाहायला आठ दिवस हवेत. तिथला गोल्डनगेट ब्रिज लांबूनच दिसतो. हाफ बे मूनला अर्धवर्तुळाकार समुद्र आहे. तिथे थंडगार वारं वाहत असतं. कुठलीही वस्तू दहा डॉलरच्या खाली नाही. लॉस एंजलीसच्या कोडॅक थेटरमध्ये ऑस्करची बक्षिसे वाटली जातात. तीन मजली या झगमगत्या इमारतीवर सर्व ऑस्कर विनर्सची नावे कोरली आहेत आणि खाली जमिनीवर त्या सर्व श्रेष्ठ नटांच्या पायांचे, बुटांचे ठसे घेतलेले आहेत. जवळच बेव्हरली हिल्सवर अमेरिकन कलावंतांचे झाडीत लपलेले बंगले आहेत. अक्षरशः ही मंडळी जणू स्वर्गातच राहतात, असे त्यांचे बंगले आहेत.

युनिवर्सल स्टुडीओ हा जगातला सर्वात श्रीमंत स्टुडीओ पाहून डोळ्याचे पारणे फिटते. अंगावर येणारे डायनोसॉर, समोर जळणाऱ्या गाड्या, भूकंप, पुराची दृश्ये पाहून तंत्रज्ञानाची त्यांची झेप पाहून डोळे विस्फारतात. ट्रीक सिन्स कसे घेतले जातात तेही दाखवले जाते तर मादाम तुसाचे पुतळे पाहून ते जिवंत असल्याचा भास आपल्याला होतो. इतके हुबेहूब की एकाने आमच्या देखत एका पुतळ्यालाच विचारले, 'आमचा फोटो काढता का?' म्हणून! लास वेगासला प्रचंड मोठे कॅसिनोज आहेत. तिथे श्रीमंती वाहत असते. एका मोठ्या मॉलमध्ये तर प्रती व्हेनिस शहरच उभं केलं आहे. निळ्याशार आकाशाखाली वाहणारी नदी आणि त्यात गाणी गात जाणारे नावाडी. बघतच बसावंसं वाटतं. रस्त्यात ड्रिंक्सची दुकाने आहेत पण कोणी रस्त्यावर पिऊन पडलेला वा शिवीगाळ करणारा दिसत नाही.


सॅनदिआगो सिटी म्हणजे तरुणांचा जल्लोष. रस्त्यावरच खाण्यापियाची हॉटेल्स, मेक्सिकन, थाई, अमेरिकन सर्व प्रकारचं खाणं मिळतं. इथे जगातले सर्वात मोठे जलचर संग्रहालय आहे. ४ डी सिनेमाग्रह आहे. चक्क अंगावर पाणी उडते. खुर्च्या हलतात. प्रेक्षक घाबरून ओरडतात. सोमवार ते शुक्रवार प्रचंड काम करणारा अमेरिकन शनिवार रविवार मौजमजा करतो, पैसे उडवतो. कधी शुक्रवारी कारच्या मागे छोटी नाव अडकवून बायको पोरं घेऊन समुद्रकिनारी जातात, तंबू टाकतात आणि दोन दिवस राहतात. कामाचं कल्चर खूप वेगळे आहे. ऑफिसच्या कॅन्टीनमध्ये भरपूर चांगले पदार्थ खायला, प्यायला असतात. खा, प्या, वाटल्यास खेळा पण खूप काम करा. घरूनही काम करण्याची परवानगी असते, त्यामुळे सगळेच मन लाऊन काम करतात.

झगमगतं लासवेगास पासून पुढे गेले की रणरणत वाळवंट लागतं. रखरखीत उन असत सगळीकडे. एकही झाड नसणारे अनेक डोंगर दिसू लागतात आणि आपण पोहोचतो जगप्रसिद्ध ग्रँड कॅनिअनला. साडेचार हजार फूट खोल असलेली दरी पाहून धडकीच भरते. मुख्य म्हणजे इथे कुठेही संरक्षक कठडे नाहीत. पुढे जाऊ नका म्हणून सांगणारे असतात पण अपघात घडत नाहीत आणि आपल्याकडे संरक्षक कठडे तोडून नशेत लोक जीव गमावतात. वाईट वाटतं. अमेरिकेत श्रीमंतीच आहे असं नाही, गरिबीही आहे. रस्त्यावर बसून मदत मागणारे गिटार वाजवतात. येणारे जाणारे त्याच्या समोरच्या बरणीत पैसे टाकतात. काही म्हातारी मंडळी, हेल्प, होमलेस असा बोर्ड लाऊन मदतीची अपेक्षा करतात. डोनेशन नावाच्या संस्थेत नागरिक न लागणाऱ्या वस्तू देऊन टाकतात. त्या चांगल्या असतात, कमी किमतीत मिळतात. काही रस्त्यांवर मोठी कपाटे ठेवलेली असतात. त्यात लोक न लागणारे बूट, कपडे ठेवतात. गरीब लोक ते घेऊन जातात.

कधी यार्ड सेल असतो. म्हणजे अनेक जण आपापल्या घरातल्या वस्तू विकायला ठेवतात. मोठ मोठे शॉपिंग मॉल्स असतात. चांगल्या प्रतीच्या वस्तू मिळतात मात्र इथे हमाल, नोकर नाहीत. पेपर टाकणारा नसतो, दुधवाला येत नाही. रस्त्यावर फेरीवाले, रद्दीवाले नसतात. सगळी कामे स्वत: करावी लागतात. अगदी फर्निचरचे सुटे भाग सुद्धा उचलून आणावे लागतात. स्वत:च जोडावे लागतात. घरातही कामवाली नसते मात्र सुविधा सगळ्या असतात. चोवीस तास गरम पाणी आणि लाईट गॅस, डिशवॉशर कॉमन धुण्याचे मशीन. भारतीयांना सगळ्याचेच अप्रूप वाटते.

लोक चक्क समोरच्या व्यक्तिला जाऊ देतात, सॉरी म्हणतात. रात्री-अपरात्री सुद्धा सिग्नलला थांबतात. वाहनांचा वेग रस्त्यावरच्या बोर्ड प्रमाणेच ठेवावा लागतो. केरकचरा कोणीही रस्त्यावर टाकत नाही तर काळ्या पिशवीत भरून ठेवतात, सकाळीच एक गाडी येऊन त्या पिशव्या घेऊन जाते. मशीनने रस्ते झाडले जातात. कुत्र्यांनी काही केले तर मालकांना ते उचलावे लागते आणि लोक ते करतात. अंधाराचा फायदा घेऊन कोणी तसे जात नाही. भल्या मोठ्या मॉल्समधून सगळ्या वस्तू मिळतात. काउंटरवर कोणीही गर्दी करीत नाही. मागे लांब उभे राहतात. किती लिहिणार, आपल्याला सगळंच नवल वाटतं. या गोष्टी शिकायला पैसा लागत नाही. तरीही आम्हाला भारताची ओढ लागते. दिवाळीचे दिवस आठवतात. श्रावणातले सण दिसू लागतात. मंगळागौरीची गाणी कानात घुमू लागतात. भारतीय पदार्थांची आठवण व्हायला लागते. मित्रांचे गळ्यात गळे घालून हिंडणे आठवते. मॉर्निंग वॉकला भेटणारी मंडळी आठवू लागतात. रात्री पानाच्या टपरीवर सिगारेटचा धूर काढीत क्रिकेट आणि राजकारणावर गप्पा मारणारे दोस्त लोक आठवतात. महमद रफी, हेमंतकुमार, किशोरकुमारची गाणी ऐकू येतात, अमिताभचे सिनेमे, सचिनची मॅच आठवते. कधी एकदा भारतात येतोय असं होतं. आल्यावर किराणा दुकानात जातो, मालक तंबाकू खाऊन पिंक रस्त्यावर टाकतो, कागदाचे बोळे रस्त्यावर फेकतो. तळमळून सांगावंसं वाटतं, नको टाकू पण धीर होत नाही. वाहनाचे हॉर्न्स त्रास देतात कारण नसता वाहनांची झालेली कोंडी बघवत नाही. शेवटी भारत माझा देश आहे, माझ्या देशावर माझे प्रेम आहे हे महत्त्वाचे आणि अमेरिकेतही दारिद्र्य, गुन्हेगारी, इतर समस्या आहेतच, असो...

याहीपेक्षा खूप काही बघण्यासारखं आहे, लिहिण्यासारखं आहे. हॉलीवूडची ट्रेन सफर, मिस्ट्री हाउसमधल्या गमती जमती, येशोमीटी हिल्सचा सूर्यास्त, लेक टाहोची बर्फातली हॉटेल्स, लास वेगासची कारंजी, ट्रम्प टॉवरची सोनेरी उंच इमारत, हूवर डॅमचा अतिभव्य प्रकल्प, गुगल, फेसबुक, याहूच्या



इमारती, नासा आणि परिसर याबद्दल लिहायचं म्हटलं तर दोनशे पानी पुस्तक होईल. तेव्हा तूर्तास थांबतो कारण सगळं जग पाहिल्यावरही वाटतं, गड्या आपला गावच बरा. आमच्याकडे वृंदावन गार्डन आहे, स्टॅच्यू ऑफ युनिटी आहे, काश्मीर आहे, कन्याकुमारी आहे, संपन्न आहे आपला देश. बघा मित्रांनो, मी शपथ पाळलीय, प्रवास वर्णन नाही लिहीलं. शनिवारी ''भल्या पहाटे सहा वाजता निळा टी शर्ट अन लाल बर्मुडा घालून मी तयार झालो, बायकोने बदामी पंजाबी ड्रेस घातला होता. आम्ही निघालो लास वेगासला. मी आज कॅसिनोत जाऊन खेळणार होतो. फोटो क्रमांक चार पाहा. लेखक वर्ल्ड ट्रेंड सेंटरचा इतिहास वाचताना. डावीकडून पाचवा मी वगैरे वगैरे!'' मी असं काही लिहिले नाही. विनोदाचा भाग सोडा पण आपण अमेरिकन लोकांपासून चांगलं घ्यायला काय हरकत आहे? निदान शिस्त, स्वच्छता आणि शिष्टाचार जरी अंमलात आणले तरी हा लेख सत्कारणी लागला म्हणायचा!

# मला घडवणारे पुस्तक



**प्राचार्य श्याम भुर्के**
९४२२०३३५००

**सातारा येथे एका समारंभात प्राचार्य शिवाजीराव भोसले यांनी मला आचार्य अत्रे लिखित ‘मी कसा झालो’ हे आत्मवृत्त भेट दिले. ते मी झपाटल्यासारखे वाचून काढले. एक व्यक्ती एकाच आयुष्यात किती क्षेत्रांत प्रावीण्य प्राप्त करू शकते, हे दाखवणारे हे पुस्तक! आचार्य अत्रे कवी, विडंबनकार, विनोदी लेखक, शिक्षक, नाटककार, वक्ता, चित्रपटकार, पत्रकार, अभिनेता, कीर्तनकार, राजकारणी, शिक्षणतज्ज्ञ, संपादक – हे सारं काही होते. नुसते होते असे नाही, तर त्या त्या क्षेत्रांतली यशाची शिखरे त्यांनी काबीज केली. काही वर्षांनी हे सारं पाहून वाचक विचारतील, अत्रे किती होते?**




अत्रे म्हणत, ‘‘लहान मूल हे माझे आदर्श होते. शाळा सुटल्यावर ते घरी कधी सरळ जात नाही. वाटेत जे जे दिसेल त्याचा आनंद घेते. त्याला फूल दिसले तर त्याचा वास घेते. झाडावर फळ दिसले तर ते पाहून मिटक्या मारत खाते. कुत्रे दिसले तर त्याच्याशी खेळते. मीही तसेच केले. वर्गात गुरुजी प्रभावी शिकवत, ते पाहून आपण शिक्षक व्हावे असे वाटले. चांगली कविता ऐकल्यावर आपणही कवी व्हावे असे वाटले. लहानपणी कीर्तन ऐकले, तेव्हा आपणही कीर्तनकार व्हावे... असे सर्व काही होत गेलो.’’

मोठं व्हायचंय? मोठ्यांना भेटा!

पुण्यात फर्ग्युसनमध्ये शिकत असताना तिथे थोर नाटककार राम गणेश गडकरी आले होते. त्यांचा सर्वत्र दबदबा होता. त्यामुळे एक सामान्य विद्यार्थी म्हणून प्र. के. अत्रेंना त्यांना भेटता आले नाही. ती रुखरुख त्यांच्या मनाला लागून राहिली होती. तेव्हा अत्र्यांचे मामा अत्र्यांना म्हणाले, ‘‘उद्या गडकरी मास्तरांचे प्रेमसंन्यास नाटक किर्लोस्कर थिएटरमध्ये आहे. नाटकाच्या मध्यंतरात गडकरी थिएटरजवळच्या जोगळेकरांच्या उपहारगृहात चहाला येतात. तेव्हा तू तिथे ये. त्यांना तुझी ओळख करून देतो.’’



ठरल्याप्रमाणे अत्रे उपहारगृहात जाऊन बसले. नाटकातील गाणी तिथे ऐकू येत होती.

खरोखर गडकरी मास्तर तिथे आले. धडफळे यांनी त्यांच्याशी अत्र्यांची ओळख करून दिली; ‘‘हा कविता करतो.’’ तेव्हा मास्तर म्हणाले, ‘‘उद्या घरी ये.’’ या आमंत्रणामुळे अत्र्यांना खूप आनंद झाला. ज्यांना भेटायला मिळत नाही, त्यांच्या घरी जायला मिळणार! कसब्यातील गडकऱ्यांच्या घरी अत्रे गेले. त्यांनी आपली ‘फुलबाग’ ही काव्यसंग्रहाची वही मास्तरांच्या हाती दिली. वहीची बांधणी ढिली झाली होती. ते पाहून मास्तर म्हणाले, ‘‘अत्रे, तुमच्या या फुलबागेला चांगले कुंपण घाला ना!’’ कविता वाचल्यावर ते पुन्हा म्हणाले, ‘‘तुम्हाला चांगले साहित्य कळत असेल, तर हे असलं शाब्दिक फुलोऱ्यांचं लिखाण बंद करा. जसं दिसतं तसं लिहीत जा.’’

अत्र्यांनी मास्तरांचा हा सल्ला तंतोतंत पाळला. अत्र्यांच्या साहित्यात ‘त्याला खूप आनंद झाला’ असं वाक्य दिसणार नाही; ‘त्याने आनंदाने उडी मारली’ असं वाक्य दिसेल. ‘त्याला खूप दुःख झाले’ असे वाक्य असणार नाही; ‘दुःखात रडून रडून त्याचा सदरा ओला झाला’ असं वाक्य दिसेल. कालांतराने अत्र्यांच्या नवयुग साप्ताहिकात शांता शेळके लिहू लागल्या. तेव्हा अत्र्यांनी त्यांना सांगितले, ‘‘हे असले साहित्यिक फुलोरे असलेले लिखाण बंद करा. जसं दिसतं तसं

लिहा.'' शांताबाईंनी ते ऐकले आणि त्या मोठ्या कवयित्री झाल्या.

गडकऱ्यांना भेटल्यामुळे अत्रे बदलले. मोठ्यांना भेटत राहा, ये हृदयीचे ते हृदयी येतं, आपणही मोठे होऊ लागतो, (हे तत्त्व मानून) अत्रे असंख्य दिग्गजांना भेटले. त्यात संत गाडगे महाराज, संत तुकडोजी महाराज, विनोबा भावे, प्रबोधनकार ठाकरे, क्रांतिसिंह नाना पाटील, महामहोपाध्याय दत्तू वामन पोतदार अशांचा समावेश होता.

एकदा नाट्यदिग्दर्शक दामूअण्णा जोशी अत्र्यांना म्हणाले, ''बाबूराव, एक नाटक लिहून द्या.'' वास्तविक अत्रे काही नाटककार नव्हते पण आलेली संधी सोडायची नाही या विचाराने ते हो म्हणाले. गरज ही शोधाची जननी असते, त्याप्रमाणे अत्र्यांना वृत्तपत्रात बातमी दिसली. औंधचे महाराज म्हणाले होते, ''सूर्यनमस्कार घाला. मुलींनो, तुमचे विवाह व्हायचे असेल तर सूर्यनमस्कार घाला.'' या अतिरेकी विचारांवर टीका करणारे विनोदी नाटक 'साष्टांग नमस्कार' त्यांनी लिहिले. त्यातील यशामुळे पुढे २२ नाटके लिहिली. 'तो मी नव्हेच' नाटकाने तर लोकप्रियतेचे उच्चांक गाठले.

एखादा प्रकल्प यशस्वी झाला नाही, तर ते खचून जात नव्हते. त्यांनी थोर समाजसेवक महात्मा फुले यांच्या जीवनावर चित्रपट काढला. त्यात मोठ्या लोकांनी भूमिका केल्या. गाडगे महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, प्रबोधनकार ठाकरे, शाहीर अमर शेख आणि स्वतः अत्रे यांच्या भूमिका त्यात होत्या. असे असतानाही चित्रपट आपटला, अजिबात चालला नाही. अत्र्यांच्या मित्राने याचे कारण विचारले, तेव्हा अत्रे म्हणाले, ''महात्मा फुले बहुजन समाजाचे, त्यामुळे ब्राह्मण मंडळी सिनेमा पाहायला आली नाहीत. चित्रपट काढणारा मी ब्राह्मण, त्यामुळे बहुजन समाजाची मंडळी चित्रपटाकडे फिरकली नाहीत.'' यावरून लक्षात येतं की, अडचणी येणार, पराभव होणार पण त्यामुळे खचून न जाता त्यांनी अनेक चित्रपट काढले. 'श्यामची आई' चित्रपटास तर राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त झाला. आचार्य अत्रे यांना सर्वसामान्यांबद्दल कळवळा होता. उन्हात बसलेल्या भविष्यवाल्याला ते हात दाखवत होते. त्यांच्या समाजवादी मित्रांनी यावर नापसंती व्यक्त केली. तेव्हा अत्रे म्हणाले, ''मला तो उपाशी बसल्याचे जाणवले, म्हणून मी त्याला हात दाखवला. मी सर्वप्रथम माणुसकी जपणारा आहे, मग समाजवादी आहे.'' या विचारांचा माझ्यावर फार मोठा प्रभाव पडला. बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये ३८ वर्षे नोकरी केली, त्यास मी समाजकार्य मानले. येणाऱ्या ग्राहकाचे काम आनंदाने केले. त्यामुळे माझ्या आत्मवृत्ताला 'आनंदाचं पासबुक' असं नाव दिलं. कोयना नगर भूकंप, किल्लारी (लातूर) भूकंप या संकटकाळी तेथील लोकांना मनापासून मदत केली. बँकेच्या ट्रेनिंग कॉलेजचा प्राचार्य झालो. अधिकाऱ्यांपासून नंदुरबार येथील आदिवासींपर्यंत साऱ्यांना ट्रेनिंग दिले. ४० पुस्तके लिहिली, ५००० वर व्याख्याने दिली. कला संचातील कार्याबद्दल २०१७ मध्ये पॅरिस येथे युनेस्कोतर्फे सत्कार झाला.

आचार्य अत्रे यांच्या सागराएवढ्या कर्तृत्वापुढे माझे कार्य एका छोट्या थेंबाएवढे असेल पण त्या यशासाठी प्रेरणा दिली ती आचार्य अत्रे यांच्या आत्मवृत्तानेच! हे ऋण व्यक्त करण्यासाठी ही संधी प्राप्त झाली.






**नागेश शेवाळकर**
९४२३१३९०७१


# हृदयस्पर्शी कथा सागर

**चपराक प्रकाशन पुणे यांनी प्रकाशित केलेला, महेश सोवनी यांनी लिहिलेला 'कडेवर आणि इतर कथा' हा संग्रह वाचण्यात आला. कथा वाचताना प्रकर्षाने जाणवले की, यातील कथाबीजं, कथांचा बाज, कथांची मांडणी नि संवाद, कथांचे विषय नि आशय या सर्वांचे वेगळे असे सादरीकरण आहे, जे थेट हृदयात घर करते.**

'कडेवर' ही कथा अत्यंत वेगळ्या ढंगात वाचकांसमोर येते. दोन पिढ्यातील विचारशैली, राहणीमान यासह जनरेशन गॅप ह्या बाबी ठळकपणे मांडल्या आहेत. कडेवर हा शब्द साधारणपणे बालकाशी संबंधित असा, या कथेत मात्र लेखकाने या शब्दाचा जो अर्थ समोर ठेवला आहे तो वाचताक्षणी काही क्षण वाचक थांबतो. या कथेत एका प्रथेचा लेखकाने उल्लेख केला आहे, ती म्हणजे 'द आर्ट ऑफ डेथ फोटोग्राफी' ह्या प्रथेचे नि कलेचे वाचन करताना वाचक चक्रावून जातो.

'चार्ली परत येतो' ही कथा रम्य आठवणींचा जागर करणारी आहे. भूतकाळात जवळच्या व्यक्तिला भेटायला जाताना काढलेले रेल्वेचे तिकीट सापडताच त्यावरील दिनांक, वेळ पाहून त्या भेटीत घालवलेल्या क्षणांची तत्काळ सय येणं ही बाब स्मरणशक्तिला दाद द्यावी अशीच! याच कथेत सांगितलेले अंधाराचे प्रकार वाचून ज्ञानात भर पडते. आठवणींसाठी केलेली अप्रतिम शब्दरचना... 'मग माझेही लग्न झाले, मुलेबाळे झाली नि तुझी आठवण हळूहळू फिकट होत गेली. जसा कपड्यावरील डाग जात नाही पण फिकट फिकट होत जातो ना अगदी तसे.' 'अनुक्रमणिका नंबर अकरा' ही कथा जिल्हा परिषदेच्या शाळांतील समस्यांचा पाढा वाचणारी आहे. मुख्याध्यापिका आणि शिक्षिका यांच्यातील हळूवार, कुठलाही त्रागा, राग व्यक्त न करता होणाऱ्या चर्चेतून रंगलेला संवाद शिक्षण क्षेत्रातील धगधगते वास्तव उलगडून दाखवते. काही आशादायक घटनाही समोर येतात.

'आमची भास' ह्या कथेच्या नायिका सविताआजीचं थेट सानेगुरूजींच्या कुटुंबाशी नातं! आमची भास याचा सरळसरळ अर्थ आमची भाषा! आजीची भाषा चित्पावनी अर्थात कोकणी! आजीचे कुटुंब मुलांच्या शिक्षणासाठी बेंगलोरला स्थायिक होताच आमची भासची आस कमीकमी होत गेली. उलट बेंगलुरची कानडी भाषा सररास वापरली जाऊ लागली. आजीला हे फार मोठे दुःख होते. तिचे पती होते तोपर्यंत दोघे आमची भास बोलत परंतु ते या जगातून गेले, जणू कुटुंबाची आमची भास घेऊन गेले. लहानपणापासूनच ज्या बोलीभाषेची गोडी लागली होती, जी जीवाभावाची भाषा होती त्या भाषेचा एकही शब्द घरात वापरला जाऊ नये याचे शल्य सविताआजीला बोचत होते. तिला वाटे, शाळेचे मार्क महत्त्वाचे. बोली भाषेला कोण विचारतंय? ती विसरली तरी चालतंय... बोली भाषेचे महत्त्व स्पष्ट करताना लेखक सोवनी जळजळीत वास्तव उजागर करतात, एक भाषा जेव्हा मरते ना तेव्हा ती एकटी मरत नाही. अख्खी संस्कृती घेऊन मरते.




'सोबती' ही कथा वेगळा बाज घेऊन आली आहे. ऑस्ट्रेलियात स्थायिक झालेल्या आईवडिलांची सुलभा नावाची मुलगी मराठी भाषेची आवड असल्यामुळे भारतात येते. भारतात अचानक तिची भेट एका सर्विस प्रोव्हायडर अर्थात सेवा देणाऱ्या व्यक्तिशी होते. सुलभा त्याला सतत सोबत ठेवू लागली, अगदी सिनेमा, पार्टीतही! एकदा एका रिचर्ससाठी सुलभा एका आडगावी जाते, सोबत तो सोबती असतोच! तिथे त्यांना एका हॉटेलमध्ये एकच खोली मिळते. अशा एकांतस्थळी त्या सोबत्याच्या संयमाची

परीक्षा असते. तो त्या परीक्षेत उत्तीर्ण होतो का? सुलभाची अवस्था काय होते? तीन वर्षांनंतर सुलभा ऑस्ट्रेलियाला परतताना तिची आणि सोबत्याची काय अवस्था होते ते लेखकाच्या लेखणीने अत्यंत संयमाने लिहिले आहे. लेखकाने कथेचा केलेला शेवट जणू कथेचा सार आहे, इतके दिवस त्याने त्रयस्तपणे तिची सोबत केली होती. संततधार पडत राहिली तरी दगडसुद्धा मऊ होतो. सोबती तर हाडामासाचा माणूस होता.

लेखकाची भाषाशैली, शब्दसंपत्ती खूप श्रीमंत आहे. 'रीती' या कथेच्या सुरुवातीला लेखक एक तुलनात्मक वाक्य पेरतात ज्यामुळे कथा वाचण्याची ऊर्मी दाटून येते. 'आपल्या दुखणाऱ्या गुढघ्यावर हात ठेवत रशिदा उठली. ती जिना उतरू लागली तेव्हा तिला समजेना की तिच्या शरीरातील हाडे जास्त खुळखुळत आहेत की जीर्ण झालेला जिना?'रशिदा ही म्हातारी बाई राहत असलेले घर मोडकळीस आल्यामुळे नियमानुसार ते घर खाली करावे म्हणून एक कर्मचारी नोटीस घेऊन नेहमीच तिच्या भेटीला येतो. त्या दोघांचा नेहमी होणारा संवाद, कधी कर्मचाऱ्याचे स्वगत यामुळे ही कथा एका वेगळ्या विश्वात घेऊन जाते. दोघांमध्ये जी नात्याची, मैत्रीची शुद्ध, घट्ट वीण गुंफली जाते त्यातून होणारी हृदयस्पर्शी बोलचाल मन हेलावून टाकते.

'सी सॉ' ही कथा वाचताना मन सुन्न होऊन जाते. दोन वेगवेगळ्या, हृदयस्पर्शी घटनांची सांगड घालताना लेखक सोवनी यांच्या लेखनकौशल्याला दाद द्यावीच लागते. किल्लारी येथे झालेल्या भूकंपाची तीस वर्षांनंतरही येणारी आठवण कथानायकास जशी कासावीस करते, तशीच शालेय जीवनातील वर्गमैत्रिणीची होणारी ससेहोलपट वाचतानाही मन उद्विग्न होते. शिक्षित असूनही शबानाचा होणारा कोंडमारा मन अस्वस्थ करतो.

प्रभा! नकळत झालेल्या एका चुकीमुळे सतत आईवडिलांची टोचणी, वडिलांचा नशेच्या आहारी जाऊन झालेला मृत्यू, दोन लहान भावांचा तुरुंगवास हे काय कमी म्हणून लग्न होताच नवऱ्याला आधीच पत्नी असल्यामुळे घेतलेला घटस्फोट अशा दुष्टचक्रातून बाहेर पडणाऱ्या प्रभाचा मूक आक्रांत महेश सोवनी यांनी 'ती सत्कर्माला लागली' या कथेत मांडला आहे, तो बेचैन करणारा आहे.

'पुन्हा कधी भेटशील' या कथेची सुरुवात लेखक एका छानशा वाक्याने करतात. 'अपघाताने माणसे हिरावली जातात, दुरावली जातात तसेच अपघाताने काही माणसे भेटतात...' हे वाक्य लेखकाने का लिहिले असावे ह्याचे उत्तर कथा जशी पुढे जाते तसे मिळत जाते. रेल्वेने प्रवास करत असणाऱ्या लेखकाची रेल्वे एका निर्जन स्थळी थांबताच तिथे होणारे संवाद, चर्चा सुरू असताना एक व्यक्ती लेखकाला भेटताच उसळून येतो आठवणींचा महासागर! त्या चर्चेतला एक मुद्दा एखाद्या बाणाप्रमाणे हृदयाला भेदून जातो. अपघातात मेलेल्यांना सरकारकडून मदत मिळते. म्हणून मग एक मृतदेह मागायला तीन वेगवेगळे लोक येतात. मेलेल्यांच्या टाळूवरील लोणी खाणाऱ्यांची कमी नाही... लेखकाचा भूतकाळ जागृत करणारी ती व्यक्ती कोण होती? कथेचा शेवट कसा होतो? हे वाचताना डोळे पाणावतात.

'अधलं मधलं' ही कथा वडील आणि मुलगी यांच्यातील प्रेमावर आधारित, वेगळीच गुंफण असलेली आहे. या शीर्षकाविषयी विषयाच्या ओघाने लेखक लिहितात, 'सुख आणि दुःख यांच्या अधलं मधलं काही तरी असतेच की! बहुतांश लोकांचे प्रारब्ध असेच अधलं मधलंच असते की!' प्रारब्धाच्या खेळात अडकलेल्या आई, बाबा, मुलगी आणि मावशी नात्यांचा हा चौकोन खूप रेखीव चितारण्यात लेखक यशस्वी झाले आहेत.

'ती' ही कथा संगीत क्षेत्रातील नामांकित रुद्र वीणाकार आणि त्यांचा मुलगा यांच्यातील संबंधाची आहे. काही प्रमाणात मुलाने करून घेतलेल्या गैरसमजाची आहे. इतर कथेप्रमाणे सोवनी यांनी ही कथाही अप्रतिम अशी रंगवली आहे. शेवट अत्यंत महत्त्वाचा आहे, वाचनीय आहे. हसत्या-खेळत्या घराचं, कुटुंबातील कुणाचीही चूक नसताना कसं वाळवंट होतं ते 'वाळवंट' कथेत वाचताना मनाची अवस्था केविलवाणी होती. शेत गहाण टाकून आईबाप मुलाला त्याचं डॉक्टर होण्याचं स्वप्न पूर्ण होण्यासाठी युक्रेनला पाठवतात. जेमतेम एक वर्ष होत असताना युक्रेनचे रशियासोबत युद्ध सुरू होते. ती सारी परिस्थिती आणि भारतात परत आल्यावर मुलाची झालेली मानसिक अवस्था, त्यातून त्याची सुटका हे वाचताना मन सैरभैर होते.


संग्रहातील एकूणएक कथा आगळावेगळा, नावीन्यपूर्ण विषय घेऊन लिहिलेल्या आहेत. सुख, दुःख, भीती, नवल, हसू, आक्रोश इत्यादी भावभावनांचे मिश्रण असलेल्या आहेत. लेखक महेश सोवनी यांचं अनुभवविश्व जसं विस्तृत आहे तसाच त्यांच्याकडे विपुल शब्दभांडार आहे. योग्य ठिकाणी योग्य शब्दांची मांडणी करण्याचं अलौकिक कसब त्यांच्याकडे असल्यामुळे कथा केवळ वाचनीय नसून हृदयाला भिडणाऱ्या आहेत, वेगळी अनुभूती देणाऱ्या आहेत.

**कडेवर आणि इतर कथा**
**लेखक :** महेश सोवनी
**प्रकाशक :** चपराक प्रकाशन

'चपराक'ची ग्रंथसूची


**मोनाली देशमुख**
सदस्य, राज्य पुस्तक व पाठ्यपुस्तक समीक्षण समिती, महाराष्ट्र राज्य

# अनुभवांच्या उबेतून उमलणारं शिक्षणविश्व



**शिक्षण म्हणजे केवळ पाठ्यपुस्तक, फळा आणि खडू एवढंच मर्यादित नाही; ते जीवनाशी जोडलेलं असतं, अनुभवातून फुलत जाणारं असतं ही जाणीव करून देणारं 'लाडोबा प्रकाशना'चं पुस्तक म्हणजे भरत पाटील लिखित 'फुलताना'. १४४ पानांच्या या पुस्तकात एका संवेदनशील शिक्षकाचा अनुभवसमृद्ध प्रवास जिवंत झाला आहे. प्रस्तावनेतून डॉ. वसंत काळपांडे यांचा अभ्यासू दृष्टिकोन जाणवतो तर मलपृष्ठावरील टिपणात भाऊसाहेब चासकर यांनी या लेखनाच्या प्रयोगशीलतेवर प्रकाश टाकला आहे. पुस्तकाची छोटीशी अर्पणपत्रिका जरी शब्दसंख्येने लहान असली तरी आशयाने मोठी आहे 'हे लेखन आहे एका प्रवासाचं' ही सुरुवातच वाचकाला भावविश्वात घेऊन जाते.**

वाचनाच्या सुरुवातीपासूनच लेखकाची शैली लक्ष वेधून घेते. साधी, ओघवती आणि प्रसंगी रूपकात्मक, काही ठिकाणी वि. स. खांडेकर यांच्या लेखनाची आठवण करून देणारी. भाषेचं सौंदर्य, अंतर्मुख करणारी आशयघनता आणि प्रसंगातून जीवनमूल्य शोधण्याची वृत्ती 'फुलताना' मध्ये ठळकपणे जाणवते मात्र 'फुलताना' हे अनुकरण नाही; ते अनुभवातून घडलेलं स्वतंत्र आणि प्रांजळ लेखन आहे.

**बालमनाचा शोध :**

'मौल्यवान प्रामाणिकपणा'पासून सुरू होणारा प्रवास हा बालमनाच्या सूक्ष्म निरीक्षणांचा आहे. मुलांच्या भावविश्वातील निरागसता, भीती, कुतूहल आणि आनंद लेखकाने अत्यंत प्रेमाने टिपला आहे. 'नवा सोबती पक्षी' आणि 'दोस्त फुलपाखरू' यांसारख्या लेखांतून निसर्गाशी मुलांची नाळ कशी जुळते, हे दिसते. शिक्षण आणि निसर्ग यांची सांगड घालताना लेखक मुलांना अनुभवातून शिकण्याची संधी देतो.

'पतंग आमचा गगनावरी'मध्ये एका साध्या उपक्रमातून मुलांचा आत्मविश्वास कसा उंचावतो, हे सुंदररित्या मांडले आहे. शिक्षणाची खरी ताकद म्हणजे विद्यार्थ्यांच्या अंतर्गत ऊर्जेला दिशा देणे हे या लेखातून स्पष्ट होते.

**कलेची आणि कल्पनाशक्तिची उधळण :**

चित्र, माती, वाचन, फिरते वाचनालय या सर्व माध्यमांतून लेखकाने मुलांमध्ये सर्जनशीलतेची बीजे रोवली आहेत. 'चित्रातले जग' वाचताना




मधील बालसंवेदनशीलतेची आठवण येते. मुलांच्या चित्रांमध्ये त्यांचे विश्व दडलेले असते, हे लेखकाने जाणले आणि त्याला प्रोत्साहन दिले. ही पद्धत पाहताना रवींद्रनाथ टागोर यांच्या शांतिनिकेतनच्या संकल्पनेची आठवण येते. मुक्त वातावरणात, निसर्गाच्या सान्निध्यात, अनुभवातून शिकणारे शिक्षण 'फुलताना'मध्ये हेच तत्त्व प्रत्यक्ष कृतित उतरलेले दिसते.

**तंत्रज्ञानाची जाण आणि कालानुरूपता :**

कोरोना काळात 'मोबाईल माझा अभ्यासाचा सोबती' या उपक्रमातून लेखकाने संवादाची साखळी टिकवून ठेवली. शिक्षण थांबू नये, त्याने नवे मार्ग शोधावेत हा दृष्टिकोन प्रशंसनीय आहे. कला, खेळ आणि तंत्रज्ञान यांची सांगड घालताना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील समग्र शिक्षणाच्या तत्त्वांची आठवण येते मात्र हे तत्त्वज्ञान धोरणात येण्यापूर्वीच लेखकाने कृतितून दाखवून दिले, ही विशेष बाब आहे.

**संवेदनशीलतेचा स्पर्श :**

पंकज, शिवानी, रोशन, गणा यांसारखी पात्रे पुस्तकाला मानवी चेहरा

देतात. 'बेकार अभ्यास करना ना सर आज' मध्ये गणा या विद्यार्थ्याच्या माध्यमातून कृत्रिम दबावाशिवाय शिक्षण कसे फुलते, हे उलगडते. मूल समजून घेणे म्हणजे त्याच्या वर्तनामागची कारणे जाणून घेणे हा दृष्टिकोन अत्यंत महत्त्वाचा आहे.

या संदर्भात डॉ. सुभाष माळी यांच्या बालमैत्र शिक्षण तत्त्वज्ञानाची आठवण येते. 'फुलताना'मध्ये हे तत्त्वज्ञान केवळ विचाररूपात नाही तर कृतीरूपात साकार झालेले दिसते.

**जीवनशिक्षणाचा गाभा :**

हे पुस्तक केवळ शैक्षणिक प्रयोगांचे संकलन नाही; ते जीवनशिक्षणाचा दस्तऐवज आहे. शिक्षक हा केवळ ज्ञानदाते नसून जीवनदाते असतो, ही जाणीव प्रत्येक लेखातून होते. काही प्रसंग अंतर्मुख करतात तर काही प्रेरणा देतात.

येथे ओशो यांचे वचन आठवते, माणसाला 'माणूस' म्हणून घडवणारे शिक्षणच असते. 'फुलताना' हे त्या वचनाचे प्रत्यंतर आहे. हे पुस्तक उपक्रमांची यादी नाही; ते एक जिवंत दस्तऐवज आहे. शिक्षणातील आनंद, प्रयोगशीलता, सामाजिक भान आणि लोकशाही मूल्यांची पेरणी यांचा हा उत्सव आहे. मुलांमध्ये स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाचा आदर, कल्पनाशक्तिला दिलेला मोकळा श्वास आणि प्रत्येक अनुभवातून शिकण्याची संधी हे 'फुलताना'चे वैशिष्ट्य आहे. शिक्षक, विद्यार्थी आणि पालक या तिन्ही घटकांना जोडणारा हा पूल आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण म्हणजे केवळ अभ्यासक्रम नव्हे तर सजगतेने दिले जाणारे जीवनशिक्षण हा या पुस्तकाचा गाभा आहे. 'फुलताना' हे पुस्तक शिक्षकांसाठी मार्गदर्शक, पालकांसाठी विचारप्रवर्तक आणि शिक्षणप्रेमींसाठी प्रेरणादायी आहे. फुलताना हे वाचकाला केवळ माहिती देत नाही तर प्रेरणा देते. गुणवत्तापूर्ण शिक्षण म्हणजे जीवनाशी जोडलेली, संवेदनशील आणि सर्जनशील प्रक्रिया हा संदेश हे पुस्तक प्रभावीपणे देते. भरत पाटील यांनी अनुभवांना शब्दांत गुंफून ज्या सहजतेने मांडले आहे, त्यामुळे वाचकही नकळत त्या प्रवासाचा भाग बनतो. म्हणूनच फुलताना हे केवळ वाचायचे पुस्तक नाही तर अनुभवायचे पुस्तक आहे. अनुभवांना शब्दरूप देताना ज्या सहजतेने आणि प्रामाणिकतेने मांडले आहे, त्यामुळे वाचकही त्या प्रवासात सहभागी होतो आणि नकळत स्वतःही 'फुलत' जातो.


**लेखक :** भरत पाटील

**प्रकाशक :** लाडोबा प्रकाशन

**पाने :** १४४

**मूल्य :** २५०/-

'चपराक'ची ग्रंथसूची


चपराक प्रकाशन www.chaprak.com

इतिहास आणि वर्तमान यांचा अनोखा संगम साधणारी नाटके!

या पुस्तकातील 'असूड', 'राजर्षी', 'खेळ मांडियेला' आणि 'राज्य रयतेचे व्हावे' ही नाटके तुम्हाला इतिहासाच्या एका अविस्मरणीय सफरीवर घेऊन जातील.

रंजक, प्रबोधनपर आणि विचार करायला लावणारे डॉ. सोमनाथ मुटकुळे यांचे हे पुस्तक आजच खरेदी करा.

पाने २२४

मूल्य ३५०/-

आजच नोंदणी करा!

फोन पे / गूगल पे क्र. ७०५७२९२०९२

महत्वाचे : कृपया नोंदणीनंतर त्याचा तपशील आणि आपला पूर्ण पत्ता याच क्रमांकावर व्हाट्सएॅप करावा.



**मंगला मिरासदार**
**पुणे**
**९६९९०९१०५२**

# कौटिलीयम् अर्थशास्त्रम्।

**प्राचीन भारतीय संस्कृत साहित्य अत्यंत सुसंपन्न आहे. वेद, उपनिषदे, भगवद्गीता, व्याकरण, आयुर्वेद इत्यादींनी आपले ज्ञानभांडार भरलेले आहे. आपल्या प्राचीन ग्रंथांमध्ये केवळ आध्यात्मिक चिंतनच नाही तर सुसंपन्न अशा लौकिक जीवनाचाही विचार केला आहे. त्यातील एक महत्त्वाचा शास्त्रग्रंथ म्हणजे 'कौटिलीय अर्थशास्त्र!' नाव जरी अर्थशास्त्र असले तरी तो राज्यशास्त्रावरचा ग्रंथ आहे. राज्यशास्त्र म्हटल्यावर प्लेटो, ॲरिस्टॉटल, हॉब्स, लॉक, रूसो इ. राजनीतिज्ञांची नावे सांगितली जातात; मात्र भारतीय ज्ञानपरंपरेत राज्यशास्त्राचा विचार फार प्राचीन काळापासून होत आला आहे.**

एकदा प्राच्यविद्या परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी प्राच्यविद्यापंडित डॉ. रा. ना. दांडेकर म्हणाले होते, ''आपली ज्ञानभूमी सुसंपन्न अणि सुफलम आहे; पण आपण त्यात कृषिकर्म करीतच नाही. परदेशी विद्वान अतिशय प्रयत्नपूर्वक ही जमीन कसतात आणि त्यातील संपन्न फळ स्वदेशात घेऊन जातात.''

अर्थशास्त्रावरील हा ग्रंथ कौटिल्याने इ. स. पूर्व ४ थ्या शतकात लिहिला. प्राचीन काळी भारतात नांदला, तक्षशिला येथे प्रसिद्ध विद्यापीठे होती. तिथे तत्त्वज्ञान, व्याकरण, गणित, कृषिविद्या, शल्यचिकित्सा, इतिहास, राज्यशास्त्र, इत्यादी अनेक विषयांचे अध्ययन होत असे. कौटिल्य किंवा चाणक्य याने तेथे राज्यशास्त्राचे अध्ययन केले. त्या सुमारास वायव्येकडून अलेक्झांडर या ग्रीक आक्रमकाने भारतावर आक्रमण केले. भारतात त्याकाळी गणराज्ये होती. गणराज्य म्हणजे स्वतंत्र, स्वायत्त असे राज्य! या राज्यांमध्ये एकजुटीचा व संघटितपणाचा अभाव होता. त्यामुळे अलेक्झांडरचे मोठे सैन्य व शस्त्रसामग्री यामुळेही गणराज्ये पराभूत झाली. 'अष्टकायन' या राज्याची राणी 'कृपा' ही आपल्या स्त्रीसैन्यासह लढली पण पराभूत झाली मात्र आता अलेक्झांडरचे सैन्य कंटाळल्याने त्याला थांबावे लागले.

या सर्व गणराज्यांनी एकजुटीने व संघटितपणे शत्रूशी सामना केला असता तर अलेक्झांडरला यश मिळू शकले नसते. हे सर्व निरीक्षण करणाऱ्या कौटिल्याला एका मध्यवर्ती एकछत्री साम्राज्याची आवश्यकता जाणवली व त्याने चंद्रगुप्त मौर्याला मार्गदर्शन करून मगधचा सम्राट केले. 'शास्त्र' याचा अर्थ ज्याचे मूलभूत सिद्धांत हे कालातीत असतात, ते बदलत नाहीत अशी तत्त्वे! अर्थशास्त्र हे राज्यशास्त्र म्हणजे राज्याशी, समाजाशी संबंधित असल्याने राज्यपद्धतीच्या, समाजाच्या बदलानुसार त्यात थोडा फार बदल होऊ शकतो पण मूलभूत सिद्धांत तेच राहतात.

उदाहरणार्थ अर्थशास्त्रातील 'राजमंडला'च्या सिद्धांतात एक सूत्र आहे त्यानुसार दोन राष्ट्रांच्या सीमा एकमेकांना लागून असतात. ज्यांच्यामध्ये अंतर नसते ती राष्ट्रे एकमेकांची संभाव्य शत्रू असतात! या सूत्राचे प्रत्यंतर इ. स. १९६२ मध्ये झाले! त्यावेळी भारत व चीन यांच्यामध्ये अनाक्रमणाचा 'पंचशील' करार झालेला होता. तरीही एकीकडे 'हिंदी चिनी भाई भाई' म्हणत चीनने आक्रमण केले आणि भारताचा भाग बळकावला. करारानुसार आपले थोडेच सैन्य सीमेवर होते. आपण पराभूत झालो! एकीकडे संधी (करार) आणि त्याचवेळी आक्रमण हे 'द्वैधीभावा'चे कौटिल्याचे सूत्र चीनने प्रत्यक्षात आणले पण आपलाच कौटिल्य आपल्याला कळलाच नाही!

दुसरे एक उदाहरण 'अर्थशास्त्रा'ची आजच्या काळातील अन्वर्थकता सांगणारेच आहे. आपली शेती पावसावर अवलंबून आहे आणि पावसाचे प्रमाण नेहमी कमी जास्त असते. काही वेळा पुरेसा पाऊस पडतच नाही. त्यामुळे दुष्काचे संकट ओढवते. दुष्काळपीडित शेतकऱ्यांना शासन अनुदानरूपाने मदत करते. इ. इ. १९९६ मध्ये वुल्फेन्सन नामक अमेरिकन अधिकारी भारतात आला असताना त्याने भारताच्या ढासळत्या अर्थव्यवस्थेबाबत चिंता व्यक्त केली. त्यावर त्याने उपाय सांगितला की, अनुदान व्यवस्था बंद करावी!

मात्र या संदर्भात कौटिल्याने सांगितलेले विवेचन महत्त्वपूर्ण आहे! अनुदानसमाप्ती नव्हे तर भ्रष्टाचारावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. दुष्काळपीडित शेतकऱ्यांना पित्याप्रमाणे मदत केली पाहजे. राजाने त्यांना धान्याचे बी, बैलजोडी पैसे या रूपाने अनुदान द्यावे. दुष्काळ संपला, पीकपाणी व्यवस्थित आले की त्यांच्याकडून ते अनुदान वसूल करावे नाही तर राज्याचा खजिना रिकामा झाला तर राजाला तो दंड, कर, किंमतीत वाढ उपायांनी सामान्य लोकांकडून त्याची भरपाई करावी लागते. तेव्हा अर्थव्यवस्था सुधारायची असेल तर भ्रष्टाचारावर नियंत्रण हा उपाय आहे! भ्रष्टाचार हा कळत न कळत होत असतो. जिभेवर ठेवलेले

मध किंवा विष पोटात जातेच. त्याप्रमाणे धनकोषाजवळ काम करणारा अधिकारी सामान्यपणे अपहार करतोच! अर्थात हा सामान्य नियम आहे; नियमाला अपवाद असतातच! पाण्यात राहणारा मासा किती पाणी पिऊन जातो ते कळत नाही. त्याप्रमाणे धनाचा अपहार किती होऊन जातो ते समजत नाही!

आधुनिक काळात कौटिलीय अर्थशास्त्राचा परिचय किती आवश्यक आहे हे दाखवणारे आणखी एक उदाहरण! आधुनिक शिक्षणक्रमात 'व्यवस्थापनशास्त्र' नावाचे स्वतंत्र शास्त्र उदयाला आले आहे. त्यासाठी स्वतंत्र संस्थाही स्थापन केल्या जात आहेत. व्यवस्थापन शास्त्राचा प्रणेता म्हणून 'पीटर अल् ड्रकर' हे नाव सांगितले आहे मात्र कौटिल्याच्या अर्थशास्त्रात व्यवस्थापन पद्धतीचा क्रम स्पष्टपणाने सांगितला आहे. 'पञ्चङ्गो मंत्रः।' या सूत्रात कोणतेही कार्य पाच टप्प्यात कसे करतात ते सांगितले आहे. पहिला टप्पा म्हणजे प्राधान्याने व अत्यावश्यक असे कोणते कार्य हाती घेणे आवश्यक आहे ते ठरवणे! त्यानंतर त्या कामासाठी किती मनुष्यबळ आणि किती द्रव्यबळ लागेल याचा अंदाज घ्यावा लागतो. त्यानंतर 'देशकालविभाय' म्हणजे ते कार्य कुठे व किती काळात करायचे आहे याचा विचार. प्रत्यक्ष कार्य करताना येणारे संभाव्य अडथळे वा संकटे यांचा विचार करून त्यावर उपाययोजनाही ठरवावी लागते आणि शेवटी कार्यसिद्धी!

इतके सूत्रबद्ध टप्पे स्पष्ट रूपात कौटिल्याने सांगितले आहेत. त्यामुळे कार्याचे नियोजन, व्यवस्थापन सांगणारा कौटिल्यय आधुनिक व्यवस्थापन शास्त्राचा प्रणेता ठरावा! प्राचीन अर्थशास्त्र ही संज्ञा अर्वाचीन 'इकॉनॉमिक्स' या इंग्रजी संज्ञेशी समानार्थी नाही! कौटिल्याचे अर्थशास्त्र हे राज्यशास्त्र आहे. राज्याच्या प्रशासनासाठी, व्यवस्थापनासाठी जे जे विषय आवश्यक आहेत त्या सर्वांचा समावेश अर्थशास्त्रामध्ये होतो. मनुष्याच्या उदरविर्वाहाचे साधन म्हणजे अर्थ! कृषी, पशुपालन, वाणिज्य ही सर्व उदरनिर्वाहाची साधने आहेत. तशी जमीन प्रथम उपलब्ध करावी आणि नंतर तिचे रक्षण व पालन करावे. म्हणून अर्थशास्त्राची व्याख्या करताना 'भूमेः लाभपालनोपायः शास्त्रम् अर्थशास्त्रम्' असे म्हटले आहे. राजनीतिशास्त्र, दण्डनीति, नीतिशास्त्र अशी राज्यशास्त्राची इतरही नावे आहेत. जेव्हा 'मात्स्य न्याय' उफाळतो (म्हणजे मोठा मासा लहान माशास गिळतो त्याप्रमाणे बलदंड माणूस दुर्बलास ग्रासतो.) तेव्हा प्रजेच्या रक्षणासाठी पालनासाठी कोणा 'दण्डधरा'ची आवश्यकता भासते मात्र प्रजेचे केवळ रक्षण व पालन नाही तर 'पितृवत्' पालन हे राजाचे परमकर्तव्य असल्याचे कौटिल्याने वारंवार सांगितले आहे.राज्याच्या सात अंगांचा निर्देश कौटिल्याने केला आहे. ती सात अंगे म्हणजे स्वामी, अमात्य, जनपद, दुर्ग, कोश, दण्ड आणि मित्र (शत्रु). या सात अंगांपैकी स्वामी किंवा राजा हा महत्त्वाचा स्तंभ! हा राजा कसा असावा त्याचा विस्तृत ऊहापोह आहे. 'विनयाधिकारिकम्' या पहिल्याच प्रकरणात त्याच्या अभ्यासक्रमात चार विद्या सांगितल्या आहेत. 'आन्वीक्षिकी' म्हणजे सारासारविवेक, वेदत्रयी, वार्ता म्हणजे कृषि-पशुपालन-वाणिज्य आणि दण्डनीति म्हणजे राज्यशासनासाठी आवश्यक कायदा, न्यायदान, सैन्य व शिक्षा! राजासाठी इंद्रियज्ञानाचे महत्त्व कौटिल्याने सांगितले आहे. तो केवळ तत्त्वज्ञानाचा विषय नाही तर राजासाठी आवश्यकच आहे. तो नसेल तर रावण, दुर्योधन कसे नाश पावले याचीही उदाहरणे दिली आहेत. राजाच्या प्रजाहिताच्या दिनक्रमात त्याच्या निद्रेला केवळ दोन प्रहर आहेत! असा विद्यानिवनयसंपन्न राजाच प्रजेच्या हितासाठी काम करू शकतो.

अर्थशास्त्राच्या विषयाची व्याप्ती खूप मोठी आहे. राजाची व्यक्तिगत व महालाची सुरक्षा, त्याचा दिनक्रम, त्याची दण्डशक्ती, अमात्यनियुक्ती, त्यांच्यासह मंत्रणा (सल्लामसलत), व्यवस्थापनाची तत्त्वे, जनपदाची निर्मिती, जलसिंचन, कृषी, पशुपालन, पणन (व्यापार), ग्राहक संरक्षण, करपद्धती, अंदाजपत्रक, हिशोब तपासणी कार्यालय, गुप्तहेर यंत्रणा, विवादपदे, न्यायदान, कर्मचारी संघटना, गुन्हेगारांना शिक्षा व समाजकंटकांवर नियंत्रण, समाजजीवन, स्त्रियांचे स्थान, नगररचना, संरक्षित राजधानी, दुर्ग, परष्ट्रसंबंध, दूतकार्य, राजमण्डसिद्धांत युद्धाचे प्रकार, जिंकलेल्या प्रदेशाची व्यवस्था, समेटाचे प्रकार इत्यादी अनेक विषय अर्थशास्त्रात अंतर्भूत होतात.

या संदर्भात अर्थशास्त्राचे वेगळेपण व वैशिष्ट्ये असे की प्लेटो, ॲरिस्टॉटल या सारख्या राजनीतितज्ज्ञांनी आदर्शवाद, राजनीती यांची तत्त्वज्ञानाशी सांगड घातलेली दिसते; या तुलनेत प्रत्यक्ष राज्य करताना येणाऱ्या अडचणी आणि त्या निवारण करण्याचे उपाय यांना अर्थशास्त्राने महत्त्व दिले आहे. दुसरे म्हणजे कुटिलतेच्या संदर्भात कौटिल्याची तुलना इटालियन राजनीतीतज्ज्ञ मॅकियाव्हेली याच्याशी केली जाते मात्र शत्रूचा समूळ नाश करण्यासाठी कोणतेही बरेवाईट उपाय सरसकट वापरावेत, असे मॅकियाव्हेली म्हणतो तर कौटिल्य प्रणीत कूट उपाय केवळ कर्तव्य न करणारे व गुन्हेगार यांच्यासाठीच आहेत, सरसकट नाहीत!

थोडक्यात, प्रजेच्या हितात राजाचे हित आणि प्रजेच्या सुखात राजाचे सुख हा कौटिल्याचा केंद्रभूत दृष्टिकोन आहे!

■●■


निम्हण ग्रुप ऑफ कंपनीज
Group of Companies
नियोजित प्रकल्प
▪ सर्वे नं. १, पाषाण - भव्य निवासी व व्यापारी संकुल
▪ लवळे येथे रिंग रोडच्या परिसरात भव्य निवासी व व्यापारी संकुल
▪ निम्हण मळा येथे निवासी संकुल
▪ बावधन येथे निवासी संकुल
शुभेच्छुक
मा. श्री. तानाजीभाऊ रामचंद्र निम्हण
मा. नगरसेवक, पुणे म.न.पा. । मा. संचालक, संत तुकाराम सहकारी साखर कारखाना
अजय विजय निम्हण । निलेश नामदेवराव निम्हण

To,


साहित्य चपराक
एप्रिल २०२६
SAHITYA CHAPRAK
April 2026

Sahitya Chaprak April 2026
RNI REG. NO. MAHMAR/2009/34853
Declaration NO. PHM/SR/3/VIII/2009



**लवकरच**

## प्रकाशित होत आहे...

# अ जर्नी ऑन दि परफेक्ट ट्रॅक




रेल्वेत अभियंता होणं आणि राष्ट्राची सेवा करणं ही निश्चितच गौरवाची आणि अभिमानाची बाब म्हणावी लागेल. हे यश साध्य करतानाच आपल्याशी संबंधित सर्वांच्याच आणि आपल्या संपर्कात आलेल्या प्रत्येकाच्या भल्याचाच विचार करणं म्हणजे तर दुर्मीळात दुर्मीळ बाब म्हणावी लागेल.

**डॉ. शरद टेंभेकर** यांनी ही किमया साधली आहे. म्हणूनच ते म्हणतात, माझ्या आयुष्यात संघर्ष असा कधी आलाच नाही. मला सगळी चांगलीच माणसं भेटली! अशा सुखी माणसाचा सदरा परिधान केलेल्या या सुहृदय अभियंत्याची ही गौरव गाथा नक्की वाचा...

च प श क चपराक प्रकाशन
www.chaprak.com

ईमेल : info@chaprak.com
वेबसाईट : www.chaprak.com

**भ्रमणध्वनी : ७०५७२९२०९२ / ८७६७९४१८५०**